सोलापूर
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
Solapur Tarun Bharat
छत्रपती संभाजीनगर, अहमदनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड येथून वितरित
छत्रपती संभाजीनगर | मंगळवार, २४ सप्टेंबर २०२४ | वर्ष दुसरे | अंक १८२ | पाने : ८ | किंमत रु. ६/- | www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# राज्यामधील १४ आयटीआयचे नामांतर
## महाविद्यालयांना आनंद दिघें अन् विनायक मेटेचं नाव

मुंबई : आज मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली राज्य मंत्रिमंडळाची बैठक मंत्रालयामध्ये पार पडली. या बैठकीत काही महत्वाचे निर्णय घेण्यात आले असून राज्यामधील सरपंच व उपसरपंचांच्या मानधनात दुप्पटीने वाढ करण्यात आली आहे. याव्यतिरिक्त राज्यातील विविध जिल्ह्यात असलेल्या १४ शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था म्हणजेच आयटीआय यांचे नामांतर करण्याचा निर्णयही घेण्यात आलाय. त्यानुसार, या महाविद्यालयांना महापुरुषांचे व संबंधित जिल्ह्यात योगदान दिलेल्या व्यक्तींचे नाव देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. शासनाने १४ आयटीआय यांचे नामांतर करुन १४ महान व्यक्तींची नावेदेखील या आयटीआय संस्थेसाठी दिली आहेत. त्यामध्ये, ठाणे जिल्ह्यातील आयटीआयला धर्मवीर आनंद दिघे यांचं नाव देण्यात आलं आहे. तर, बीडमधील आयटीआयला दिवंगत नेते विनायक मेटे (तळपरूरज्ञ चशींश) यांचं नाव देण्यात आलं आहे.

राज्य मंत्रिमंडलळाच्या बैठकीत राज्यातील १४ आयटीआयचे नामांतर करण्याचा निर्णय घेण्यात आला असून कौशल्य विकास मंत्री मंगलप्रभात लोढा यांच्या खात्याने हा निर्णय घेण्यात आला आहे. या आयटीआय कॉलेजेसला नाव देताना सामाजिक व जातीय समीकरणांचा विचार करण्यात आल्याचं दिसून येते. मुख्यमंत्री एकनाथ शिंदेंचा जिल्हा असलेल्या ठाण्यातील आयटीआयला धर्मवीर आनंद दिघे यांचं नाव देण्यात आलं आहे. तर, डॉ. बाबासाहेब आंबेडकर शिकलेल्या एल्फिन्स्टनमधल्या महाविद्यालयातील आयटीआयला डॉ. बाबासाहेबांचे नाव देण्यात आले आहे. राजर्षि शाहू महाराजांचे कोल्हापूरच्या आयटीआयला देण्यात आलंय तर बीडच्या आयटीआयला विनायक मेटेंचे नाव देण्यात आलं आहे.

नेमकं कोणत्या आयटीआयला कुणाचं नाव?

सध्याची नावे – नव्याने करावयाचे नामकरण

०१. शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था, मुंबई – भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था. ०२ . औद्योगिक प्रशिक्षण संस्था, ठाणे – धर्मवीर आनंद दिघे औद्योगिक प्रशिक्षण संस्था. ०३. शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था, जामखेड, जि. अहमदनगर – पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था. ०४. शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था, बीड – कै. विनायकराव मेटे शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था. ०५. औद्योगिक प्रशिक्षण संस्था, जव्हार, जि. पालघर. – भगवान बिरसा मुंडा औद्योगिक प्रशिक्षण संस्था. ०६. औद्योगिक प्रशिक्षण संस्था, येवला, जि.नाशिक – पालघर महात्मा ज्योतिबा फुले औद्योगिक प्रशिक्षण संस्था. ०७. औद्योगिक प्रशिक्षण संस्था, कोल्हापूर – राजर्षी शाहू महाराज औद्योगिक प्रशिक्षण संस्था. ०८. औद्योगिक प्रशिक्षण संस्था, अमरावती – संत गाडगेबाबा औद्योगिक प्रशिक्षण संस्था, अमरावती. ०९. औद्योगिक प्रशिक्षण संस्था, सांगली – लोकशाहीर आण्णाभाऊ साठे औद्योगिक प्रशिक्षण संस्था. १०. औद्योगिक प्रशिक्षण संस्था, जळगाव – कवयत्री बहिणाबाई औद्योगिक प्रशिक्षण संस्था, जळगाव. ११. औद्योगिक प्रशिक्षण संस्था, आर्वी, जि. वर्धा – दत्तोपंतजी ठेंगडी औद्योगिक प्रशिक्षण संस्था, आर्वी, जि. वर्धा. १२. औद्योगिक प्रशिक्षण संस्था, बेलापूर, नवी मुंबई.– दि. बा. पाटील औद्योगिक प्रशिक्षण संस्था, बेलापूर, नवी मुंबई. १३. औद्योगिक प्रशिक्षण संस्था, कुर्ला, मुंबई. – महाराणा प्रताप औद्योगिक प्रशिक्षण संस्था, कुर्ला, मुंबई. १४. औद्योगिक प्रशिक्षण संस्था, भूम, जि. धाराशिव – आचार्य विदयासागरजी औद्योगिक प्रशिक्षण संस्था, भूम, जि. धाराशिव.

# चाइल्ड पोर्नोग्राफी पाहणे किंवा डाउनलोड करणे POCSO अंतर्गत गुन्हा : सुप्रीम कोर्टा



नवी दिल्ली : सर्वोच्च न्यायालयाने चाइल्ड पोर्नोग्राफीवर मोठा निर्णय देत चाइल्ड पोर्नोग्राफी डाउनलोड करणे किंवा पाहणे हा पॉक्सो कायद्यानुसार गुन्हा असणार असं सर्वोच्च न्यायालयाने म्हंटल आहे. सरन्यायाधीश डीवाय चंद्रचूड, न्यायमूर्ती मनोज मिश्रा, आणि न्यायमूर्ती जेबी परडीवाला यांच्या खंडपीठाने हा निर्णय दिलाय. मद्रास उच्च न्यायालयाच्या निर्णयाला याचिकेत आव्हान देण्यात आले होते.

आता सर्वोच्च न्यायालयाने चाइल्ड पोर्नोग्राफी या शब्दाच्या जागी बाल लैंगिक अत्याचार आणि शोषण सामग्री वापरून झजउडज कायदा बदलण्याचा सल्ला केंद्र सरकारला दिला आहे.

इथून पुढे 'चाइल्ड पोर्नोग्राफी' हा शब्द वापरू नये, असे निर्देशही सर्वोच्च न्यायालयाने सर्व न्यायालयांना दिले आहेत. केवळ एखाद्याच्या वैयक्तिक इलेक्ट्रॉनिक उपकरणावर चाइल्ड पोर्नोग्राफी डाउनलोड करणे किंवा पाहणे हा गुन्हा नाही. उच्च न्यायालयाच्या या निर्णयाविरोधात हे झजउडज कायदा आणि खढ कायद्यांतर्गत गुन्ह्याच्या श्रेणीत येत नाही, छत्रझ जस्ट राईट फॉर चिल्ड्रेन अलायन्सने सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल केली होती.

**मोबाईलवर चाइल्ड पॉर्न असणे हा गुन्हा नाही –**

खंडपीठाने चाइल्ड पोर्नोग्राफी प्रकरणावर सरन्यायाधीश डीवाय चंद्रचूड यांच्या अध्यक्षतेखालील सुनावणी करताना टिप्पणी केली होती की, लहान मुलाचं पॉर्न पाहणे हा गुन्हा असू शकत नाही, परंतु पोर्नोग्राफीमध्ये मुलाचा वापर करणं हा गुन्हा आहे. त्यावर CJI म्हणाले होते की, एखाद्या व्यक्तीकडून व्हिडिओ मिळवणं हे (POCSO) च्या कलम १५ चे उल्लंघन नाही, परंतु तुम्ही जर तो पाहिला आणि इतरांना पाठवला तर तो कायद्याच्या उल्लंघनाच्या कक्षेत येईल. कोणीतरी व्हिडिओ त्याला पाठवला म्हणून तो गुन्हेगार ठरत नाही, असे सरन्यायाधीस म्हणाले.

# वाळूजला मेंढ्यासह समाजबांधवानी केला रास्ता रोको



वाळुज महानगर प्रतिनिधी: एस टी प्रवर्गाच्या आरक्षणाची अंमलबजावणी करण्यात यावी या मागणीसाठी अखिल महाराष्ट्र समाजाच्या वतीने वाळूजच्या लांझी चौकात सोमवार (दि.२३) रोजी रास्ता रोको आंदोलन करण्यात आले.मागणी मान्य होईपर्यत आंदोलन सुरूच ठेवण्याचा निर्णय यावेळी घेण्यात आला.

अखिल महाराष्ट्र धनगर समाजाच्या वतीने राज्यभरात सोमवारी रास्ता रोको आंदोलन पुकारण्यात आले आहे.त्याचाच एक भाग म्हणून आज सोमवारी राष्ट्रीय महामार्गावरील वाळूज येथे आंदोलन करण्यात आले.यावेळी मेंढ्यासह धनगर समाजबांधव या आंदोलनात मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.रास्ता रोकोमुळे दुरवर वाहनांच्या रांगा लागल्या होत्या.वाहतुक कोंडी झाल्याने वाहनधारकांना बराचवेळ रोडवर ताटकळत उभे राहावे लागले.यावेळी अरूण रोडगे,सर्जेराव भोंड,बाजीराव चोरमारे आदींनी आरक्षण कसे हक्काचे आहे यावर प्रकाशझोत टाकला.

६८ वर्षापासून समाज मुलभुत हक्कासह आरक्षणापासून वंचित आहे.समाज आज मेंढपाळसह पशुपालनावरच अवलंबून असून सरकार म्हणते धनगर नाहीत.समाजाची दिशाभुल करणे टाळून आता तात्काळ आरक्षणाची अंमलबजावणी करावी असे यावेळी अनेकांनी सांगितले.यावेळी मंडळाधिकारी एस. आर. भिंगारे,वरिष्ठ पोलिस निरीक्षक राजेंद्र सहाणे यांनी आंदोलकर्त्याचे निवेदन स्विकारले.आंदोलनात योगेश आरगडे,रमेश आरगडे,सचिन रहाटवाड,मधुकर हंडे,सुर्यभान काजळे,नवनाथ वैद्य,श्रीरंग आरगडे यांच्यासह वाळूज, शेंदुरवादा, सावखेडा,तुर्काबाद खराडी,अंबेलोहळ, राजणगाव, दहेगाव बंगला आदी भागातून समाजबांधव सहभागी झाले होते.यावेळी वाळूजचे वरिष्ठ पोलिस निरीक्षक राजेंद्र सहाणे यांनी चोख पोलिस बंदोबस्त ठेवला होता.

त्यात पोउपनि.रमेश राठोड,पोउपनि.संदिप वाघ,पोउपनि. जलीलखा पठाण,वाहतुक शाखेचे उपनि.शंकर शिरसाठ,गोपनीय शाखेचे डी.एम.गढेकर आदींचा समावेश होता.

# रोहित्र दुरूस्तीसाठी नागरिकांचा अभियंत्याला घेराव; पाच दिवसापासून नागरिक अंधारात



वाळुज महानगर प्रतिनिधी: वडगाव गट नंबर ८ मधील नागरिक गेल्या तीन ते चार दिवसापासून अंधारात असून या ठिकाणी एकाच महिन्यात चार ते पाच वेळा रोहित्र बदलूनही जास्तीचा लोड येत असल्याने वीज पुरवठा वारंवार खंडित होत होता. त्यामुळे आज दुपारी दोन वाजता तुम्हाला संतप्त झालेल्या नागरिकांनी रोहित्र दुरुस्त करून कायमस्वरूपी तोडगा काढावा या मागणीसाठी अभियंत्याना घेराव घातला. यावेळी सहायक अभियंता गोविंद दुसंगे यांनी नागरिकांना आठ दिवसात रोहित्र बदलून देण्याचे आश्वासन दिले.

वडगाव परिसरातील गट नंबर परिसरात मोठ्या प्रमाणात कामगार वर्ग राहत असून खूप मोठी नागरी वसाहत या ठिकाणी निर्माण झाली आहे. या परिसरात गेल्या पाच ते सहा महिन्यापासून सतत विजेचा लपंडाव सुरू असल्याने नागरिकांसह विदयार्थ्यांना अनेक समस्यांना तोंड द्यावे लागत आहे. गट नंबर आठ मधील हनुमान मंदिर परिसरात गेल्या चार ते पाच दिवसापासून रोहित्र नादुरुस्त झाल्याने सर्व परिसर अंधारात होता. या अंधारामुळे चोऱ्या होण्याची भीती जास्त होते तसेच या परिसरात मागील वर्षी सात ते आठ घरे फोडण्याच्या घटना घडल्या होत्या. चार दिवस उलटूनही याकडे कोणी लक्षात देत नसल्यामुळे संतप्त झालेल्या नागरिकांनी आज दुपारी दोन वाजता सिडको वाळूज महानगर येथील वीज महावितरणच्या कार्यालयात धडक मारली. रवी भानुसे, सुनिल मेरड,आकाश मगर, सिद्धार्थ दळवी, राजु बनकर,विनोद दौंड, राजेंद्र रहाटगडे, गजानन पाटील यांनी यावेळी उपस्थित असलेले सहाय्यक अभियंता गोविंद दुसंगे यांना घेराव घालत आमचा प्रश्न कायमस्वरूपी निकाली काढावा अशी मागणी केली. दुसंगे यांनी आठ दिवसात दुरुस्त करून देतो, असे आश्वासन दिले. परंतु आठ दिवसांपर्यंत आम्ही अंधारात राहावे का असा प्रश्न करतात दुसंगे यांनी नागरिकांना तुम्ही जसे माझ्याकडे आले तसे वरिष्ठ कार्यालय नारेगावला आहे तिथेही जा असा अजब सल्ला दिला. यावेळी संतप्त झालेल्या नागरिकांनी आता का आम्ही ऊर्जा मंत्र्यांकडे जावे की काय असा प्रश्न उपस्थित केला. त्यावेळी निरुत्तर होत लवकरच वीज पुरवठा सुरळीत करतो,असे आश्वासन दिले.

ज्या ज्या वेळी रोहित्र नादुरुस्त झाले त्या त्या वेळी आमच्याकडून गाडी भाड्यासाठी पैसे घेण्यात आले ते पैसे आम्ही सर्व नागरिकांनी दहा-दहा वीस-वीस रुपये जमा करून दिलेले आहे, प्रत्येक वेळी आमच्याकडून

**महावितरणचे कोणतेही काम हे ठेकेदारामार्फत केले जाते त्यासाठी आम्ही कोणत्याही नागरिकाकडून एक रुपया घेत नाही नागरिक जर रोहित्र घेऊन येण्यासाठी गाडी भाडे घेतल्याचा आरोप करत असेल तर त्या नागरिकांनी आमच्याकडे लेखी तक्रार करावी, त्या तक्रारीवर निश्चितच चौकशी करून कार्यवाही करू. तसेच यापुढे कोणालाही एक रुपयाही देऊ नये असे मी आवाहन करेन.**

**–गोविंद दुसंगे, सहायक अभियंता**

# श्री सरस्वती भुवन विद्यालय बिडकीनच्या एनसीसीच्या विद्यार्थ्यांनी स्वच्छ भारत अभियान अंतर्गत केली नदीची स्वच्छता



तभा वृत्तसेवा

बिडकीन दि २२ सष्टेंबर : पैठण तालुक्यातील श्री सरस्वती भुवन प्रशाला बिडकीन एनसीसीच्या विद्यार्थ्यांनी औरंगाबाद रोड वरील धर्मा माई नदी पात्राची स्वच्छता केली. गणपती विसर्जना दरम्यान नदीपात्रात निर्माल्य व गणपतीचे विसर्जन पाण्यात करण्यात आले होते. त्याचबरोबर पूजेचे साहित्य देखील पाण्यात टाकण्यात आले होते. हे निर्माल्य बाहेर काढण्यासाठी स्वच्छता मोहीम राबवण्यात आली. या स्वच्छता मोहिमेत एनसीसी ऑफिसर बाबासाहेब सोकटकर यांच्या मार्गदर्शनाखाली एनसीसीच्या ८४ विद्यार्थ्यांनी सहभाग घेऊन नदीपात्राची स्वच्छता केली. या स्वच्छता मोहिमेत जवळपास एक घंटागाडी भर इतके निर्माल्य व हानिकारक वस्तू नदीपात्रातून विद्यार्थ्यांनी बाहेर काढल्या . यावेळी यश सर्जे ,सुखदा जोशी, वैष्णवी जाधव या विद्यार्थ्यांनी स्वच्छतेचे व पाणी स्वच्छतेचे महत्त्व सांगितले. गणेश विसर्जनाच्या दिवशी देखील प्रशालेच्या विज्ञान शिक्षिका छाया डुबे यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थ्यांनी निर्माल्याचे संकलन केले होते.या दोन्ही उपक्रमाचे ,राजू शिंदे यांनी स्वच्छता मोहिमेत सहभागी झालेल्या एनसीसी छात्र सैनिकांचे व विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले आहे.

# आमखेडा येथे मोबाईल व्हॅन द्वारे लोक अदालत शिबिर संपन्न



सोयगाव,दि.२३ सप्टेंबर – आमखेडा येथे सोमवार रोजी महाराष्ट्र विधी सेवा समिती यांनी निर्देशित केल्याप्रमाणे तालुका विधी सेवा समिती सोयगाव व तालुका बार संघ सोयगाव यांचे संयुक्त विद्यमाने मोबाईल व्हॅन द्वारे लोक अदालत जनजागृती कायदेविषयक शिबिर आयोजित करण्यात आले होते.सदरील शिबिरात विधीज्ञ विश्वनाथ कळम यांनी जेष्ठ नागरिक कायदा या विषयावर मार्गदर्शन केले तसेच तालुका विधी सेवा समितीचे अध्यक्ष तथा दिवाणी न्यायाधीश रोहित नंदकुमार पाठक यांनी लोक अदालत चे महत्त्व या विषयावर सविस्तर मार्गदर्शन केले.याप्रसंगी सोयगाव तालुका वकील संघाचे ड.सचिन गिरी,ड.शुभम आगे,ड.स्वप्निल सुरळकर,ड.आर. एस. महाजन,तसेच न्यायालयीन कर्मचारी तानाजी शेळके,सहायक अधीक्षक मंगेश देशमुख,संदीप तोंगल,शिवाजी गुरव,रोहित ढेपले,निलेश ताडे,दिवाकर घोंगडे,उदयभान काशीदे इत्यादी उपस्थित होते.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आनंदा चौधरी यांनी केले तर आभार प्रदर्शन आमखेडा गावचे सरपंच गजानन ढगे यांनी केले याप्रसंगी ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# एस.टी मध्ये आरक्षणासाठी धनगर समाजाचे अनोखे आंदोलन



तभा वृत्तसेवा

पैठण दि २३ : धनगर समाज बांधवांना एस टी प्रवर्गा मध्ये सामावेश करणे व प्रमाणात पत्र मिळण्यासाठी पैठण तालुक्यातील पिंपळवाडी (पिराची),दावरवाडी आणि बिडकीन येथे मेंढ्या घेऊन रस्ता रोको करण्यात आला.

यावेळी शारदाताई पांढरे आमदार गोपीचंद पडळकर प्रतिष्ठान महाराष्ट्र राज्य सदस्य तथा समाजसेविका धनगर समाज आप्पासाहेब सोलाट सोमनाथ जाधव माजी पंचायत समिती सदस्य ओबीसी नेते प्रकाश भाऊ दिलवाले आप्पासाहेब भोंडे धनगर समाज उन्नती मंडळाध्यक्ष जिजाभाऊ मिसाळ समाजसेवक धनगर समाज मोहनराव जानकर शिवाजी जाधव, सचिन जाधव कल्याण दिलवाले कल्याण सरग शिवाजी राजाळे राम भोजने जगदीश वीर पाचे घोंगडे नाचन राजगे रांजणे दिलवाले डोईफोडे सह पैठण तालुक्यातील समाज बांधव मोठया संख्येने उपस्थित होते.

# जरांगे यांच्या समर्थनात पैठण कडकडीत बंद



तभा वृत्तसेवा

पैठण दि २३: मराठा समाजाला ओबीसीतून आरक्षण मिळावे म्हणून मराठा आरक्षण संघर्ष योद्धा मनोज पाटील जरांगे हे पुन्हा एकदा आमरण उपोषणाला बसल्याने त्यांची प्रकृती दिवसेंदिवस खालवत चालली आहे. त्यामुळे त्यांच्या जीवाला धोका निर्माण होऊ शकतो. सरकारने याकडे गांभीर्याने लक्ष द्यावे म्हणून पैठण तालुक्यातील सकल मराठा समाजाच्या वतीने शांततेच्या मार्गाने आंदोलन करण्यात आले. वैद्यकीय सेवा वगळता पैठण शहर व तालुक्यात कडकडीत बंद पाळण्यात आला, सकल मराठा समाजाचे आंदोलक यात सहभागी होते.

मराठा आणि कुणबी एकच आहेत. त्यामुळे सकल मराठा समाजास ओबीसीतून आरक्षण द्यावे. बॉम्बे गॅझेट , सातारा गॅझेट, हैदराबाद गॅझेटचे पुरावे ग्राह्य धरावे. मराठा आंदोलक मनोज पाटील जरांगे यांची प्रकृती खालवत आहे सरकारने गांभीर्याने विचार करावा. समाजाच्या मागण्या तात्काळ मान्य कराव्यात व मराठा समाजाला ओबीसीतून आरक्षण द्यावे.या मराठा आंदोलकांच्या मागण्या होत्या.

सकल मराठा समाजाच्या वतीने छत्रपती शिवाजी महाराज स्मारक परिसर येथून मुख्य रस्त्याने पायी रॅली काढण्यात आली. आंदोलकांनी व्यापाऱ्यांना प्रतिष्ठाने बंद ठेवण्याचे आवाहन केले गेले. डोक्यावर भगवी टोपी, गळ्यात रुमाल घालून एक मराठा लाख मराठा, लढेंगे, जितेंगे, हम सब जरांगे, जय जिजाऊ जय शिवराय अशा घोषणा देण्यात आल्या.

पाचोड फाटा येथे मराठा समाजाच्या वतीने भव्य असा रस्ता रोको करण्यात आला यावेळी वाहनाच्या लांबच लांब रांगा लागलेल्या दिसून आल्या. बंद व रस्ता रोको शांततेच्या मार्गाने आंदोलन करण्यात आले.

बंदसाठी व्यापारी बांधवांनी उस्फूर्तपणे आपले दुकाने बंद ठेवत सहकार्य केले.

## अजिंठा डोंगरात धुव्वाधार पाऊस;-,खटकाळी नदीला पूर

तभा.वृत्तसेवा

सोयगाव; दि.२३ सप्टेंबर

तालुक्यातील घोसला शिवाराला लागून असलेल्या अजिंठा डोंगर परिसरात तासभर झालेल्या धुव्वाधार पावसाने घोसला गावाच्या खटकाळी नदीला सायंकाळी सहा वाजता पूर आला त्यामुळे सोयगाव ते बनोटी वाहतूक ठप्प झाली होती दरम्यान अजिंठ्याच्या डोंगरात झालेल्या पावसाने घोसला गावाच्या खटकाळी नदीला मोठा पूर आला आहे

घोसला शिवारात निमखेडी,बहुलखेडा, उमर विहिरे, नांदगाव नांदगाव तांडा या परिसरात पाच ते दहा मिनिटे किरकोळ पाऊस झाला परंतु या परिसरात लागून असलेल्या अजिंठा डोंगरात झालेल्या तासभर धुव्वाधार पावसाने मात्र गावाची नदी दुथडी भरून वाहत होती गावात किरकोळ पाऊस असताना अचानक आलेल्या या पुरामुळे ग्रामाथांच्या भुवया उंचावल्या होत्या मात्र घोसला परिसरात झालेल्या या दहा मिनिटाच्या पावसाने वेचणी वर आलेला कापूस भिजला होता त्यामुळे पुन्हा नुकसानीने तोंड वर काढले आहे.



## जाहीर प्रगटन

**मा. दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) सोयगांव यांचे न्यायालयात, जि. औरंगाबाद दिवाणी किरकोळ**

अर्ज क्रं. १३३ /२०२४.

१. विलास भिमराव सोनवणे, वय ४५ वर्षे, धंदा शेती, रा. गलवाडा अ, ता.सोयगांव, जि. छ. संभाजीनगर. २. संगिताबाई राजु शेजवळ, वय ४१ वर्षे, धंदा घरकाम, रा. भडगांव, ता. भडगांव, जि. जळगांव, ३. पुष्पा किशोर सोनवणे, वय ३५ वर्षे, धंदा शेती, रा. गलवाडा अ, ता.सोयगांव, जि. छ. संभाजीनगर, ४. उज्वला राजेश जाधव, वय ३५ वर्षे, धंदा घरकाम, रा. भुसावळ, ता. भुसावळ, जि.जळगाव. ५. राहुल भिमराव सोनवणे, वय ३० वर्षे धंदा शेती, रा. गलवाडा अ, ता.सोयगांव, जि. छ.संभाजीनगर

विरुद्ध

निल

प्रकरण :– वारसप्रमाणपत्र मिळणे बाबत

सर्व संबंधितास जाहिर प्रकटनाद्वारे कळविण्यात येते की, उपरोक्त अर्जदाराने वारसप्रमाणपत्र मिळणेसाठी ॲड. शुभम अशोक आगे, सोयगांव, ता. सोयगांव, जि. छ. संभाजीनगर यांच्या मार्फत या न्यायालयात अर्ज दाखल केलेला आहे. मयत लक्ष्मीबाई भिमराव सोनवणे यांचा दिनांक २७/०६/२०२३ रोजी मौजे गलवाडा अ येथे मृत्यु झालेला असुन त्यांच्या पश्च्यात वरील अर्जदार क्रं. १ ते ५ वारस आहे असा अर्ज मा. न्यायालयात दाखल केलेला आहे.

तरी ज्या कोणाला अर्जदाराच्या वारस प्रमाणपत्र देण्याकरीता उजर अगर आक्षेप असेल त्यांनी हे जाहीर प्रकटनाद्वारे प्रसिद्ध केल्यापासुन ३० दिवसांच्या आत या न्यायालयात योग्य त्या कागदपत्रासह आपला आक्षेप नोंदवावा अन्यथा अर्जदार यांना कायदेशीररित्या योग्य ते प्रमाणपत्र देण्यात येईल

आजरोजी दिनांक १९/०९/२०२४ रोजी सही व न्यायालयाच्या शिक्क्यासह दिले असे.

पु.ता. २२/१०/२०२४

आदेशावरुन,

विभीगीय लिपीक सहाय्यक अधिक्षक

दिवाणी व फौजदारी न्यायालय सोयगांव

---

संत गाडगेबाबा ग्रामस्वच्छता अभियान पुरस्कार वितरण सोहळा

# गाव आणि मन कायम स्वच्छ ठेवा–गुलाबराव पाटील

छत्रपती संभाजीनगर, दि.२३(जिमाका):– स्वच्छता व त्यामाध्यमातून लोकांचे आरोग्य चांगले राखण्यासाठी संत गाडगेबाबा ग्रामस्वच्छता अभियान सुरु करण्यात आले. स्पर्धेमुळे गावा गावांत स्वच्छतेसाठी चढाओढ लागली, ही एक चांगली बाब आहे. मात्र केवळ स्पर्धेपुरते गाव स्वच्छ ठेवू नका. गाव आणि मन स्वच्छ ठेवण्याचा कायम प्रयत्न करा, त्यातच आपली प्रगती आहे, असे प्रतिपादन राज्याचे पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री गुलाबराव पाटील यांनी आज येथे केले.

संत गाडगेबाबा ग्रामस्वच्छता अभियान अंतर्गत राष्ट्रसंत तुकडोजी महाराज स्वच्छ ग्राम स्पर्धेचा राज्यस्तरीय पुरस्कार वितरण सोहळा आज येथील संत एकनाथ रंगमंदिरात पार पडला. सन २०१८–१९, २०१९–२०, २०२०–२१, २०२१–२२ अशा एकत्रित स्पर्धांचे आज पुरस्कार वितरण मान्यवरांच्या हस्ते पार पडले.

अध्यक्षस्थानी अल्पसंख्याक विकास, औकाफ व पणन मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री अब्दुल सत्तार हे होते. तसेच पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री गुलाबराव पाटील, गृहनिर्माण व इतर मागास बहुजन कल्याण मंत्री अतुल सावे, राज्यसभा सदस्य खासदार डॉ. भागवत कराड, पाणीपुरवठा व स्वच्छता विभागाचे प्रधान सचिव संजय खंदारे, अभियान संचालक ई. रविंद्रन, अतिरिक्त संचालक शेखर रौंदळ, विभागीय आयुक्त दिलीप गावडे, जिल्हाधिकारी दिलीप स्वामी, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी विकास मीना आदी मान्यवर सोहळ्यास उपस्थित होते.

---

## जाहीर प्रगटन

**मा.दिवाणी न्यायाधिश न्यायालय क.स्तर गंगापुर, ता. गंगापुर जि. औरंगाबाद**

दिवाणी किरकोळ अर्ज नं. ३९५/२०२४

अर्जदार : १. गयाबाई किसन जाधव, रा.सिरसाठ गल्ली, ल्ली, लासुर स्टेशन, ता. गंगापुर जि. औरंगाबाद २. जमुनाबाई धन्नु किर्तीकर, रा.हसुल, लासुर स्टेशन, ता.गंगापुर जि. औरंगाबाद ३. परिगाबाई कडुजी शिंदे, रा. महेबुबखेडा, ता. गंगापुर जि. औरंगाबाद ४. सुधाकर धन्नु किर्तीकर, रा.रो हाऊस नं. १, शिल्प सिध्दी रो हाऊस, कॅनल रोड, बच्छाव क्लासेस जवळ, स्वामी समर्थ नगर, जेल रोड, नाशिक रोड, नाशिक ५. लताबाई कारभारी पठारे, रा.अनंतपुर, लासुर स्टेशन, ता. गंगापुर जि.औरंगाबाद ६. राजेंद्रकुमार धन्नु किर्तीकर, रा.प्लॉट नं. ३२, सर्वे नं. १५९/१. धनश्री कॉलनी, मयुर पार्क, बिल्डींग नं. बी ४ मागे, हर्सुल, औरंगाबाद ७. रविंद्र धन्नु किर्तीकर, रा. फ्लॅट नं. बी–१, प्लॉट नं. १०८, अमृत कॉम्पलेक्स, पैठण रोड, रेल्वे पुल जवळ, जालान नगर, औरंगाबाद

विरूध्द

प्रतिपक्षी – निरंक

प्रकरण – वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत.

ज्याअर्थी अर्जदार नं. १ ते ७ यांची आई नामे सोनाबाई धन्नु किर्तीकर हे दि. १७/०७/१९९१ रोजी मौजे सावंगी लासुर स्टेशन, ता. गंगापुर येथे मृत्यु पावले असुन अर्जदार नं. १ ते ७ यांचे पिता नामे दामोधर उर्फ धन्नु नामदेव किर्तीकर हे दि.०४/०३/२००९ रोजी अमृत कॉम्पलेक्स, जालाननगर, औरंगाबाद येथे मृत्यु पावले आहे. वर नमुद अर्जदारांनी मयताचे वारस प्रमाणपत्र मिळणे कामी ॲड.श्री.ए.एस.बर्वे, गंगापुर यांचे मार्फत या न्यायालयात अर्ज सादर केला आहे.

त्याअर्थी अर्जदार यांना या न्यायालया तर्फे वारस प्रमाणपत्र देणे कामी कोणाचाही कोणत्याही प्रकारचा आक्षेप असल्यास जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्याचे तारखेपासून ३० दिवसाचे आत या न्यायालयात लेखी आक्षेप स्वतः अथवा आपल्या विधीज्ञा मार्फत नोंदवावा. मुदतीचे आत आक्षेप प्राप्त न झाल्यास पुढील कायदेशीर कार्यवाही नियमाप्रमाणे करून अर्जदारांना वारस प्रमाणपत्र देण्यात येईल. सदरचे जाहीर प्रगटन माझ्या सहीनिशी व या न्यायालयाच्या शिक्यानिशी प्रसिध्दीस देण्यात येत आहे.

दि.२३/०९/२०२४

आदेशावरून

सहायक अधिक्षक

दिवाणी न्यायालय क स्तर गंगापुर

---

## जाहीर प्रगटन

**उपविभागीय अधिकारी कार्यालय कन्नड**

जा.क्र. २०२४/मशाका/जमाबंदी–१/ जन्म–मृत्यु नोंद/सिआर–५५९ उपविभागीय अधिकारी कार्यालय कन्नड दिनांक/४/०९/२०२४

अर्जदार : फारूक मोहीन सय्यद रा. जुना बस स्टँड कन्नड, ता. कन्नड जि.छ. संभाजीनगर

विरूध्द

गैरअर्जदार : नगर परिषद कार्यालय कन्नड ता. कन्नड जि. छत्रपती संभाजीनगर

विषय :– जन्म–मृत्यु अधिनियम १९६१ चे कलम १३ (३) अन्वये अर्ज.

उपरोक्त विषयी अर्जदार यांनी अर्ज सादर करून अर्जदार यांच्या मुलगाच्या जन्म प्रमाणपत्र मिळविण्यासाठी अर्ज दाखल केला आहे की, अर्जदार यांच्या मुलगाचा जन्म दिनांक ०१–०१–२०११ रोजी कन्नड ता. कन्नड येथे झालेला आहे.

अर्जदार यांच्या मुलगाचा जन्म दिनांक ०१–०१–२०११ रोजी कन्नड ता. कन्नड येथे झालेला आहे. अर्जदार यांना शासकीय, निमशासकीय कामासाठी जन्म प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. त्यामुळे तसा अर्ज अर्जदार यांनी मा. न्यायालयात दाखल केलेला आहे.

सदर जाहिर प्रगटनाव्दारे तमाम जनतेस सुचीत करण्यात येते की, अर्जदार यांच्या मुलगाचा जन्म दिनांक ०१–०१–२०११ रोजी कन्नड येथे जन्म झाल्याचे जन्म प्रमाणपत्र देण्यास कोणास काही उजर/आक्षेप असल्यास त्यांनी हे जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन ३० दिवसाच्या आत म्हनजेच प्रकरणाच्या पुढील सुनावणी दिनांक १३–११–२०२४ रोजी मा. न्यायालयात लेखी स्वरूपात आपला आक्षेप नोंदवावा. मुदतीत कोणचाही आक्षेप/उजर न आल्यास अर्जदारास दिनांक ०१–०१–२०११ रोजी कन्नड येथे जन्म झाल्याचे जन्म प्रमाणपत्र देण्यात येईल व मुदतीतनंतर आलेला उजर/आक्षेप ग्राहय धरला जाणार नाही.

करिता दिनांक १८/०९/२०२४ रोजी सदर जाहिर प्रगटन माझ्या सहीनिशी व मा. न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले आहे.

उपविभागीय अधिकारी कन्नड

---

## जाहीर प्रगटन

**मा. व्ही.एन. काटकर साहेब दिवाणी न्यायाधिश साहेब कनिष्ठ स्तर कन्नड यांचे न्यायालयात.**

दि.क्रि. अर्ज.क्रं.१८२/२०२४

पुढील तारीख १०/१०/२०२४.

अर्जदार : १. हारुण नसरुद्दीन शेख, वय ६३ वर्षे, धंदा मजुरी, रा. काझी मोहल्ला, कन्नड ता. कन्नड जि. औरंगाबाद. २. राबियाबी भ्र. सरदार पठाण, वय ७१ वर्षे, धंदा घरकाम, रा. मेहताब नगर, कन्नड ता. कन्नड जि. औरंगाबाद. ३. इम्रान पिता रशीद शेख, वय ४२ वर्षे, धंदा मजुरी, रा. काझी मोहल्ला, कन्नड ता. कन्नड जि. औरंगाबाद. ४. असमाबी भ्र. रऊफ सय्यद, वय ४७ वर्षे, धंदा घरकाम, रा. रुईखेडा, टापरगांव ता. कन्नड, जि. औरंगाबाद. ५. हुमेरा भ्र. मुस्तकीम शेख, वय ४१ वर्षे, धंदा घरकाम, रा. खिडकी का बंगला, कन्नड ता. कन्नड जि. औरंगाबाद. ६. उजमा भ्र. वहीद खान, वय ३४ वर्षे, धंदा घरकाम, रा. बडा बंगला, कन्नड ता. कत्रड जि. औरंगाबाद.

विरुद्ध

गैरअर्जदार :– महाराष्ट्र शासन द्वारा जिल्हाधिकारी कार्यालय औरंगाबाद.

अर्ज :– बॉम्बे रेग्यूलेशन ॲक्ट १८२७ चे कलम २ व ३ प्रमाणे वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत.

ज्याअर्थी अर्जदार यांनी त्यांचे वकील ॲड. एच.जी. शेख यांचे मार्फत या न्यायलयात अर्ज सादर केला आहे की, मयत नसिरुद्दीन ताजमोहम्मद हवालदार (शेख) हे मौजे कन्नड येथील रहिवाशी होते. मयत नसिरुद्दीन ताजमोहम्मद हवालदार (शेख) हे दिनांक १४/०३/१९९६ रोजी मौजे कन्नड ता. कन्नड जि. औरंगाबाद येथे वृद्धपकाळाने मयत झाले आहे. मयत नसिरुद्दीन ताजमोहम्मद हवालदार (शेख) यांना अर्जदार क्र. १ हारुण नसरुद्दीन शेख व रशीद नसिरुद्दीन शेख अशी २ मुले असून अर्जदार क्र. २ राबियाबी भ्र. सरदार पठाण ही मुलगी होती व आहे. ज्यात रशीद नसिरुद्दीन शेख हा दिनांक १०/०१/२०२० रोजी मौजे कन्नड येथे आजारपणामुळे मयत झाला असून त्यांना अर्जदार क्र. ३ मुलगा व अर्जदार क्र. ४ ते ६ अशी विवाहित मुली असून असे ४ आपत्य आहे. अर्जदार क्रं. १ ते ६ यांना मयत नसिरुद्दीन ताजमोहम्मद हवालदार (शेख) यांच्या मृत्यू पश्चात शासकिय व निमशासकिय कार्यालय व महसूल दप्तरी लाभ घेण्याकरिता अर्जदार हे मयताचे वारस असल्याबाबत वारस प्रमाणपत्राची आवश्यकता असल्याने अर्जदार क्रं. १ ते ६ हे मयताचे वारस असल्याचे निश्चित होवून तत्संबंधीचे वारस प्रमाणपत्र मिळणे आवश्यक असल्यामुळे दि.२२/०७/२०२४ रोजी अर्जास कारण घडले आहे. मयत नसिरुद्दीन ताजमोहम्मद हवालदार (शेख) हे मौजे कन्नड, ता. कन्नड येथे राहत असतांना आजारपणामुळे मयत झाले आहे. सदरील मयतास अर्जदार क्रं. १ ते ६ हे वारस असून वेळोवेळी वेगवेगळ्या कार्यालयात वारस प्रमाणपत्राची आवश्यकता भासत असल्यामुळे सदरील अर्जास कारण मौजे कन्नड, ता. कन्नड येथे घडले. त्याअर्थी सदर जाहीर प्रगटनाद्वारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, अर्जदार यांनी अर्ज केल्यानुसार वारसा प्रमाणपत्रासाठी परवानगी देण्याबाबत ज्या कुणास, कुठल्याही स्वरुपाचा उजर आक्षेप वगैरे असल्यास त्यांनी हे जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्यापासून तीस (३०) दिवसांच्या आत आपला उजर, आक्षेप वगैरे मा. न्यायलयात नोंदवावा. मुदतीत उजर आक्षेप न आल्यास अर्जदाराच्या नावे वारसा प्रमाणपत्र देण्यात येईल. त्यानंतर आलेला उजरआक्षेप ग्राह्य धरला जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

दिनांक : १२/०९/२०२४.

आदशावरून

कनिष्ठ लिपीक सहाय्यक अधिशक

दिवाणी न्यायधीश क. स्तर, कन्नड

---

## जाहीर प्रगटन

**मा.दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) सोयगांव यांचे न्यायालयात, जि. औरंगाबाद दिवाणी किरकोळ**

अर्ज क्रं. १२९ /२०२४. नि. क्रं.

१. बाळु बाबुलाल पाटील, वय ६३ वर्षे, धंदा शेती, रा. पोहरी ख, ता.सोयगांव, जि. छ. संभाजीनगर.

विरुद्ध

निल

प्रकरण :– वारसप्रमाणपत्र मिळणे बाबत

सर्व संबंधितास जाहिर प्रकटनाद्वारे कळविण्यात येते की, उपरोक्त अर्जदाराने वारसप्रमाणपत्र मिळणेसाठी ॲड. शुभम अशोक आगे, सोयगांव, ता. सोयगांव, जि. छ. संभाजीनगर यांच्या मार्फत या न्यायालयात अर्ज दाखल केलेला आहे. मयत प्रमिलाबाई बाबुलाल पाटील यांचा दिनांक २८/०६/२०२३ रोजी मौजे पोहरी ख येथे मृत्यु झालेला असुन त्यांच्या पश्च्यात वरील अर्जदार वारस आहे असा अर्ज मा. न्यायालयात दाखल केलेला आहे.

तरी ज्या कोणाला अर्जदाराच्या वारस प्रमाणपत्र देण्याकरीता उजर अगर आक्षेप असेल त्यांनी हे जाहीर प्रकटनाद्वारे प्रसिद्ध केल्यापासुन ३० दिवसांच्या आत या न्यायालयात योग्य त्या कागदपत्रासह आपला आक्षेप नोंदवावा अन्यथा अर्जदार यांना कायदेशीररित्या योग्य ते प्रमाणपत्र देण्यात येईल

आजरोजी दिनांक १९/०९/२०२४ रोजी सही व न्यायालयाच्या शिक्क्यासह दिले असे.

पु.ता. २१/१०/२०२४

आदेशावरुन,

विभीगीय लिपीक सहाय्यक अधिक्षक

दिवाणी व फौजदारी न्यायालय सोयगांव

---

## जाहीर प्रगटन

**मा.वी. एन. काटकर साहेब दिवाणी न्यायाधिश कनिष्ठ स्तर कन्नड यांचे न्यायालयात.**

दि.क्रि. अर्ज. क्रं. १९७/२०२४, घरकाम, पु.ता.१९–१०–२४

अर्जदार : १. शेख तायराबी शेख गुलाब, वय ७४ वर्षे, धंदा रा. पळशी बु ता. कन्नड जि. औरंगाबाद. २. इसाक गुलाब शेख, वय ४८ वर्षे, धंदा शेती, रा. पळशी बु ता. कन्नड जि. औरंगाबाद ३. शेख इल्यास शेख गुलाब, वय ४५ वर्षे, धंदा शेती, रा. पळशी बु ता. कन्नड जि. औरंगाबाद ४. लतीफा बी शेख तायर शेख, वय ५८ वर्षे, धंदा घरकाम, रा. जामडी प्र बहाल ता. चाळीसगाव जी. जळगाव ५. जुबेदाबी याकुब बेग मिरझा, वय ४६ वर्षे, धंदा घरकाम, रा. आजाद नगर नगरदेवला ता. पाचोरा जी. जळगाव

विरुद्ध

गैरअर्जदार : महाराष्ट्र शासन द्वारा जिल्हाधिकारी कार्यालय औरंगाबाद.

अर्ज : बॉम्बे रेग्यूलेशन ॲक्ट १८२७ कलम २ व ३ प्रमाणे वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत.

ज्याअर्थी अर्जदार यांनी त्यांचे वकील ॲड. शेख कामरान रफिक यांचे मार्फत या न्यायलयात अर्ज सादर केला आहे की, अर्जदार क्रं. १ ही मयत गुलाब वजीर शेख यांची पत्नी आहे. अर्जदार क्रं. २ व ३ हे मुले आहे व तसेच अर्जदार क्रं. ४ व ५ ह्या मयताच्या विवाहित मुली आहेत. अर्जदार क्रं. २ ते ५ हे आपसात सख्खे भाऊ बहिण असून अर्जदार क्रं. १ ही त्यांची आई आहे. अर्जदार क्रं. १ ते ५ हे मयत गुलाब वजीर शेख यांचे कायदेशीर वारस आहे. अर्जदार क्रं. १ चे पती व अर्जदार क्र. २ ते ५ यांचे वडील नामे मयत गुलाब वजीर शेख हे दि. २४/१२/२०२२ रोजी मौजे पळशी बु ता. कन्नड येथे वृद्धपकाळामुळे मरण पावले आहे. अर्जदार क्रं. १ ते ५ यांना मयत गुलाब वजीर शेख यांचे मृत्यू पश्चात तहसिल कार्यालय, नगर पालिका कार्यालय, ग्रामपंचायत कार्यालय, उपअधिक्षक भूमि अभिलेख कार्यालय, गाव, नगर व शहर भूमापन कार्यालय, महानगर पालिका, तलाठी कार्यालय, गट विकास अधिकारी कार्यालय व इतर शासकिय व निमशासकिय कार्यालय मध्ये आवश्यक ते कामासाठी वारस प्रमाणपत्राची आवश्यकता असल्याने अर्जदार क्रं. १ ते ५ हे मयताचे वारस असल्याबाबत कायदेशीर वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. अर्जदार क्रं. १ ते ५ हे व त्यांचे मयत वडील नामे मयत गुलाब वजीर शेख हे मौजे पळशी बु ता. कन्नड येथील मुळचे रहिवाशी होते व येथे राहत असतांना वदधपकाळाने मयत झाले आहे. सदरील मयतास अर्जदार क्रं. १ ते ५ हे वारस असून वेळोवेळी वेगवेगळ्या कार्यालयात वारस प्रमाणपत्राची आवश्यकता भासत असल्यामुळे सदरील अर्जास कारण दि. २६/०८/२०२४ रोजी मौजे कन्नड ता. कन्नड येथे घडले. त्याअर्थी सदर जाहीर प्रगटनाद्वारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, अर्जदार यांनी अर्ज केल्यानुसार वारसा प्रमाणपत्रासाठी परवानगी देण्याबाबत ज्या कुणास, कुठल्याही स्वरुपाचा उजर आक्षेप वगैरे असल्यास त्यांनी हे जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्यापासून तीस (३०) दिवसांच्या आत आपला उजर, आक्षेप वगैरे मा. न्यायलयात नोंदवावा. मुदतीत उजर आक्षेप न आल्यास अर्जदाराच्या नावे वारसा प्रमाणपत्र देण्यात येईल. त्यानंतर आलेला उजरआक्षेप ग्राह्य धरला जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

दिनांक :–१९/०९/२०२३.

आदेशवरून

कनिष्ठ लिपीक सहाय्यक अधिक्षक

दिवाणी न्यायाधीश क. स्तर. कन्नड

---

## दि अहमदनगर डिस्ट्रिक्ट सेंन्ट्रल को–ऑपरेटिव्ह बँक लि. अहमदनगर

हेड ऑफिस :स्टेशन रोड. अहमदनगर . ४१४००१. पो.बा.नं.४२

## जाहीर प्रगटन

अहमदनगर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेची स्थापना मे–१९५८ रोजी झाली असुन आज जिल्ह्यातील सहकारी संस्था, शेतकरी, कामगार अशा अनेक घटकांचा बँकेच्या मदतीने विकास झालेला आहे. अहमदनगर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक राज्यामध्ये अग्रेसर सहकारी बँक असुन आजतागायत बँकेला सातत्याने ऑडिट वर्ग– अ मिळत असुन बँक दरवर्षी नफ्यात आहे. बँकेची घौडदौड ही यशस्वीरीत्या बँकेच्या वेळोवेळीचे संचालक मंडळ, कर्मचारी व सभासदांच्या सहकार्याने चाललेली आहे. या यशस्वी वाटचालीचा विचार करता बँकेची माहे मार्च–२०२१ व माहे ऑगस्ट–२०२४ ची तुलनात्मक आर्थिक परिस्थिती खालील प्रमाणे.

(रक्कम रु.कोटीत)

| अ.क्र. | तपशिल | माहे मार्च. २०२१ अखेर | माहे ऑगस्ट २०२४ अखेर | अ.क्र. | तपशिल | माहे मार्च. २०२१ अखेर | माहे ऑगस्ट २०२४ अखेर |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | भागभांडवल | २७९.४३ | ३६४.८१ | ५. | येणेकर्ज | ५७३१.७२ | ८७६०.३५ |
| २. | निधी | ७७९.४४ | १२६६.७५ | ६. | निव्वळ नफा | ४२.५४ | ५८.७४ (मार्च २०२४) |
| ३. | ठेवी | ८३६४.८२ | १०३३३.०७ | ७. | लाभांश | ९.५०% | १०% (प्रस्तावीत) |
| ४. | गुंतवणुक | ३७६९.८४ | ३४६९.१३ | ८. | खेळते भांडवल | १०७७०.६३ | १३४२४.४६ |

अहमदनगर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या संदर्भात काही दिवसांपासून वृत्त पत्रांमध्ये बातम्या येत आहे त्यामुळे बँकेच्या नांव लौकीकावर परिणाम होत असून बँकेची आर्थिक परिस्थीती अतिशय भक्कम आहे. राज्यात बँकींग व्यवसाय स्पर्धेमध्ये अहमदनगर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक टिकून असुन बँकेने ग्राहकांना जलद सेवा उपलब्ध होण्याकरीता स्वतंत्र आयएफएससी कोड घेतला आहे. बँकेने बँकींग व्यवहाराकरीता ग्राहकांना मोबाईल ॲप उपलब्ध करुन दिलेले आहे. देशात अशा सुविधा देणाऱ्या फार थोड्या जिल्हा सहकारी बँकांपैकी अहमदनगर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक ही एक आहे. याच बरोबर बँकेने एनी ब्रँच बँकींग (एबीबी), आरटीजीएस, एनईएफटी, आयएमपीएस, एसएमएस अलर्ट, ई–मेल शेड्युलर, शेतकरी यांचे करीता रुपे किसान क्रेडिट कार्ड, ग्राहकांसाठी रुपे डेबिट कार्ड, युपीआय अशा अनेक संगणकीय सुविधा बँक ग्राहकांना पुरवित आहे.

या सर्व सुविधा उपलब्ध करताना बँकेने दुरदृष्टी ठेवून त्याकाळी राज्यात आघाडीवर राहुन सन–१९८५ मध्ये संगणकीय करणास सुरवात केली. सन–२००८ मध्ये नवीन कोअर बँकींग प्रणाली मध्ये सहभाग घेतला त्यानंतर बँकेने टप्या–टप्प्याने या प्रणाली मध्ये सुधारणा करीत शासनाच्या व नाबार्डच्या मार्गदर्शनाखाली बँकेने संगणकीय सुविधा भक्कमपणे ग्राहकांना उपलब्ध करुन दिल्या आहेत. यात विशेष बाब म्हणजे सन–२००८ नंतर बँकेने डेटा सेंटार मध्ये सर्व्हर व इतर बाबी न बदलता तशाच चालू ठेवल्या होत्या. दरम्यानच्या काळात बँकेने सायबर सिक्युरिटीचे दृष्टीने नाबार्ड व रिझर्व्ह बँकेच्या सुचनेनुसार आधुनिक संगणक सर्व्हर, फायरवॉल इत्यादी तांत्रीक गोष्टी उभारणे हे रिझर्व्ह बँकेच्या नियमानुसार व बँकेच्या मोठ्या आर्थीक व्यवहारांमुळे गरजेचे बनले. त्यानुसार बँकेने संगणकीय यंत्रणेचे अपग्रेडेशन करीत असुन यासाठी कायम स्वरुपी खर्च रक्कम रु.२९.७० कोटी खर्च येणार आहे. तसेच यासाठी यापुर्वी ए.एस.पी. कंपनीस प्रतिमाह प्रति ब्रँच रु.१३५००/– देत होतो. आता अपग्रेड झाले नंतर तो प्रति माह प्रति शाखा रु.१९०००/– होणार आहे. म्हणजे त्यात फार मोठी वाढ झालेली नाही. हे सर्व पाहता संगणकीय यंत्रणेकरीता बँक करीत असलेला खर्च वाजवी असून सदरचा खर्च संगणकीय कालबाह्य यंत्रणेमुळे करणे गरजेचे आहे. हा खर्च राज्यातील इतर बँकांच्या संगणकीय खर्चापेक्षा कमी आहे.

बँकेची नफा क्षमता वाढविण्यासाठी बँकने महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेतील कमी व्याजदराच्या रक्कम रु.१००० कोटीच्या ठेवी काढून जास्त व्याज दर देणाऱ्या बँकांमध्ये मुदत ठेवी मध्ये गुंतवणुक केली आहे. त्यामुळे बँक नफा क्षमता वाढीसाठी जास्त व्याज देणाऱ्या बँकांमध्ये गुंतवणुक करीत असते. हा बँकींग व्यवसायातील दैनंदिन व्यावहारीक भाग आहे. सदर ठेवीचा बँकने इतरत्र कुठेही वापर केलेला नाही. बँकेने सन २०२३–२४ मध्ये जिल्ह्यामधील ३६०८६८ शेतकरी सभासदांना रक्कम रु.३०५३ कोटींचे पीक कर्जाचे वाटप केलेले आहे. यामध्ये जिल्ह्यातील शेतकऱ्यांसाठी सर्व बँकांनी दिलेल्या पीक कर्जापैकी एकट्या अहमदनगर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचा ६५ टक्के वाटा आहे. जिल्ह्यातील शेतकऱ्यांचा विकास हा केंद्र बिंदू मानून जिल्ह्यातील ग्रामीण अर्थकारण सुधारण्याच्या दृष्टीने जिल्हा बँक नेहमीच आघाडीवर असते.

जिल्ह्यातील शेतकऱ्यांचे व ग्रामीण भागाचे विकासाचे केंद्र बिंदू असलेले सहकारी साखर कारखाने आहेत. या सहकारी साखर कारखान्यांचा गळीत हंगाम हा पुर्णत: निसर्गावर अवलंबून आहे. त्यामुळे त्यांना कधी ऊस जास्त उपलब्ध होतो तर कधी अत्यंत अल्प ऊस उपलब्ध होतो. अशा परिस्थितीत कारखान्यांना अनेक अडचणी येतात. म्हणुन सहकारी साखर कारखान्यांना कर्ज पुरवठा मोठ्या प्रमाणावर केला जातो. कारखानदारीला उभारणी पासून त्यांच्या आर्थीक बाबी पुर्ततेसाठी बँक नेहमीच दोन पाऊले पुढे असते. सहकारी साखर कारखान्यांच्या समोरील आर्थिक अडचणींचा विचार करुन बँक सहकारी कारखान्यांना कर्ज पुरवठा करीत आहे. यामुळे बँकेच्याही नफा क्षमतेतही वाढ झालेली आहे. जिल्हा बँकेने सहकारी साखर कारखान्यांना केलेला कर्ज पुरवठा सुरक्षीत असुन आज कारखाने बँकेची नियमीत कर्ज परतफेड करीत आहेत.

जिल्ह्यातील शेतकऱ्यांना जिल्हा बँक मोठ्या प्रमाणावर सवलतीच्या दरात पीक कर्ज वाटप करीत असून यामध्ये बँकेला फारसा लाभ होत नाही. तथापी जिल्हा बँक सहकारी साखर कारखान्यांना करीत असलेल्या कर्ज पुरवठ्यामुळे बँकेची नफा क्षमता टिकून आहे. तसेच बँकेची गुंतवणूक मोठ्या प्रमाणावर असुन बँक सध्या आर्थिक भक्कम पायावर उभी आहे. जिल्हा बँकेचा कर्ज पुरवठा मोठ्या प्रमाणावर असल्यामुळे बँकेचा सिडी रेशो जरी वाढला तरी बँकेच्या तरलतेवर कोणताही परिणाम झालेला नाही. राज्यातील इतर जिल्हा बँकेचा सिडी रेशो पाहता अहमदनगर जिल्हा बँकेचा सिडी रेशो कमी आहे. तसेच मागील वर्षी जिल्ह्यातील दुष्काळी परीस्थिती व शासन निर्णयामुळे बँकेची पीक कर्ज वसुली कमी प्रमाणात झालेली आहे. बँकेने थकीत कर्जापोटी पुरेशी एनपीए तरतुद केलेली असुन बँकेचा नेट एनपीए शुन्य टक्के आहे. नोटा बंदीच्या काळातील रक्कम रु.११.६८ कोटीच्या नोटा स्टेट बँक ऑफ इंडिया यांनी स्वीकारल्या नाहीत. सदर बाब ही न्यायप्रविष्ठ आहे. केंद्र सरकारने नोट बंदीच्या संदर्भात जिल्हा बँकांबाबत सहानुभूती पुर्वक विचार करणे आवश्यक आहे.

बँकेने कोव्हीड–२०१९ च्या काळात रिझर्व्ह बँकेच्या निर्देशानुसार लाभांश दिलेला नव्हता तो पुढील काळात लाभांश समीकरण निधी मधुन दिला आहे. याचा बँकेचा नफ्यावर कोणताही परिणाम झालेला नाही. तसेच बँक नफ्यावरील आयकर नियमीत भरत आहे.

बँकेत एकुण मंजुर सेवक संख्या २३४९ आहे. तर सध्या बँकेत फक्त ९६६ सेवक कार्यरत आहेत. तर १३८३ सेवकांची पदे रिक्त असल्याने ग्राहकांना तत्पर सेवा देता येत नाही. त्यामुळे बँकेत तातडीने नोकर भरती करणे आवश्यक आहे. त्यानुसार मा.सहकार आयुक्त यांचेकडे बँकेने ७०० पदांची नोकर भरती करण्यासाठी परवानगी मागीतली होती. त्यांनी दिलेल्या परवानगी नुसार ७०० पदांसाठी नोकर भरतीची प्रक्रिया बँकेने सुरु केलेली आहे.

नाबार्ड व सहकार आयुक्त यांचे निर्देशानुसार बँकेमध्ये नोकर भरतीची प्रक्रिया सुरु आहे. त्यासाठी सहकार आयुक्त यांनी सुचविलेल्या सहा कंपन्यांमधुनच मे.वर्कवेल, पुणे या कंपनीची बँकेने निवड केलेली आहे. या कंपनी मार्फत इतर जिल्हा बँकांमध्येही नोकर भरतीची प्रक्रिया चालू आहे. मा.सहकार आयुक्त यांनी शासनाचे निर्णयानुसार सदर कंपनीची सर्व क्षमता तपासुनच नोकर भरतीच्या तालीकेत समावेश केला आहे. सदरहु नोकर भरती प्रक्रिया ऑनलाईन पध्दतीने पुर्ण होणार आहे. या बाबत संबंधीत उमेद्वारांना त्यांच्या लॉगीनवर माहिती उपलब्ध असणार आहे. त्यामुळे संपुर्ण नोकरभरती प्रक्रिया अतिशय पारदर्शी पध्दतीने होणार आहे.

बँकेतील सर्व निर्णय हे बँकेच्या संचालक मंडळ सभेमध्ये सांगोपांग चर्चा करुनच संचालक मंडळ निर्णय घेत आहेत. बँकेने सर्वच निर्णय धोरणानुसार घेतले तर सामान्य शेतकरी व संस्थांना कर्ज घेण्यास अडचण येतात. त्यामुळे काही वेळेस संचालक मंडळ धोरणाच्या बाहेर जाऊन निर्णय घेतात व त्या कर्जाची परतफेडही होत असते.

अहमदनगर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेला सहकाराचा मोठा इतिहास असून सहकारी चळवळीमध्ये आपला जिल्हा सदैव अग्रेसर आहे. अहमदनगर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक ही जिल्ह्यातील सहकारी संस्थांची मातृसंस्था म्हणुन ओळखली जाते. जवळपास १५ लाखाच्यावर ठेवीदार खातेदारांची रक्कम रु.१०३३३ कोटीच्या ठेवी ग्राहकांनी बँकेत ठेवुन बँकेवर विश्वास ठेवलेला आहे. राज्यातील इतर जिल्हा बँकांची परिस्थिती पाहता अहमदनगर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक आजही राज्यात व देशात अग्रेसर आहे. बँकेची एकूण आर्थिक परिस्थिती पाहता बँक अतिशय भक्कम व सुरक्षीत आहे. याबाबतची माहिती बातमी प्रसिध्द करणाऱ्यास माहिती आहे. तथापी केवळ विशीष्ट हेतुने प्रेरित होऊन वर्तमान पत्रामध्ये बातम्या दिल्या जात आहे. वस्तुस्थिती न पाहता बातमी प्रसिध्द केली जात आहे. त्यामुळे विनाकारण बँकेची बदनामी केली जात आहे. बँके संबंधी गैरसमज पसरविणाऱ्या विरुध्द बँक सल्ला घेऊन न्यायालयात दाद मागणार आहे.

संघर्षयोध्दा बबनराव ढाकणे केदारेश्वर सहकारी साखर कारखान्याने अहमदनगर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेकडे कर्ज मागणी केली होती. तेव्हा सदर कारखान्याकडे राज्य सहकारी बँकेच्या कर्जाची थकबाकी होऊन सदर कारखाना एनपीए मध्ये होता. त्यामुळे या कारखान्यावर राज्य बँकेने सरफेसी ॲक्ट–२००२ अन्वये कारवाई करुन कारखाना जप्त केला होता. एनपीए मध्ये असणाऱ्या साखर कारखान्याला कर्ज पुरवठा करता येत नाही. म्हणुन अहमदनगर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेने सदर साखर कारखान्याला कर्ज दिले नाही. यामुळे श्री.प्रतापराव ढाकणे यांनी राजकीय हेतुने बँकेची बदनामी करण्यासाठी जाहीर वक्तव्य केले आहे. सल्ला घेऊन त्यांच्यावर कायदेशीर कारवाई करणार आहोत.

बँकेच्या संदर्भात वृत्तपत्रामध्ये बातम्या प्रसिध्द होत आहेत बँकेचे सभासद, ठेवीदार, हितचिंतक, यांनी बँकेची संपुर्ण आर्थिक बाजू पाहुन बँकेवर यापुढेही असाच विश्वास कायम ठेवावा. व जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या संदर्भात विपर्यास करणाऱ्या बातम्यांवर ग्राहक, ठेवीदार व सभासदांनी विश्वास ठेवू नये असे आवाहन अहमदनगर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक करीत आहे. तसेच बँक कामकाजा संबंधित कोणाला अधिक माहिती हवी असल्यास त्यांनी बँकेशी संपर्क साधावा.

आर.एल.वर्पे – मुख्य कार्यकारी अधिकारी
माधवराव कानवडे – व्हाईस चेअरमन
शिवाजीराव कर्डिले – चेअरमन

व संचालक मंडळ

---

## जाहीर प्रगटन

**उपविभागीय अधिकारी कार्यालय कन्नड**

जा.क्र. २०२४/मशाका/ जमाबंदी–१/ जन्म–मृत्यु नोंद/ सिआर–४९७ उपविभागीय अधिकारी कार्यालय कन्नड दिनांक १६/०८/२०२४

अर्जदार : मधुकर धुडकु चव्हाण रा. भोकनगांव ता. कन्नड जि. छत्रपती संभाजीनगर

विरूध्द

गैरअर्जदार : ग्रामपंचायत कार्यालय भोकनगांव ता. कन्नड जि. छत्रपती संभाजीनगर

विषय :– जन्म–मृत्यु अधिनियम १९६१ चे कलम १३ (३) अन्वये अर्ज.

उपरोक्त विषयी अर्जदार यांनी अर्ज सादर करून अर्जदार यांना त्यांच्या मुलीचे जन्माचे प्रमाणपत्र मिळविण्यासाठी अर्ज दाखल केला आहे की, अर्जदार यांच्या मुलाचा जन्म दिनांक १५/१२/२००९ रोजी भोकनगांव ता. कन्नड येथे आलेला आहे.

अर्जदार यांच्या मुलाचा जन्म दिनांक १५/१२/२००९ रोजी भोकनगांव ता. कन्नड कामासाठी जन्म प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. त्यामुळे तसा अर्ज अर्जदार यांनी मा. न्यायालयात दाखल केलेला आहे.

सदर जाहिर प्रगटनाव्दारे तमाम जनतेस सुचीत करण्यात येते की, अर्जदार यांच्या मुलाचा जन्म दिनांक १५/१२/२००९ रोजी भोकनगांव ता. कन्नड येथे झाल्याचे जन्म प्रमाणपत्र देण्यास कोणास काही उजर/आक्षेप असल्यास त्यांनी हे जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन ३० दिवसाच्या आत म्हनजेच प्रकरणाच्या पुढील सुनावणी दिनांक ०९/१०/२०२४ रोजी मा. न्यायालयात लेखी स्वरूपात आपला आक्षेप नोंदवावा. मुदतीत कोणचाही आक्षेप/उजर न आल्यास अर्जदारास दिनांक १५/१२/२००९ रोजी भोकनगांव ता. कन्नड येथे जन्म झाल्याचे जन्म प्रमाणपत्र देण्यात येईल व मुदतीतनंतर आलेला उजर/आक्षेप ग्राहय धरला जाणार नाही.

करिता दिनांक १.६/०८/२०२४ रोजी सदर जाहिर प्रगटन माझ्या सहीनिशी व मा. न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले आहे.

उपविभागीय अधिकारी कन्नड करिता

---

## जाहीर प्रगटन

**मा. श्रीमती ए.आय.आवटी मॅडम, दिवाणी न्यायाधिश कनिष्ठ स्तर कन्नड यांचे न्यायालयातुन**

दिवाणी किरकोळ अर्ज क्रमांक: १९६/२०२४ पुढील तारीख : १०.१०.२०२४

अर्जदार : १– गयाबाई गणपत वाघ, वय ६५ वर्षे, धंदा घरकाम, रा. अंधानेर, ता. कन्नड, जि.छ. संभाजीनगर २– शाम गणपत वाघ, वय ४५ वर्षे, धंदा शेती, रा. अंधानेर, ता. कन्नड, जि.छ. संभाजी नगर ३– हेमा भ्र. विजय बावीस्कर, वय ४१ वर्षे, धंदा घरकाम, रा. बाजार गल्ली, गाडगेबाबा चौक, सिल्लोड, ता. सिल्लोड, जि.छ. संभाजीनगर ४– आरती भ्र. दिपक लोखंडे, वय ३९ वर्षे, धंदा घरकाम, रा. आमठाणा, ता. सिल्लोड, जि.छ. संभाजीनगर ५– गिता भ्र. साईनाथ वाढेकर, वय ३६ वर्षे, धंदा घरकाम, रा. चिंचोली लिं., ता. कन्नड, जि.छ. संभाजीनगर ६– योगेश गणपत वाघ, वय ३४ वर्षे, धंदा शेती, रा. अंधानेर, ता. कन्नड, जि.छ. संभाजीनगर

– विरुध्द –

गैरअर्जदार : महाराष्ट्र शासन, मार्फत जिल्हाधिकारी संभाजीनगर, जि. संभाजीनगर

अर्ज : वारसाचे प्रमाण पत्र मिळणे बाबत. (सक्सेशन सर्टीफिकेट)

ज्या अर्थी अर्जदार यांचे वकील ॲड. एम. एम. भारुका यांच्या मार्फत या न्यायालयात अर्जदार क्रमांक १ चे पती व अर्जदार क्रं. २ ते ६ चे वडील नामे गणपत वैजीनाथ वाघ यांचा दिनांक ३.११.२०२३ रोजी मृत्यु झाला असून त्यांच्या पश्चात अर्जदार क्रमांक १ ते ६ हेच त्यांचे कायदेशीर वारस आहेत. अर्जदारां व्यतीरिक्त इतर कोणीही वारस नाही. अर्जदाराचे पती/ वडील यांच्या मृत्यु प्रमाण पत्राची प्रत त्यांनी मुळ अर्जा सोबत सादर केली आहे. अर्जदाराचे पती / वडील नामे गणपत वैजीनाथ वाघ यांनी त्यांच्या हयाती मध्ये दि. औरंगाबाद जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक शाखा, अंधानेर बँकेतील बचत खाते क्रमांक ०१०६११००२०००२६८ मध्ये रक्कम रुपये ३२,६५५.१८ जमा ठेवलेले आहे. सदरील बँकेत खाते उघडतांना त्यांनी नॉमीनी / वारस नमुद केलेले नसल्यामुळे सदरील रक्कम वारसा हक्काने मिळविण्या करीता अर्जदारास वारसा प्रमाण पत्राची आवश्यकता आहे. अर्जदार क्रमांक २ शाम हा मयत गणपत वाघ यांचा मोठा मुलगा असून घरातील कर्ता व्यक्ती आहे, त्यामुळे वरील खात्यामध्ये जमा असलेली रक्कम अर्जदार २ शाम यांनाच मिळावी अशी सर्व अर्जदारांची इच्छा असल्यामुळे प्रस्तुत प्रकरणात अर्जदार क्रमांक १,३ ते ६ यांनी अर्जदार २ यास रक्कम मिळण्यासाठी लागणा–या प्रमाण पत्रा मध्ये अर्जदार २ यांच्या नावाने संबंधीत बँके करीता प्रमाण पत्र मिळणे आवश्यक आहे. वरील रक्कम बँकेतून काढण्यासाठी अर्जदार यांनी संबंधीत अधिकारी यांच्याशी संपर्क साधला असता त्यांनी बचत खात्या करीता नॉमीनी / वारसाचे नांव नमुद नसल्यामुळे अर्जदारास मा. न्यायालया कडील प्रमाण पत्रा शिवाय रक्कम अदा करता येणार नसल्याचे दिनांक ३०.८.२०२४ रोजी सांगीतल्यामुळे अर्जास कारण घडले आहे. अर्जदार व त्यांचे पती / वडील मौजे अंधानेर ता. कन्नड, जि. छ.संभाजीनगर येथीलच रहिवाशी असून वरील नमूद रक्कम जमा असलेली बँक देखील मा. न्यायालयाच्या कार्यक्षेत्रात स्थित असल्यामुळे मा. न्यायालयास सदरचे प्रकरण चालवून निकाली काढण्याचा संपुर्ण अधिकार आहे. सबब वरील प्रमाणे अर्जदार यांनी या न्यायलयात मागणी केली आहे.

त्या अर्थी सदरहू जाहीर प्रगटना व्दारे सर्व जनतेस कळविण्यात येत आहे की, अर्जदार हे मयताचे कायदेशीर वारस असल्या बाबत त्यांनी प्रस्तुतचा अर्ज या न्यायालयात वारस प्रमाण पत्र मिळणेसाठी अर्ज केलेला आहे, व त्या बाबत ईतर कुठल्याही वारसाचा उजर आक्षेप नाही या साठी प्रमाण पत्र देणे आहे. सबब या जाहीर प्रगटना व्दारे वरील वारस प्रमाण पत्र देण्या पुर्वी ईतर कुणासही आक्षेप / उजर असल्यास सदर जाहीर प्रगटन वर्तमान पत्रात प्रकाशित झाल्याच्या तारखेपासून ३० दिवसाच्या आत या न्यायालयात व्यक्तीगत किंवा रितसर वकीला मार्फत हजर व्हावे तसे न केल्यास मुदतीत आक्षेप प्राप्त न झाल्यास अर्जदार यांना मयतांचे कायदेशीर वारस असल्या बाबतचे वारसा हक्क प्रमाण पत्र प्रदान करण्यात येईल. सबब आज दिनांक १७.०९.२०२४ रोजी माझे सहीनिशी व मा. कोर्टाचे शिक्यानिशी दिले.

दिनांक १७.०९.२०२४

आदेशावरुन

लिपीक सहाय्यक अधिक्षक

दिवाणी व फौजदारी कनिष्ठ स्तर कन्नड

---

## जाहीर प्रगटन

**मा. वी.एन. काटकर साहेब दिवाणी न्यायाधिश साहेब कनिष्ठ स्तर कन्नड यांचे न्यायालयात.**

दि. क्रि. अर्ज. क्रं.२२४/२०२४. पुढील तारीख २१/१०/२०२४.

अर्जदार : १. अहमद महमद शेख, वय ७६ वर्षे, धंदा शेती,रा. पळशी बु, ता. कन्नड जि. औरंगाबाद. २. फातमाबी शेख युसुफ वय ६३ वर्षे, धंदा घरकाम, रा. करंजखेडा ता. कन्नड जि. औरंगाबाद. रा. करंजखेडा ता. कन्नड जि. औरंगाबाद. ३. हसन युसुफ शेख, वय ४५ वर्षे, धंदा शेती, ४. साहेराबी रसुलखा पठाण, वय ८२ वर्षे, धंदा घरकाम, रा. आखतवाडे ता. पाचोरा. जि. जळगाव.

विरुदध

गैरअर्जदार : महाराष्ट्र शासन द्वारा जिल्हाधिकारी कार्यालय औरंगाबाद.

अर्ज :– बॉम्बे रेग्यूलेशन ॲक्ट १८२७ चे कलम २ व ३ प्रमाणे वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत.

ज्याअर्थी अर्जदार यांनी त्यांचे वकील ॲड. शेख कामरान रफिक यांचे मार्फत या न्यायलयात अर्ज सादर केला आहे की, अर्जदार क्रं. १ हे मयत शेख महमद बाबन शेख व मेहताबबी महमद शेख यांचा मुलगा असून अर्जदार क्र. ४ हि मयताची विवाहित मुगी आहेत. तसेच मयत शेख महमद बाबन शेख व मेहताबबी महमद शेख यांचा मयत मुलगा नामे शेख युसुफ शेख महमद हा दि. १८/०१/२०२४ रोजी मौजे करंजखेडा ता. कन्नड येथे मरण पावले आहे. जे अर्जदार क्रं. २ चे पती व अर्जदार क्र. ३ चे वडील आहेत. अर्जदार क्रं. १ ते ४ हे आपसात सख्खे भाऊ बहिण व नातेवाईक आहे. अर्जदार क्रं. १ ते ४ हे मयत शेख महमद बाबन शेख व मेहताबबी महमद शेख यांचे कायदेशीर वारस आहे. अर्जदार क्रं. १ व ४ यांचे वडील नामे महमद बाबन शेख हे दि. १७/०६/१९९० रोजी व अर्जदार क्रं. १ व ४ यांची आई नामे मयत मेहताबबी महमद शेख हि दि.०५/०७/१९८२ रोजी मौजे पळशी बु ता. कन्नड येथे वृद्धपकाळामुळे मरण पावले आहे. अर्जदार क्रं. १ ते ४ यांना मयत शेख महमद बाबन शेख व मेहताबबी महमद शेख यांचे मृत्यू पश्चात तहसिल कार्यालय, नगर पालिका कार्यालय, ग्रामपंचायत कार्यालय, उपअधिक्षक भूमि अभिलेख कार्यालय, गाव, नगर व शहर भूमापन कार्यालय, महानगर पालिका, तलाठी कार्यालय, गट विकास अधिकारी कार्यालय व इतर शासकिय व निमशासकिय कार्यालय मध्ये आवश्यक ते कामासाठी वारस प्रमाणपत्राची आवश्यकता असल्याने अर्जदार क्रं. १ ते ४ हे मयताचे वारस असल्याबाबत कायदेशीर वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे.

अर्जदार क्रं. १ हे व मयतं नामे शेख महमद बाबन शेख व मेहताबबी महमद शेख हे मौजे पळशी बु ता. कन्नड येथील मुळचे रहिवाशी होते तसेच ते पळशी बु ता. कन्नड येथे राहत असतांना वृद्धपकाळाने मयत झाले आहे. सदरील मयतास अर्जदार क्रं. १ ते ४ हे वारस असून वेळोवेळी वेगवेगळ्या कार्यालयात वारस प्रमाणपत्राची आवश्यकता भासत असल्यामुळे सदरील अर्जास कारण दि.०३/०९/२०२४ रोजी मौजे कन्नड ता. कन्नड येथे घडले. त्याअर्थी सदर जाहीर प्रगटनाद्वारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, अर्जदार यांनी अर्ज केल्यानुसार वारसा प्रमाणपत्रासाठी परवानगी देण्याबाबत ज्या कुणास, कुठल्याही स्वरुपाचा उजर आक्षेप वगैरे असल्यास त्यांनी हे जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्यापासून तीस (३०) दिवसांच्या आत आपला उजर, आक्षेप वगैरे मा. न्यायलयात नोंदवावा. मुदतीत उजर आक्षेप न आल्यास अर्जदाराच्या नावे वारसा प्रमाणपत्र देण्यात येईल. त्यानंतर आलेला उजरआक्षेप ग्राह्य धरला जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

दिनांक :२०/०९/२०२४.

आदेशवरून

कनिष्ठ लिपीक सहाय्यक अधिक्षक

दिवाणी न्यायाधीश क. स्तर. कन्नड

सोलापूर तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# गणेशपुर येथे विज पडून दोन बैल दगावले

**तभा वृत्तसेवा**
**जाफ्राबाद/प्रतिनिधी**



जाफ्राबाद तालुक्यातील गणेशपुर येथे कडाक्याच्या विजयासह परतीच्या पावसाने धुतले असुन, येथील शेतकरी रामकिसन पांडुरंग कावळे यांच्या गट नंबर ४०९ शिवारातील शेतात बांधलेल्या बैल जोडीवर वीज पडून दुर्दैवी मृत्यू झाला .या शेतकऱ्यांची गट नंबर ४०९ ही शेती आंबेवाडी शिवारातील येते . अवकाळी पाऊसाने विजांच्या कडकडासह पाऊस सुरू झाला. सदर शेतकऱ्यांनी आपल्या शेतांच्या बांधावर बैल बांधलेले होते. अचानक पडुन दोन बैल दगावले आहे. या बैलांची अंदाजे ८० ते ९० हजार रुपये किंमतीची होती. या घटनेमुळे शेतकऱ्यांवर मोठें संकट उभे राहिले असुन, शासनाच्या वतीने त्वरित पंचनामा करून नुकसान भरपाई द्यावी अशी मागणी करण्यात येत आहे.

# जालन्याचे जिल्हाधिकारी श्रीकृष्ण पांचाळ यांना प्रतिष्ठित 'गोल्डन स्कॉच' पुरस्काराने सन्मानित

**तभा वृत्तसेवा**
**जालना/प्रतिनिधी**



जालना जिल्ह्याने रेशीम अंडीपुज निर्मितीपासून ते रेशीम धागा निर्मितीपर्यंतच्या सर्व प्रक्रिया उपलब्ध करुन देण्यासाठी 'मलबेरी सिल्क सॉईल टू फॅब्रिक प्रोसेस अंडर वन रुफ' हा प्रकल्प उत्कृष्टपणे राबविल्याबद्दल स्कॉच या नामंकित संस्थेचा 'स्कॉच २०२४ राष्ट्रीय पुरस्कार' जिल्हाधिकारी डॉ. श्रीकृष्ण पांचाळ यांना प्रदान करण्यात आला.

स्कॉच या संस्थेकडून विविध क्षेत्रातील अतुलनीय कामगिरीकरीता दरवर्षी हा पुरस्कार देण्यात येतो. जिल्हाधिकारी श्रीकृष्ण पांचाळ यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्ह्यात रेशीम प्रक्रिया उद्योगासाठी विविध सकारात्मक पाऊले उचलण्यात आल्याने रेशीम प्रक्रिया उद्योगाला चालना देण्यासाठी जिल्हा प्रशासनाला यश आले. याच कामाची दखल घेत स्कॉच संस्थेच्यावतीने श्री. पांचाळ यांची या पुरस्कारासाठी निवड केली. स्कॉच संस्थेच्यावतीने नवी दिल्ली येथे शनिवार, २१ सप्टेंबर रोजी आयोजित पुरस्कार वितरण सोहळ्यात रेशीम विकास अधिकारी श्री. मोहिते यांनी जिल्हाधिकारी श्री. पांचाळ यांच्यावतीने हा पुरस्कार स्विकारला होता. आज जिल्हाधिकारी कार्यालयातील सभागृहात रेशीम उपसंचालक डॉ. महेंद्र ढवळे यांच्या हस्ते जिल्हाधिकारी डॉ. श्रीकृष्ण पांचाळ यांना हा पुरस्कार सुपूर्द करण्यात आला. यावेळी डॉ. पांचाळ म्हणाले की, जालना जिल्ह्यात हा रेशीम प्रकल्प यशस्वी करण्याकरीता रेशीम अधिकारी अजय मोहिते, तहसिलदार विक्रांत मुंढे, अंबडचे तत्कालीन तहसिलदार चंद्रकांत शेळके, घनसावंगी तहसिलदार श्रीमती योगिता खटावकर यांचे सहकार्य लाभले. या प्रकल्पाच्या माध्यमातून भविष्यात मोठ्या प्रमाणात शेतकऱ्यांना समृध्दी प्राप्त होऊन रोजगार निर्मितीत नक्कीच वाढ होईल. यावेळी निवासी उपजिल्हाधिकारी शशिकांत हदगल, उपविभागीय अधिकारी श्रीमंत हारकर, दिपक पाटील, डॉ. दयानंद जगताप, पद्ममाकर गायकवाड यांच्यासह सर्व तहसिलदार, नायब तहसिलदार विविध विभागातील अधिकारी-कर्मचारी यांची उप-स्थिती होती. रेशीम कोष बाजार पेठ तसेच महिको यांच्यामार्फत रेशीम अंडीपुज निर्मिती केली जात आहे. त्यामुळे शेतकऱ्याच्या बीजकोषाला १ लाख १३ हजार रुपये प्रती क्विंटल दर बीज कोष निर्मिती करणाऱ्या शेतकऱ्यांना मिळत आहे. त्यामुळे शेतकऱ्यांचे उत्पन्न दूप्पटीने वाढले आहे. तसेच रेशीम धागा निर्मितीपर्यंतच्या सर्व प्रक्रिया उपलब्ध असणारा जालना हा महाराष्ट्रातील एकमेव जिल्हा ठरला आहे. जालन्याच्या रेशीम कोष बाजारपेठेत राज्यातील सर्व जिल्ह्यांतुन शेतकरी रेशीम कोष विक्री करण्याकरीता येतात. त्यामुळे या संधीचा फायदा घेऊन जालना जिल्ह्यातील जास्तीत-जास्त शेतकऱ्यांनी तुती लागवड करून रेशीम उद्योगाकडे वळत आहे.

## संक्षिप्त

### जिल्हाध्यक्ष अरविंदराव चव्हाण यांच्या हस्ते बदनापूर येथील नगरसेवकांचा राष्ट्रवादीत प्रवेश



**तभा वृत्तसेवा**
**जालना/प्रतिनिधी**

बदनापूर नगरपंचायतींच्या तीन नगरसेवकांनी आज दि. २३ रोजी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे जिल्हाध्यक्ष माजी आमदार अरविंदराव चव्हाण यांच्या हस्ते राष्ट्रवादीत प्रवेश केला. यावेळी जेष्ठ नगरसेवक शेख मतीनभाई, विनोद साबळे, शेख मुजीब यांनी तसेच बदनापूर विकासोचे व्हाईस चेअरमन शेख शफिक यांनी राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार गट) सोडून राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीत (अजितदादा पवार) जाहीर प्रवेश केला. याप्रसंगी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे बदनापूर तालुकाध्यक्ष कैलास मदन, बदनापूर शहराध्यक्ष नगरसेवक इकबाल शेख, सामाजिक न्याय विभागाचे तालुकाध्यक्ष संदिप पाटोळे, रायुकाँचे बदनापूर तालुकाध्यक्ष राम जोशी यांच्या सह अनेकांची उपस्थिती होती.

### परतुर राजस्थानी विप्र समाजाच्या अध्यक्ष पदी मुन्ना चितोडा उपाध्यक्ष नटवर खंडेलवाल तर सचिव अश्विन दायमा



**तभा वृत्तसेवा**
**परतूर/प्रतिनिधी**

येथील राजस्थानी विप्र ब्राह्मण समाजाची रविवार दिनांक २२ सप्टेंबर रोजी स्थानिक गायत्री देवी मंदिर येथे बैठक घेण्यात आली. या बैठकीत समाजाचे जेष्ठ मंडळी विजय सारस्वत सर, सुरेश भाऊ जोशी, पप्पू सेठ दायमा यांच्या मार्गदर्शनाखाली सन् २०२४ २०२५ या वर्षाकरिता समाजाच्या कार्यकारिणीची घोषणा करण्यात आली. यात अध्यक्षपदी श्यामसुंदर उर्फ मुन्नाभाई चितोडा, उपाध्यक्षपदी नटवरलाल खंडेलवाल, सचिवपदी अश्विन कुमार दायमा, कोषाध्यक्षपदी श्यामशेठ ओझा, सहसचिवपदी संतोष व्यास, तर संघटक पदी शिवकुमार जोशी व गणेश शर्मा यांची निवड करण्यात आली. या बैठकीत देवी श्री गायत्री मंदिर येथे नवरात्र महोत्सवात देवीची स्थापना करण्यात येणार असून, नवरात्र दरम्यान विविध सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येणार असल्याचे, नवरात्र महोत्सव समितीचे केदार खंडेलवाल व लखन जोशी यांनी सांगितले बैठकीच्या स्थळी नवनियुक्त पदाधिकारी यांचा पुष्पहार व शाल श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला यावेळी विप्र समाजाचे सर्व बांधव उपस्थित होते.

### द्विज गादेवाड ने राष्ट्रीय तायक्कॉदो स्पर्धेत सुवर्ण पदक पटकवला

**तभा वृत्तसेवा**
**जालना/प्रतिनिधी**

तायक्कॉदो असोसिएशन ऑफ महाराष्ट्र (कल्याण) च्या आयोजन मधे तसेच इंडीया तायक्कॉदो च्या अधिपत्या खाली नाशिक येथे सुरु असलेल्या चैंपियन ऑफ चैंपियन राष्ट्रीय तायक्कॉदो स्पर्धे मधे जालना येथील द्विज गादेवाड ने सुवर्णपदक पटकवला आहे सुवर्णपदक पटकवल्याने त्याच भारतीय संघात निवड साठी च मार्ग मोकळा झाला आहे आगामी काळात भारता च्या संघात तो आपल्या ला निश्चित खेळताना दिसेल अशी आशा तायक्कॉदो असोसिएशन जालना जिल्हा चे अध्यक्ष श्री अरविंद देशमुख यांनी व्यक्त केली आहे आणि या यशा बद्दल त्याचे अभिनदन केले द्विज गादेवाड हा राष्ट्रीय खेळाडू सचिन गादेवाड यांचे मार्गदर्शना खाली माघील ३ वर्षा पासून सतत तायक्कॉदो चा सराव करत आहे आणि या पदक पटकवल्या बद्दल संघटने चे सचिव सचिन आर्य खजिंदार अशोक पडुळ,प्रा.डॉ. विजय कमले पाटिल, धनसिंग सूर्यवंशी, मा नगरसेवक रमेश जाधव, राष्ट्रीय पंच व खेळाडू मयूर पिवल, ज्ञानेश्वर मोरे, प्रतिक ढाकने, प्रांजल पिवल आदिनी कौतुक केले

# कृषी विभागाकडून प्रत्येक महसूल मंडळातील दोन गावात होणार पिक पाहणी प्रयोग -आ.लोणीकर

**तभा वृत्तसेवा**
**जालना/प्रतिनिधी**



परतुर विधानसभा मतदारसंघातील मंठा व परतूर तालुक्यासह जालना जिल्ह्यातील जवळपास सर्वच महसूल मंडळात ६५ मिलिमीटर ते २०० मिलिमीटर अतिवृष्टीची नोंद झाली असून अनेक गावातील शेती पिके पुराच्या पाण्याने वाहून गेली आहेत. जालना जिल्ह्यातील हजारो हेक्टर शेतजमिनी पुराच्या पाण्याने खरडून निघाल्या आहेत. सोयाबीन या पिकावर अतिवृष्टीने व्हायरसचा अटॅक आल्याने. सोयाबीनचे मोठ्या प्रमाणावर उत्पादन घटले असून ७० ते ८० टक्के नुकसान झाले आहे. याबरोबरच शेतात झालेल्या अतिवृष्टीने पाणी साचल्याने तूर कापूस या पिकांचे मुळे कूजली आहेत. यामुळे पातेगळ फुलगळ व पानगळ झाल्याने पिक उबाळून निघाली आहेत. परंतु शेतकरी बांधवांना अर्थसाह्य उपलब्ध होण्याच्या उद्देशाने देशाचे लोकप्रिय पंतप्रधान नरेंद्र जी मोदी यांनी देशभरात पंतप्रधान फसल बीमा योजना आणली असून या माध्यमातून एक रुपयात पिक विमा ही कल्याणकारी योजना महाराष्ट्रात मुख्यमंत्री एकनाथराव शिंदे उपमुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस उपमुख्यमंत्री अजित दादा पवार हे यशस्वीपणे राबवत असून. शेतकऱ्यांना पिक विमा मिळावा याकरिता पीक कापणी प्रयोग अत्यंत महत्त्वाचा असल्याचे प्रतिपादन महाराष्ट्र राज्याचे माजी मंत्री तथा परतुर विधानसभा मतदारसंघाचे विद्यमान आमदार बबनराव लोणीकर यांनी केले आहे. त्यांनी प्रसिद्धीस दिलेल्या पत्रकाद्वारे ही माहिती दिली आहे. पुढे या पत्रकात म्हटले आहे की, जालना जिल्ह्यातील सर्वच महसूल मंडळात पीक कापणी प्रयोग राबविण्याकरिता गाव पातळीवर सरपंच तलाठी ग्रामसेवक कृषी सहाय्यक व शेतकरी सल्लागार कृषी शेतकरी मित्र यांची समिती असते. तर तालुका पातळीवर तहसीलदार तालुका कृषी अधिकारी पंचायत समितीचे गट विकास अधिकारी यांच्यासह समिती असते. तर जिल्हा पातळीवर जिल्हाधिकारी जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी व जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी यांच्यासह नियोजित समिती असते. या समित्यांना आमदार बबनराव लोणीकर यांनी सूचना देताना म्हटले आहे की नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना पीक विम्याचा लाभ मिळवून देण्याच्या उद्देशाने आवश्यक ते सर्व ठिकाणी पिक कापणी प्रयोग यशस्वीपणे राबवावा. या पीक कापणी प्रयोगाकडे सरपंच माजी पंचायत समिती सदस्य जिल्हा परिषद सदस्य व भारतीय जनता पक्षाच्या सर्व नेते पदाधिकाऱ्यांनी गांभीर्याने लक्ष देण्याचे आवाहनही या आमदार लोणीकर यांनी केल आहे.

# राज्यस्तरीय युवा समाज रत्न पुरस्काराने हर्षल पाटील फदाट सन्मानित

**तभा वृत्तसेवा**
**जाफ्राबाद/प्रतिनिधी**



गेल्या अनेक वर्षापासून सामाजिक क्षेत्रात कार्य करून जनसेवेसाठी सदैव तत्पर असणारे बोरगाव बु येथील युवा तरुण ,हर्षल मोतीराम फदाट यांना माणुसकी मल्टीपर्पज फाउंडेशन मलकापूर जिल्हा बुलढाणा यांच्या वतीने सण २०२४ मधील राष्ट्रभक्ती सेवा गौरव पुरस्काराने गौरविण्यात आले.त्यांना युवा समाज रत्न पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. आपल्या समाजकार्याने पंचक्रोषीत प्रसिद्ध असलेले हर्षल पाटील फदाट यांना नुकतेच राज्यस्तरीय युवा समाजरत्न पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.सदर पुरस्कार हा माणुसकी मल्टीपर्पज फाऊंडेशन या समाजसेवी संस्थेकडून दरवर्षी देण्यात येतो.या वर्षीचा सदर पुरस्कार हर्षल मोतीराम फदाट यांना पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. समाजसेवा करताना कुठलाही स्वार्थ न ठेवता आपल्या परीने समाजातील वंचित घटकांसाठी जेवढे करता येईल ते करतो.लोकांना सुखा- दुःखात व संकट प्रसंगी मदत करून सामाजिक क्षेत्रात काम करण्यासाठी ते अग्रेसर असतात. मित्रपरिवाराच्या साथीने व गावाच्या पाठिंब्यामुळे मुळेच मी पुरस्काराची पायरी चढु शकल्याने, या पुरस्काराचे संपूर्ण श्रेय त्यांनी मित्रपरिवार व बोरगाव बु गावाला दिला आहे.त्यांना राज्यस्तरीय युवा समाज रत्न पुरस्काराने मान्यवरांच्या हस्ते दिनांक २१ सप्टेंबर रोजी मलकापूर येथे दिमागदार सोहळ्यात हर्षल फदाट यांचा सन्मान करण्यात आला.राज्यस्तराय युवा समाज रत्न पुरस्काराने हर्षल मोतीराम फदाट यांना पुरस्कार सन्मानित झाल्याबद्दल सर्वत्र अभिनंदन व विशेष कौतुक केले जात आहे. यावेळी पुरस्कार वितरण सोहळ्यात सामाजिक,शैक्षणिक,विधी साहित्य,कला व प्रशासकीय क्षेत्रातील मान्यवरांची उपस्थिती होती.

# मातृ तीर्थ शिंदखेडा राजा जिजाऊ सृष्टी येथे युवा शाहीर अंकुर परिहारचा कार्यक्रम संपन्न

**तभा वृत्तसेवा**
**माहोरा/प्रतिनिधी**



नुकताच शिंदखेडा राजा मातृ तीर्थ शिवसृष्टी या ठिकाणी लोककला प्रबोध परिषद महाराष्ट्र राज्य या संस्थेच्या वतीने श्री डॉ. गजेंद्र गवई यांचे आयोजनातून त्रि दिनिय भव्य दिव्य कार्यशाळेचा कार्यक्रम संपन्न झाला यामध्ये महाराष्ट्रात सुपरिचित असलेले शाहीर नानाभाऊ परिहार यांचा नातू युवा शाहीर अंकुर परिहार यांनी जिजाऊ सृष्टीवर मा जिजाऊ छत्रपती शिवाजी महाराज छत्रपती संभाजी महाराज यांचेवर पोवाडे व वीर गीते सादर करून मान्यवरासह प्रेक्षकांची मने जिंकली अंकुर परिहार सध्या हिवरा आश्रम विवेकानंद नगर या ठिकाणी बीएससी ॲग्री चे द्वितीय वर्षामध्ये शिकत असून त्यासोबतच बालपणापासून आजोबांनी दिलेले शाहिरी प्रशिक्षण तो चांगल्या पद्धतीने सादर करीत आहे याचसोबत स्पर्धा परीक्षेचे स्वप्न बाळगून आहे

याप्रसंगी आमदार रविकांत तुपकर, मा. आमदार शशिकांत खेडेकर, प्रवीण गीते सर ,अध्यक्ष शाहीर सुभाष गोरे सोलापूर, सचिव शाहीर बाळासाहेब मालुसकर पुणे, शाहीर सुरेश जाधव संभाजीनगर,संचालिका श्रीमती अनिता खरात, शाहीर आप्पासाहेब उगले, शाहीर, दिगू तुमवाड, शाहीर रमेश गिरी नांदेड, शाहीर खाडे सोलापूर ,शाहीर गुलाबराव नळनिकर, शाहीर खडसे वाशिम ,शाहिरा मीरा कावळे, शाहिरा मिरा दळवी पुणे, श्री केदारसर मुंबई, अनेक मान्यवरांच्या उपस्थितीत कार्यक्रम पार पडला यावेळी शाहीर गजानन काकडे, श्री शिवाजी पवार, जनार्दन पैठणे, भगवान ढवळे, सुरेश फेपाळे, शिवाजी वायाळ, शंकर जावळे, किशोर गवई,शा. कडूबा साळवे भगवान शेळके, नारायण करडेल, देविदास भेलके, गुमानसिंग परिहार, प्रकाश परिहार, या कलाकारांनी शाहिरांना साथसंगत केली, मान्यवरासह प्रेक्षकांनी युवा शाहीर अंकुर परिहार चे तोंड भरून कौतुक केले

# तालुक्यातील अनेक गावात रात्रीच्या वेळी फिरणाऱ्या ड्रोनमुळे भीतीचे वातावरण

## खुलासा करण्याची राष्ट्रवादी काँग्रेसची तहसीलदारांकडे मागणी



**तभा वृत्तसेवा**
**टेंभुर्णी/प्रतिनिधी**

गेल्या काही दिवसांपासून जाफराबाद तालुक्यात चोरीच्या घटनांमध्ये वाढ झाली असून अनेक गावावर रात्रीच्या वेळी ड्रोन घिरट्या घालत असल्याने नागरिकांत भीतीचे वातावरण आहे.याविषयी खुलासा करून जनतेत निर्माण झालेले भीतीचे वातावरण कमी करावे अशी मागणी राष्ट्रवादी काँग्रेसचे तालुकाध्यक्ष रामधन कळंबे यांनी जाफराबाद च्या तहसिलदारांना दिलेल्या निवेदनात केली आहे.याविषयी दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की १८सप्टेंबर रोजी कुंभारी येथील भारत मोरे व विष्णू जंजाळ यांच्या घरावर धाडसी दरोडा पडला होता त्यातील संशयितास धाडसी युवकांनी पकडले होते तर ३जण फरार झाले होते.आरतखेडा येथे शेतमजूर महिलेच्या गळ्यातील पोत तोडून पळ काढला.

जाफराबाद शहरात ही भरदिवसा अनेक ठिकाणी घरफोड्या झाल्या आहेत,अनेक व्यापाऱ्यांचे गोडाऊन फोडून धान्य लंपास केले आहेत.काही शेतकऱ्यांच्या बैलजोड्या चोरीस गेल्या आहेत.वारंवार घडणाऱ्या चोरीच्या घटनांमधून घातपात होण्याची शक्यता नाकारता येत नाही.तालुक्यातील अनेक गावात रात्रीच्या वेळी ड्रोन कॅमेरे घिरट्या घालून टेहळणी करत असून नेमके हे ड्रोन कोण फिरवत आहे?याचा वापर घरफोड्या व चोऱ्या करण्यासाठी होतो का?असे एक ना अनेक प्रश्न असून याविषयी अधिकृत माहिती कोणताच विभाग देत नाही.चोरीच्या घडलेल्या घटना,रात्री अपरात्री फिरणारे ड्रोन यामुळे ग्रामीण भागातील नागरिक रात्र जागून काढत आहेत.ड्रोन विषयी खुलासा करून नागरिकांत निर्माण झालेले भीतीचे वातावरण दूर करण्याची मागणी निवेदनातून करण्यात आली आहे.यावेळी शेख मुजीब,रामदास जाधव,नितीन शिवनकर, दिलीप लोखंडे,विठ्ठल गोरे यांच्यासह कार्यकर्ते उपस्थित होते.

# भोकरदन विधानसभेसाठी काँग्रेस प्रयत्न करणार -डॉ.पी.सी.शर्मा

**तभा वृत्तसेवा,**
**भोकरदन/प्रतिनिधी**



आगामी निवडणुकीत भोकरदन विधानसभेची जागा काँग्रेस पक्षाला सोडवून घेण्यासाठी निश्चितपणे प्रयत्न केला जाईल अशी ग्वाही जालना लोकसभेचे काँग्रेस पक्षाचे निरीक्षक तथा मध्यप्रदेशचे माजी मंत्री डॉ. पी. सी. शर्मा यांनी येथे बोलतांना दिली.

महाराष्ट्र राज्यात आगामी काळात होणाऱ्या विधानसभा निवडणुक तयारीचा आढावा घेण्यासाठी जालना लोकसभेचे काँग्रेस पक्षाचे निरीक्षक तथा मध्यप्रदेशचे माजी मंत्री डॉ. पी. सी. शर्मा हे काल रविवारी जालना जिल्ह्याच्या दौर्यावर आले होते. भोकरदन येथील काँग्रेस पक्षाच्या कार्यालयात त्यांच्या प्रमुख उपस्थितीत आयोजित करण्यात आलेल्या पदाधिकारी, कार्यकर्त्यांच्या बैठकीत मार्गदर्शन करतांना ते बोलत होते.जालना व परभणी लोकसभा मतदार संघातील मतदारांनी इंडिया (महाविकास) आघाडीचे उमेदवार खा.डॉ कल्याणराव काळे जालना, व खा. बंडु जाधव, परभणी यांना भरघोस मताधिक्याने निवडून दिल्याबद्दल पी.सी.शर्मा यांनी सर्वप्रथम सर्व जनतेचे, व पदाधिकारी, कार्यकर्त्यांचे मनापासून आभार मानले.भोकरदनचे स्थानिक उमेदवार माजी केंद्रीय राज्यमंत्री रावसाहेब दानवे यांचा दबाव झुगारून भोकरदन-जाफराबाद तालुक्यातील जनतेने त्यांचा दारून पराभव करण्यात मोठा वाटा उचलला त्याबद्दल या दोन्ही तालुक्यातील जनतेचे देखील विशेष आभार व्यक्त करून आगामी विधानसभा निवडणुकीत भोकरदनची जागा काँग्रेस पक्षाला कशी सोडता येईल यासाठी आपण केंद्र व राज्यातील पक्षश्रेष्ठींकडे पाठपुरावा करून ही जागा काँग्रेसला सोडवून घेण्याचा प्रयत्न करणार असल्याची ग्वाही शर्मा यांनी यावेळी दिली. बैठकीच्या प्रारंभी निरीक्षक शर्मा यांनी जालना जिल्ह्यातील पाचही विधानसभा मतदार संघ निहाय आढावा घेतला. जालना जिल्हा काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष राजाभाऊ देशमुख यांनी लोकसभा निवडणूक २०२४ आणि विधानसभा निवडणुक २०१९ मधील जालना जिल्ह्यातील विधानसभा निहाय लेखी अहवाल जालना लोकसभेचे काँग्रेस पक्षाचे निरीक्षक शर्मा यांच्याकडे सुपूर्द केला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सोपान सपकाळ यांनी केले तर आभार काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष राजाभाऊ देशमुख यांनी मानले. यावेळी अनुसूचित सेलचे राष्ट्रीय पदाधिकारी जयप्रकाश नारनवरे, युवक काँग्रेसचे राहुल पाटील, ओबीसी सेलचे पंकज वाळेकर, शहर जिल्हाध्यक्ष शेख महेमुद,वरिष्ठ उपाध्यक्ष राजेंद्र राख, माजी उपनगराध्यक्ष इरफान सिद्दीकी, शेख रिझवान, बदनापूर तालुकाध्यक्ष सुभाष मगरे, भोकरदन तालुकाध्यक्ष त्रिबंकराव पाबळे, अनिल देशपांडे, श्रावण आक्से, इंद्रजीत देशमुख, माजी नगरसेवक शेख रफीकोदिन, संतोष अन्नदाते, रमेश जाधव, दादाराव देशमुख, विश्वासराव वाघ, गुडु कादरी,रईस शेख, अजीज पार्टी यांच्यासह काँग्रेस पदाधिकारी कार्यकर्ते यांची या बैठकीस उपस्थिती होती.

## अग्रलेख...

# 'ड्रॅगन'ला वेसण घालण्यासाठी हवे सामर्थ्यशाली नौदल

चीनचा वाढता हस्तक्षेप आणि भारत-प्रशांत क्षेत्रातील भू-राजकीय ताकद दाखविण्याचे प्रकार वाढत असल्याच्या पृष्ठभूमीवर हिंद महासागरात लढाऊ क्षमता वाढविण्याचा निर्णय शनिवारी नौदल कमांडर्सच्या बैठकीत घेण्यात आला आहे. एकीकडे साम्राज्यवादी, विस्तारवादी व विश्वासघातकी ड्रॅगन आणि दुसरीकडे दहशतवादाला नेहमीच खतपाणी घालणारा पाकिस्तान या दोन शत्रूंचा उपद्रव दिवसेंदिवस वाढत असताना नौदलाची लढाऊ क्षमता वाढविण्याचा निर्णय अतिशय महत्त्वाचा आणि दूरदृष्टीचा ठरणार आहे. विशेष म्हणजे पंतप्रधान नरेंद्र मोदी क्वाड शिखर परिषद व संयुक्त राष्ट्रसंघाच्या महत्त्वपूर्ण परिषदेत सहभागी होण्यासाठी निघत असतानाच नौदलाची मारक क्षमता वाढविण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. चीनचा वाढता उपद्रव लक्षात घेता क्वाड शिखर परिषद सुरू होण्यापूर्वीच भारताने घेतलेला हा निर्णय अनेक अर्थाने महत्त्वाचा आहे. चतुर्भुज सुरक्षा संवाद अर्थात क्वाड्रीलॅटरल सिक्युरिटी डायलॉग, ज्याला सामान्यत: 'क्वाड' म्हणून ओळखले जाते, त्यात भारतासह ऑस्ट्रेलिया, जपान व अमेरिकेचा समावेश आहे आणि या चारही देशांना आक्रमक व विस्तारवादी ड्रॅगनचा मोठ्या प्रमाणात धोका आहे. हिंद महासागर क्षेत्रात भारतीय नौदलापुढे अनेक आव्हाने आहेत. भारतीय नौदलाने आपल्या सामर्थ्याचे आणि एकूणच लढाऊ क्षमतेचे प्रदर्शन करण्यासाठी डिसेंबर २०२३ मध्ये १०० दिवसांची संकल्प मोहीम हाती घेतली होती. या मोहिमेचा समारोप २३ मार्च २०२४ मध्ये झाला होता. आज सहा महिन्यांनंतर पुन्हा नवे नौदल प्रमुख व्हाईस ॲडमिरल दिनेशकुमार त्रिपाठी यांनी नौदलाची लढाऊ क्षमता वाढविण्याचा निर्णय जाहीर करून या संकल्प मोहिमेला प्रत्यक्ष कृतीची जोड दिली आहे. १०० दिवसांच्या आपल्या संकल्प मोहिमेच्या कालावधीत हिंद महासागरात सागरी सुरक्षेशी संबंधित १८ घटना भारतीय नौदलाने शीघ्र आणि प्रथम प्रतिसाद देत हाताळल्या. तसेच ते या कामासाठी सर्वोच्च प्राधान्य दिले गेलेले नौदल ठरले. आणखी एक महत्त्वाची गोष्ट म्हणजे भारतीय नौदलाने हिंद महासागर क्षेत्रात ११ पाणबुड्या तैनात करून चीनला स्पष्ट संदेश दिला. अशाप्रकारे सामर्थ्याचे दर्शन घडविण्याची तीन दशकांतील ही पहिलीच वेळ आहे, हे विशेषत्वाने नमूद केले पाहिजे. हिंद महासागरात चीनच्या हालचालींमध्ये वाढ झाली आहे. कुठल्याही वेळी चीनच्या पाच ते नऊ युद्धनौका या क्षेत्रात असतात. पाणबुडीसारख्या छुप्या आयुधाने कुठलेही आव्हान मोडून काढण्याची सज्जता आणि वेळप्रसंगी व्यापारी मार्गांवर प्रभाव पाडण्याची क्षमता भारतीय नौदलाने अधोरेखित केली. इस्रायल-हमास संघर्षाच्या पृष्ठभूमीवर भारतीय नौदलाने आपल्या सागरी सुरक्षा मोहिमांची व्याप्ती लक्षणीयरीत्या वाढविली आहे. माल्टाच्या एमव्ही रुएन या मालवाहू जहाजाचे अपहरण झाले, तेव्हा त्याचा शोध घेण्यात भारतीय नौदलाने सक्रिय भूमिका बजावली होती. नौदलाची जहाजे, विमाने आणि विशेष दलांनी सागरी सुरक्षेसाठी आणि सागरी सेवेत कार्यरत समुदायाचे विविध अपारंपरिक धोक्यांपासून रक्षण करण्याचा निर्धार केला आहे. या क्षेत्रातील धोक्यांविषयीच्या माहितीचे आकलन झाल्यानंतर एडनचे आखात आणि लगतचा प्रदेश, अरबी समुद्र तसेच सोमालियाचा पूर्व किनारा अशा तीन भागांत भारतीय नौदलाने विशेष मोहीम राबविली होती. या मोहिमेची आंतरराष्ट्रीय पातळीवर दखल घेण्यात आली. या मोहिमेंतर्गत सागरी क्षेत्रातील धोक्यांना तोंड देण्यासाठी गस्त घालणाऱ्या विमानाचे १००० तास उड्डाण झाले. भारतीय नौदलाच्या अथक प्रयत्नांचे हे द्योतक आहे. भारतीय नौदलाच्या या प्रयत्नांमध्ये भारताच्या सागरी हितांचे रक्षण करणे, सागरी धोक्यांचा सामना करणे, पुन्हा डोके वर काढणाऱ्या चाचेगिरीला विरोध करणे तसेच भारतीय सागरी क्षेत्रात अमली पदार्थांचा व्यापार लक्षणीयरीत्या कमी करणे अशा कामगिरींचा समावेश आहे. अरबी समुद्र, बंगालचा उपसागर, तांबडा समुद्र, पर्शियाचे आखात आणि बब-एल मंडप, होमुझ, मलक्का, सुंदा व लॅबॉक यासारख्या सामुद्रधुनींना सामावणारा हिंद महासागरातील मध्यवर्ती भूभाग म्हणून भारतीय द्वीपकल्पाचे स्थान महत्त्वपूर्ण आहे. जगातील ५० टक्के माल वाहतूक आणि खनिज तेल वाहून नेणाऱ्या दोन तृतीयांश जहाजांची वाहतूक येथून होते. या क्षेत्रातील चिनी आव्हानांना शह देण्यासाठी भारतीय नौदलाने पाणबुडी तैनातीचा पवित्रा घेतला. निकोबार बेट समूहातील कॅम्पबेलपर्यंत एका पाणबुडीने मार्गक्रमण केले. हिंद महासागराला दक्षिण चीन समुद्राशी जोडणारी मलाक्काची अरुंद पट्टी चीनसाठी आर्थिक व सामरिकदृष्ट्या महत्त्वाची आहे. इंडोनेशियाच्या उत्तरेस केवळ १४५ किलोमीटर अंतरावर हे बेट आहे. ग्रेट निकोबार व बेट सुमात्रादरम्यानच्या व्यापारी मार्गांना ते प्रभावित करू शकते. भारताच्या मुख्य भूमीपासून दीड हजार किलोमीटर अंतरावर विकसित केलेल्या 'आयएनएस बाझ' तळाने सभोवतालच्या क्षेत्रावर देखरेखीसाठी भारतीय नौदलास मोठी शक्ती मिळाली आहे.

भारतीय नौदल आपली शक्ती वेगाने वाढविण्याचा प्रयत्न करीत असला, तरी बलाढ्य ड्रॅगनचे आव्हान फार मोठे आहे. या पृष्ठभूमीवर संरक्षण मंत्रालयाने नवीन ६८ युद्धनौका खरेदी करण्यास मंजुरी दिली असल्याची माहिती आहे. यासाठी २ लाख कोटी रुपये खर्च येणार आहे. वर्ष २०३५ पर्यंत भारत त्याच्या युद्धनौकांची संख्या १७५ करण्याचा प्रयत्न करत असून लढाऊ विमाने आणि हेलिकॉप्टर संख्या वाढवण्यात येणार आहे. नौदलाकडे सध्या १४३ विमाने, १३० हेलिकॉप्टर आणि १३२ युद्धनौका आहेत. आता नवीन पिढ्यांच्या युद्धनौका, पाणबुड्या तसेच अन्य नौका खरेदी करण्याची अनुमती देण्यात आल्याने नौदलाचा मारक क्षमतेत वाढ होणार, यात शंकाच नाही. चीन सध्या हिंद महासागरात त्याचा नौदल तळ बनवण्याच्या प्रयत्नात आहे. त्यासाठी त्याने आफ्रिकेतील जिबुती, पाकचे कराची आणि ग्वादर तसेच कंबोडिया येथील मरी पोर्ट येथे नाविक तळ उभारण्यास प्रारंभ केला आहे. जवळपास ३५० जहाज सामावणारे चीन हे जगातील आकारमानाने सर्वात मोठे नौदल झाले आहे. त्याच्या सुदूर सागरातील हालचाली वेगाने वाढत असून कुठल्याही वेळी पाच ते नऊ चिनी युद्धनौका, पाणबुड्या हिंद महासागर क्षेत्रात कार्यरत असतात. संशोधनाच्या नावाखाली चिनी जहाजे संचार करीत असतात. नोव्हेंबर २०२३ मध्ये चिनी नौदलाच्या डिझेल-इलेक्ट्रिक पाणबुडीने पश्चिम हिंद महासागरात पाकिस्तानी नौदलासोबत संयुक्त सागरी गस्तीत सहभाग घेतला होता. चीनकडील पाणबुड्यांचा ताफा विस्तारत आहे. पाकिस्तानी नौदल सक्षम करण्यासाठी तो तांत्रिक मदत पुरवतो. हिंद महासागर क्षेत्रात वर्चस्व निर्माण करण्यासाठी ड्रॅगनची धडपड सुरू आहे. चिनी नौदलाकडे बॅलेस्टिक क्षेपणास्त्र डागण्याची क्षमता राखणाऱ्या सहा पाणबुड्या आहेत. डिझेलवर आधारित ४६ पाणबुड्यांचे तो संचालन करतो. चिनी नौदलाच्या आराखड्यानुसार ६५ ते ७० पाणबुड्यांच्या देखभाल दुरुस्तीचे नियोजन आहे. गेल्या १० वर्षांत चीनने १५० नवीन युद्धनौका बांधल्या आहेत. त्यामुळेच सभोवतालची बदलती परिस्थिती आणि ड्रॅगनच्या धोक्यांना तोंड देण्यासाठी भारतीय नौदलाची जहाजे, युद्धनौका, पाणबुड्या व विमाने अशा सर्व स्तरांवर समतोल बांधणीची गरज संसदेच्या संरक्षणविषयक स्थायी समितीने मागेच स्पष्टपणे मांडली आहे. चीनचे हे वाढते आव्हान लक्षात घेता केंद्रातील मोदी सरकारनेही आपल्या संरक्षण बजेटमध्ये भरीव वाढ केली आहे. मात्र, आता आयातीत सामग्रीवर अवलंबून न राहता केंद्र सरकारने स्वदेशी बनावटीच्या अत्याधुनिक लढाऊ जहाज निर्मितीला प्राधान्य देण्याची आवश्यकता आहे. २०२७ पर्यंत नौदलास २०० जहाजांनी सुसज्ज करण्याची योजना आहे. मात्र, ती संथगतीने पुढे जात आहे. याला अधिक गती देण्याची गरज आहे. तरच साम्राज्यवादी चीनचे आव्हान यशस्वीपणे परतावून लावता येईल.

## दिल्ली दिनांक

**रवींद्र दाणी**

# दिल्लीत हंगामी मुख्यमंत्री!

दक्षिण दिल्लीच्या कालकाजी विधानसभा मतदारसंघातून निवडून आलेल्या आतिशी सिंग या दिल्लीच्या मुख्यमंत्री असतील. दिल्लीच्या मुख्यमंत्रिपदी विराजमान होणाऱ्या त्या तिसऱ्या महिला ठरल्या आहेत. केजरीवाल यांनी राजीनामा दिल्यास ते आतिशी सिंग यांना मुख्यमंत्री करतील, हे स्पष्ट झाले होते. १५ ऑगस्ट रोजी दिल्ली सरकारच्या वतीने झेंडावंदन करण्यासाठी केजरीवाल यांनी आतिशी यांचे नाव निश्चित केले होते. तसा निरोप त्यांनी तिहार कारागृहातून दिला होता. पण, नायब राज्यपालांनी हे नाव डावलून कैलाश गहलोत या मंत्र्यास झेंडावंदन करण्यास सांगितले होते. स्व. सुषमा स्वराज या दिल्लीच्या पहिल्या महिला मुख्यमंत्री होत्या. त्यांना केवळ ५२ दिवसांचा अवधी मिळाला होता. नंतर शीला दीक्षित मुख्यमंत्री झाल्या. त्या १५ वर्षे या पदावर होत्या. आता आतिशी सिंग या मुख्यमंत्री झाल्या आहेत आणि त्यांची स्थिती एक हंगामी मुख्यमंत्री अशी राहणार आहे.

**फेब्रुवारीत केजरीवाल?** : २०२५ च्या फेब्रुवारी महिन्यात दिल्ली विधानसभेची निवडणूक होईल. त्यानंतर केजरीवाल पुन्हा मुख्यमंत्री होतील, असे संकेत आहेत. केजरीवाल यांनी राजीनामा देताना एक चालाखी केली आहे. 'न्यायालयात निर्दोष सिद्ध होईपर्यंत आपण या पदावर बसणार नाही,' असे त्यांनी म्हटलेले नाही. ही भूमिका भाजपा नेते लालकृष्ण अडवाणी यांनी हवाला प्रकरणात घेतली होती. न्यायालयात आपले निर्दोषत्व सिद्ध होईपर्यंत आपण संसदेत जाणार नाही, असे त्यांनी घोषित केले होते आणि त्यावर ते कायम राहिले. केजरीवाल यांनी न्यायालयीन प्रक्रियेचा उल्लेख केलेला नाही. दिल्लीच्या जनतेने आपल्याला निर्दोष असल्याचे प्रमाणपत्र दिल्यानंतरच आपण मुख्यमंत्रिपदाच्या व मनीष सिसोदिया उपमुख्यमंत्रिपदाच्या खुर्चीवर बसतील, असे त्यांनी म्हटले आहे. त्यांनी जनतेच्या न्यायालयाचा दाखला दिला आहे. फेब्रुवारी महिन्यात होणार असलेल्या निवडणुकीत पुन्हा केजरीवाल निवडून येतील, असा अंदाज वर्तविला जात आहे. भारताच्या राजकारणात कारागृहात जाऊन कोणताही नेता संपलेला नाही. तिहारमध्ये सहा महिने राहिल्याचा फायदा ते निवडणुकीत उठवतील असे दिसते. निवडणूक प्रचारात ते आपल्या सरकारच्या कामाचा उल्लेख कमी आणि राजकीय कारणांसाठी आपल्याला कसे लक्ष्य केले जात आहे, याचा उल्लेख जास्त करतील असे दिसते. आज तरी दिल्ली भाजपा वा काँग्रेसजवळ केजरीवाल यांच्या तोडीचा नेता नसल्याने केजरीवाल यांना जनादेश मिळेल असे मानले जाते. मात्र, त्यांच्या जागा कमी होतील हेही मानले जाते.



**पर्याय नव्हता** : केजरीवाल यांनी कारागृहात असताना राजीनामा दिला नाही आणि कारागृहाबाहेर आल्यावर त्यांनी राजीनामा का दिला, असा एक प्रश्न विचारला जात असला, तरी त्यांच्यासमोर राजीनामा देण्याशिवाय पर्याय नव्हता, हे त्याचे उत्तर आहे. दिल्ली मद्य घोटाळ्यात अंमलबजावणी संचालनालय व सीबीआय यांनी दोन वेगवेगळे गुन्हे त्यांच्यावर दाखल केले आहेत. या दोन्ही प्रकरणांत सर्वोच्च न्यायालयाने त्यांना हंगामी जामीन दिला असला, तरी दोन अटीही टाकल्या आहेत. पहिली अट म्हणजे त्यांना दिल्ली सचिवालयात जाता येणार नाही आणि दुसरी अट आहे त्यांना मुख्यमंत्री म्हणून कोणत्याही सरकारी फाईलींवर सही करता येणार नाही. या दोन अटींचे पालन करीत आपण मुख्यमंत्री राहिल्यास आपले हसे होईल, हे केजरीवाल यांच्या लक्षात आले होते. ती स्थिती तयार होण्यापूर्वी त्यांनी राजीनामा देण्याचा निर्णय घेतला.

**सोरेन अधिक हुशार!** : केजरीवाल आणि झारखंडचे मुख्यमंत्री हेमंत सोरेन यांची 'केस' जवळपास सारखी होती. सोरेन यांनी अटक होण्याची चिन्हे दिसताच राजीनामा दिला. स्वाभाविकच सर्वोच्च न्यायालयाने त्यांना जामीन देताना मुख्यमंत्री कार्यालयात जाऊ नका, सरकारी फाईलींवर सह्या करू नका, अशा अटी टाकल्या नाहीत. त्यामुळे सोरेन पुन्हा मुख्यमंत्री झाले. मात्र, त्यांनी एक चूक केली. विधानसभा निवडणूक जवळ आली असताना चंपाई सोरेन यांना मुख्यमंत्रिपद सोडण्यास सांगितले. निवडणुका होईपर्यंत त्यांनी संयम दाखविला असता तर चंपाई सोरेन यांना पद गमावण्याची वेळ त्यांच्यावर आली नसती.

**नवी निवड** : केजरीवाल आतिशी सिंग यांना मुख्यमंत्री करतील असे अपेक्षित होतेच. अन्य कोणत्याही नेत्यावर त्यांचा विश्वास नाही. आतिशी सिंग या सर्वात कमजोर नेत्या मानल्या जातात. त्यांना ना जनाधार आहे ना जातीचा आधार आहे. त्या उच्चशिक्षित आहेत हीच काय त्यांची जमेची बाजू. २०२५ ची निवडणूक जिंकल्यानंतर ती आपल्या नेतृत्वाखाली जिंकली आहे, असा दावा न करणारा मुख्यमंत्री त्यांना हवा होता. यासाठी आतिशी सिंग यांच्यापेक्षा दुसरे कोणतेही चांगले नाव त्यांच्याजवळ नव्हते. मधल्या काळात केजरीवाल यांची पत्नी सुनीता केजरीवाल यांच्या नावाचीही चर्चा झाली. पण, यातील धोका ओळखण्याइतपत ते हुशार असल्याने त्यांनी ती चूक केली नाही. आपण आपल्या पत्नीला मुख्यमंत्री केल्यास आपल्यावर परिवारवादाचा आरोप लावला जाईल, याची पूर्ण कल्पना असल्याने त्यांनी तो निर्णय घेण्याचे टाळले. आतिशी सिंग या महिला आहेत, केंब्रिजमध्ये शिकलेल्या आहेत आणि केजरीवाल यांच्याशी एकनिष्ठ आहेत या तीन कारणांमुळे त्यांची निवड करण्यात आली असल्याचे सांगितले जाते.

**राजभवनाशी संघर्ष** : राजधानीत आपचे सरकार आल्यापासून केजरीवाल यांचा राजभवनाशी संघर्ष सुरू होता. नजीब जंग, अनिल बैजल आणि आता विनयकुमार सक्सेना या सर्व नायब राज्यपालांशी केजरीवाल यांचे संबंध कायम तणावाचे राहिले. आता मुख्यमंत्रिपदात बदल झाला असल्याने मुख्यमंत्री आणि नायब राज्यपाल यांच्यात सलोखा दिसेल अशी आशा बाळगण्यास हरकत नाही.

**संकट टळले** : केजरीवाल यांनी मुख्यमंत्रिपदाचा राजीनामा दिला असल्याने आता दिल्लीतील राजकीय व घटनात्मक संकट टळले आहे, असे मानले जाते. त्यांनी राजीनामा दिला नसता तर एक अभूतपूर्व स्थिती राजधानीत तयार झाली असती आणि त्यातून मार्ग काढण्यासाठी राष्ट्रपती राजवट लावणे हा एकच पर्याय केंद्र सरकारसमोर शिल्लक राहिला असता. त्या दिशेने काही हालचाली सुरू झाल्या होत्या. ती स्थिती आता राहिलेली नाही.

**काँग्रेसचा विरोध** : काँग्रेस पक्षाने मागील काही दिवसात केलेली विधाने पाहता या पक्षाने आम आदमी पक्षाशी फारकत घेण्याचा निर्णय घेतला आहे असे दिसते. हरयाणात काँग्रेसने आपशी समझोता करण्यास नकार दिला. पंजाबमध्ये दोन्ही पक्षांमध्ये समझोता कधीच नव्हता. आता दिल्लीतही काँग्रेसने आपच्या विरोधात भूमिका घेतली आहे. केजरीवाल यांना जामीन मिळाला आहे. न्यायालयाने त्यांना निर्दोष सोडलेले नाही, अशी सावध प्रतिक्रिया काँग्रेसने नोंदविली आहे. आपसोबत आमची युती लोकसभेसाठी आहे, विधानसभेसाठी नाही, अशी भूमिका काँग्रेसने घेतली असून याचा आपवर व इंडिया आघाडीतील अन्य पक्षांवर कोणता परिणाम होतो, हे येणाऱ्या दिवसात दिसणार आहे.

**लक्ष हरयाणाकडे** : हरयाणात काँग्रेसकडून झालेल्या अपमानाचा बदला केजरीवाल कसा घेणार याची चर्चा राजकीय वर्तुळात केली जात आहे. या निवडणुकीत भाजपाचे १९ तर काँग्रेसचे २९ बंडखोर उभे आहेत. यातील किती बंडखोरांना केजरीवाल हाताशी धरतात व निवडणूक निकालांना प्रभावित करतात, हे लवकरच दिसणार आहेत. केजरीवाल यांनी काँग्रेसला नुकसान पोहोचविल्यास वा काँग्रेसने आपचा सफाया केल्यास- या दोन्ही स्थितीत दोन्ही पक्षांमधील संबंध अधिक दुरावण्याची शक्यता निर्माण होईल.

## वेध

**अनिल उमाकांत फेकरीकर**

# तारांचे कुंपण लावा! वाघांची दहशत संपवा!!

वाघ म्हणा किंवा वाघोबा तो तुम्हाला सोडणार नाही. संधी मिळताच तो तुमच्या नरडीचा घोट घेणारच. एवढी दहशत वाघांची आहे. कारण तो जंगलाचा राजा आहे. जंगलात राजा टिकलाच पाहिजे. पण प्रजेचे काय? शिवाय पृथ्वीतलावरील मनुष्याचाही विचार तेवढ्याच आत्मीयतेने करायला हवा. पण वर्तमानात वाघांचे कौतुक करताना मनुष्याकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष केले जात आहे. यामुळे जंगलालगत राहणाऱ्या लोकांच्या मनात वाघांबद्दल भीती आणि वन विभागाच्या विरोधात रोष वाढला आहे. याचा प्रत्यय नुकताच रामटेक तालुक्यात आला. वाघाने एका महिलेचा जीव घेतल्यानंतर संतप्त गावकऱ्यांनी वन विभागाच्या कर्मचाऱ्यांवर तुफान दगडफेक केली. कालपर्यंत वन विभागातील कर्मचाऱ्यास काका म्हणून हाक मारणाऱ्या गावातील मुलांनीही दगड हाती धरून त्यांना जखमी केले. त्या गावकऱ्यांची मागणी वाघाला मारून टाका अशी नव्हती, तर त्याला सुरक्षित जागी ठेवा असेच त्यांचे म्हणणे होते. वाघावर गावकरीही प्रेम करतात. पण ज्याच्यावर प्रेम केले जाते, तोच आज त्या गावकऱ्यांच्या जिवावर उठला आहे. म्हणूनच त्यांच्या मते जगा आणि जगू द्या या तत्त्वाने वाघांचा बंदोबस्त करा, एवढीच माफक अपेक्षा त्यांनी वन विभागाकडून व्यक्त केली आहे. आता हा बंदोबस्त कसा करायचा यासंदर्भात पुढाकार वन विभागाला घ्यायचा आहे. माणसाला मारले तर २५ लाख रुपये देत वन विभाग स्वत:ची सुटका करून घेऊ शकत नाही. महागाईच्या काळात २५ लाखांत काहीच होत नाही. द्यायचेच असतील तर वन विभागाने मृत व्यक्तीच्या कुटुंबीयांनी ५ कोटी रुपये द्यायला हवेत. तेव्हा कुठे त्यातून येणाऱ्या व्याजावर त्याचे कुटुंबीय जगेल. पण एवढी रक्कम वन विभाग देणार नाही. यामुळे रोष कधीही कमी होणार नाही, हेही तेवढेच खरे. मग हा प्रकार असाच सुरू ठेवायचा का? नाही. वाघ जगलेच पाहिजे. शिवाय जंगलालगत राहणाऱ्या लोकांचीही सुरक्षा व्हायला हवी. यावर काही सोपे उपाय आहेत.

त्यानुसार जंगलाच्या सभोवताल १० फूट उंच तारांचे कुंपण लावायला हवे. ज्यांना रोज जंगलात गाई-म्हशी, बकऱ्यांना चारायला न्यावे लागते, त्यांना फटाके द्या. शिवाय मोठा आवाज राहील अशी छोट्या आकाराची बॅटरीवर चालणारी साऊंड सिस्टीमही द्या. जेव्हा ते जंगलात राहतील, तेव्हा मोठ्या आवाजात गाणे किंवा कुठलेही संगीत वाजवतील. परिणामी आसपास असलेला वाघ त्यांच्याजवळ भटकणार नाही. असा नवखा प्रयोग पारशिवनी तालुक्यातील कोलितमारा निवासी रामदास सोमकुवर या शेतकऱ्याने केला आहे. याव्यतिरिक्त वनातील प्राणी शेतात आणि गावात पाहुणचारासाठी येऊ नये याकरिता वन विभागानेही जंगलात अधिकाधिक फळांची झाडे युद्धपातळीवर लावत, त्यांचे शंभर टक्के संगोपन करावे. जेणेकरून वन्यप्राण्यांना रसाळ गोमटी फळे जंगलातच खायला मिळतील. जेव्हा ते वन्यप्राणी तिथेच मस्तपैकी पोटभर फळे खातील, तेव्हा त्यांनाच मारून वाघाचेही पोट भरेल नाही का? पण हा साधा उपाय वन विभागाला समजू नये, याचेच आश्चर्य वाटते. समजा तृणभक्षी प्राण्यांना जंगलातच भरपूर खायला मिळाले तर ते कशाला गावात आणि शेतात येतील? पण वन विभागातील हुशार अधिकाऱ्यांनी फळांच्या झाडांकडे दुर्लक्ष करीत सागवान आणि इतर झाडांवर लक्ष केंद्रित केले. परिणामी जंगलात राहणाऱ्या प्राण्यांची उपासमार सुरू झाली. ते पोट भरता यावे म्हणून शेतांकडे वळले. हळूहळू शेतांतून ते गावांत आले आणि आता त्यांचा उपद्रव एवढा वाढला की, तो कमी करणेही कठीण झाले आहे. हरीण, रानडुकरांची संख्या लाखोंच्या घरात आहे. वाघांची संख्याही वेगाने वाढली आहे. भारतात सुमारे ३६८२ वाघ आहेत. महाराष्ट्रात ४४६ वाघांची संख्या आहे. त्यात अजूनही वाढ होतच राहणार आहे. एवढ्या वाघांना पुरेल एवढे जंगलच आज उरलेले नाही. मग ते वाघ गावात नाही घुसणार तर कुठे जातील, याचाही विचार सुज्ञपणे करायलाच हवा. एवढ्या सर्व वाघांना सहजतेने राहू द्यायचे झाल्यास अभयारण्यासह कुठल्याही जंगलाच्या सभोवताल तारेचे दहा फुटी कुंपण टाकल्यास नक्कीच उपाय होऊ शकतो. वाघ सहजतेने गावात येणार नाहीत अन् कटु घटना टळतील. आता यावर वन विभागातील तज्ज्ञ आक्षेप घेतील, एवढ्या मोठ्या क्षेत्रफळात तारेचे कुंपण कसे टाकणार? पैसा कुठून आणायचा अशी अडचण सांगतील. पण माणूस मेल्यावर हेच लोक २५ लाख देतात ना? त्यांनीही याकरिता तरतूद करून तारेचे कुंपण लावा अन् वाघांची दहशत संपवा, हा बेस्ट फॉर्म्यूला अंमलात आणावा. जेव्हा हा प्रयोग सुरू होईल तेव्हा वाघ आणि माणूस यांच्यातील संघर्ष नक्कीच थांबेल.

९८८१७१७८५९

## कानोसा

**अमोल पुसदकर**

# लगीनघाई का नाही?

नुकताच मॉर्गन स्टॅनले नावाच्या जगप्रसिद्ध कंपनीने एक अहवाल जगासमोर मांडला. त्यामध्ये असे म्हटले आहे की, मुलींचे लग्नाचे वय वाढत आहे. मोठ्या संख्येत मुलींना एकटं राहावंसं वाटत आहे. त्यांना लग्न व लग्नामुळे निर्माण होणाऱ्या जबाबदाऱ्या, मुलंबाळं नको आहे. वयाच्या ४५ व्या वर्षांपर्यंत त्यांना एकटं राहावसं वाटत आहे.

भारतासारख्या कुटुंबप्रधान संस्कृती असलेल्या देशाला हे निश्चितच धक्कादायक वाटू शकते. मुलींमध्ये उशिरा लग्न करण्याचा किंवा लग्नच न करण्याचा कल का वाढत आहे, याचाही शोध घेण्याची आवश्यकता आहे. भारतीय समाजाची विशेषता म्हणजे आमची कुटुंब पद्धती आहे. परंतु, लग्नच होणार नसतील किंवा उशिरा होणार असतील तर कुटुंब व्यवस्थेवर त्याचे निश्चितच परिणाम पडणार आहेत. पूर्वी एकत्र कुटुंब पद्धती होती. नोकरी, रोजगार, शिक्षण यामुळे ती हळूहळू समाप्त होत गेली व त्याची जागा एका छोट्या कुटुंबाने घेतली. आज करीअरचे युग आहे. मुलगा असेल किंवा मुलगी; प्रत्येकालाच उत्तम शिक्षण घ्यावे असे वाटत आहे. शिक्षणाचा उपयोग झाला पाहिजे म्हणून नोकरीही केली पाहिजे. त्याचप्रमाणे मोठ्या शहरांमध्ये वाढत्या महागाईला तोंड द्यायचे असेल तर पती-पत्नी दोघांनी पण नोकरी करणे गरजेचे झालेले आहे. त्यामुळे माहेर आणि सासर अशा दोन्ही ठिकाणी मुलींनी नोकरी केली पाहिजे, याला आता पाठिंबा मिळालेला आहे. त्यामुळे मुलींची जडणघडण सुरुवातीपासूनच तुला चांगले शिकायचे आहे, नोकरी करायची आहे, अशा पद्धतीची केली जात आहे. दारासमोर रांगोळी काढली पाहिजे की नाही, स्वयंपाक हे कोणाचे क्षेत्र असावे यावर वाद आहेत. केवळ शिक्षणच नाही तर नोकरीसाठी उच्च शिक्षण घेणे गरजेचे आहे. आजकाल कोणाचा काही भरवसा नाही. त्यामुळे मुली आपल्या पायावर उभ्या झाल्या पाहिजे याबद्दल कोणाचेही दुमत राहिलेले नाही. संसार व्यवस्थित सुरू आहे किंवा नाही यापेक्षा नोकरी सुरू आहे की नाही, हे महत्त्वाचे झाले आहे. परंतु, स्त्री व पुरुष प्रत्येकाचे स्वतःचे असे शरीर निसर्ग नियमाने बांधले गेलेले आहे. त्याच्या काही मर्यादा आहेत. हळूहळू या गोष्टींचा विसर पडत चालला आहे की काय, असे सातत्याने वाटत असते. शिक्षणासाठी लग्नाला उशीर होतो, ही पूर्वीची परिस्थिती होती. त्यानंतर नोकरी लागली की लग्न करू असे म्हणण्याचा कल होता. आता एखादे प्रमोशन मिळाले की लग्न करू, असेही म्हणण्याचा कल दिसून येतो आहे. मुलींचा लग्नासाठी नकार किंवा उशीर याला लग्नामुळे येणारी बंधने कारणीभूत आहेत. आपले हक्काचे राहण्याचे घर सोडून दुसऱ्या घरी जावे लागेल; तिथे आपल्या स्वातंत्र्यावर बंधने येतील. त्यामुळे लग्नाला उशीर केला जात आहे. पूर्वी आई-वडील मुलीसाठी मुलगा पाहायचे. मुलीसुद्धा आपल्याला काय समजते, आई-वडिलांनी पाहिला म्हणजे बरोबरच असेल अशा पद्धतीचा विचार करायच्या. नंतर आई-वडील मुलीला विचारू लागले की, तू कोणी पाहून ठेवला असेल तर आम्हाला सांग. परंतु, मुलींनी जर असा पाहिला नसला तर आई-वडिलांसमोर मुलीसाठी स्थळ शोधणे ही एक मोठी कसरत होऊन गेलेली आहे. त्याला कारणीभूत आहे मुलींच्या वाढलेल्या अपेक्षा. अपेक्षा या असायला हव्यात. चांगला जोडीदार, कर्तबगार जोडीदार, पैसा मिळविणारा जोडीदार अशा अनेक अपेक्षा असू शकतात. परंतु, एकाच व्यक्तीमध्ये किती गुण असावे व असे समाजात किती लोक असावे, हा एक प्रश्न आहे. वाढलेल्या अपेक्षा हा विवाह विलंबाचे एक प्रमुख कारण बनलेले आहे.

लग्नामुळे दोनाचे तीन होणारच आहेत असे समजले जात होते. काही काळापूर्वी 'प्लॅनिंग'च्या नावाखाली त्याला उशीर केला जात होता. परंतु, आता दोघांत तिसरा असावा की नाही, हा मुद्दा चर्चेला आलेला आहे. 'लिव्ह इन रिलेशन' नावाचा एक प्रकार समाजात मोठ्या प्रमाणावर वाढत चाललेला आहे. पूर्वी अपवादाने असलेला हा प्रकार आता राजमान्यता प्राप्त करता झालेला आहे. ज्यांना लग्नाच्या जबाबदाऱ्या नको आहेत ते लोक या पर्यायाकडे बघत आहेत. परंतु, लग्नामुळे जो सामाजिक दर्जा आणि हक्क मुलींना प्राप्त होतो तो 'लिव्ह इन रिलेशन'मुळे प्राप्त होत नाही. ही पण तेवढीच वास्तविकता आहे. साधारणत: मुलेबाळे झाल्यानंतर अनेकांचे संसार स्थिरावतात आणि पुढे चालू लागतात. परंतु लिव्ह इन रिलेशनमध्ये तुमचा जोडीदार कधी बाहेर पडेल हे सांगता येत नाही. विवाहातून होणाऱ्या मुलांचा सामाजिक दर्जा एक वेगळा असतो. 'लिव्ह इन'मध्ये जन्मलेल्या मुलांना तो दर्जा कधीही प्राप्त होऊ शकणार नाही, हे लक्षात घेतले पाहिजे. लिव्ह इन रिलेशनला लग्नाचा पर्याय समजणे हे कितपत बरोबर आहे, याचा विचार समाजाने करणे आवश्यक आहे.

ज्या नैसर्गिक गोष्टींसाठी विवाह हा एक सर्वमान्य, धर्म मान्य पर्याय होता त्या गोष्टींसाठी तकलादू पर्याय शोधले जात आहेत. त्याचा चेहऱ्यावर, शरीरावर दिसणारा परिणाम आहेच; आज ज्याला स्वातंत्र्य समजतो त्यात उद्याचा एकटेपणा दडलेला आहे. योग्य वयात मुलं न झाल्यामुळे त्यातून निर्माण होणाऱ्या आरोग्याच्या समस्या आहेतच. उशिरा होणाऱ्या विवाहामुळे व मुलांमुळे आपले म्हातारपण जवळ येते, परंतु मुले मोठी झालेली नसतात. त्यांच्या जबाबदाऱ्यातून आपण मोकळे झालेले नसतो. त्यांच्या वयाच्या प्रत्येक अवस्थेमध्ये योग्य तशी साथ आपण त्यांना देऊ शकत नाही. त्यांच्या बालपणामध्ये आपण त्यांच्यासारखे लहान होऊन खेळू शकत नाही. त्यांच्या तरुणपणामध्ये आपण त्यांचे मित्र बनू शकत नाही. त्यांचा गृहस्थाश्रम पाहायला कदाचित आपण नसू. न होणाऱ्या लग्नामुळे अनेक प्रकारांचे आजार उद्‌भवतात. ज्यांना मूलबाळ आहे त्यांना वृद्धाश्रमात राहावे लागते. मग मूलबाळ, लग्नसंसार जर थाटलाच नाही व तसेच आपण एकटे राहिलो व आपला शेवट वृद्धाश्रमात होईल असे समजून घेतले तर काय बिघडले, अशा पद्धतीचा एक युक्तिवाद करण्यात येतो. परंतु वृद्धाश्रम हा अपवाद आहे, नियम नाही हे आपण लक्षात ठेवले पाहिजे. सगळ्यांनी आपल्या आई-वडिलांची काळजी घेतली पाहिजे, असा समाज आपल्याला हवा आहे. वृद्धाश्रम निवासी नाही. त्यामुळे शिक्षण, करीअर, नोकरी हे सर्व करीत असताना लग्नाचे वय, त्याची जीवनातील आवश्यकता, एक आदर्श गृहस्थाश्रम उभा करण्याची मुला-मुलींची जबाबदारी आहे. या गोष्टीकडे दुर्लक्ष व्हायला नको, असे वाटते.

९५५२५३५८१३

(लेखक प्रसिद्ध वक्ते, सामाजिक व राजकीय विचारक आहेत.)

## वाचक पत्रे

### रानवाडी-श्रीनगरमधील खेळाचे मैदान दुर्लक्षित

नागपूरच्या श्रीनगर, रानवाडी येथे खेळाचे मैदान असून एक योगा शेड बांधलेले आहे. मैदानाला कुंपण भिंत घातलेली आहे व मैदानात पायी चालणाऱ्यांसाठी पादपथ बांधण्यात आला आहे. या ठिकाणी पूर्वी योगाभ्यास वर्ग चालायचे. रोज सकाळी राष्ट्रीय स्वयंसेवक संघाची शाखा येथे लागते. सध्या मैदानात सर्वत्र गाजर गवत व इतर झुडपे मोठ्या प्रमाणात वाढले असल्यामुळे मैदान खेळण्यायोग्य राहिलेले नाही. तसेच योगा शेडमध्ये कुत्रे व मोकाट गाई दिवसभर बसून शेण व मूत्र ठिकठिकाणी करून ठेवतात. त्यामुळे सदर मैदान व योगा शेड अतिशय दयनीय अवस्थेत आहे. शासनाने मोठ्या प्रमाणात खर्च करून तयार करून दिलेले खेळाचे मैदान व योगा शेड जर वापरणे योग्य नसेल तर हा शासनाचा निधी वाया गेला असेच म्हणावे लागेल. संबंधित विभागाने लक्ष देऊन मैदानावर योगा शेड तसेच पादपथ झुडपापासून मुक्त करून दिल्यास परिसरातील नागरिक, महिलांना व मुला-बाळांना खेळण्यायोग्य चांगले मैदान उपलब्ध होऊ शकेल.



**मिलिंद देशपांडे**/८९५६९८७०८८

### श्राद्धामध्ये कावळ्याचे महत्त्व

कावळा हा पक्षी जन्मजात देवपुत्र आहे. एखाद्या व्यक्तीच्या मृत्यूनंतर किंवा श्राद्धकर्माचा वेळेस अन्नाच्या रूपामध्ये ठेवलेला घास कावळ्याने उष्टावणे याला विशेष महत्त्व आहे. श्राद्धाच्या वेळेस ठेवलेला अन्नरूपी घास कावळ्याने खाल्ला तर तो पितरांपर्यंत पोहोचतो, अशी मान्यता आहे. इंद्राचा पुत्र जयंत हा अल्पमतीचा असल्यामुळे त्याने कावळ्याचे रूप धारण केले आणि तो सीतामातेची चेष्टा करू लागला. त्याच्या या कृतीमुळे त्याची चोच सीतामातेच्या पायाला लागून पायाच्या बोटामधून रक्त येऊ लागले. कावळ्याच्या या कृत्यामुळे श्रीरामांना राग आला. त्यांनी कावळ्याच्या दिशेने बाण सोडला. भीतीने कावळा प्राण वाचवण्यासाठी आपले वडील इंद्र यांच्याकडे गेला. इंद्राने कावळ्याला श्रीरामांची क्षमा मागायला सांगितली. परंतु, श्रीरामांनी सोडलेल्या बाणामुळे कावळ्याचा एक डोळा फुटला. शरण आलेल्या कावळ्याला श्रीरामांनी वर दिला की, कावळ्याला अर्पण केलेले अन्न हे अर्पण करणाऱ्यांच्या पितरांना मिळेल. तेव्हापासून श्राद्धविधीमध्ये कावळ्याला विशेष महत्त्व आहे.

**संगीता भोसले**/९७६७५६०२३६

### श्राद्ध परंपरा ही पुराणकालीन!

महाभारत युद्धाच्या वेळेस महारथी कर्णाचा वध होतो. दानधर्म केल्यामुळे त्याला स्वर्गाची प्राप्ती होते. त्याला स्वर्गामधील सर्व सुखे मिळतात. परंतु जेव्हा त्याला भूक लागते तेव्हा त्याला त्याने जसे दान केलेले असते तसेच सोने, हिरे, माणके हे ताटामध्ये वाढले जातात. भुकेने व्याकुळ झालेला कर्ण इंद्राकडे जातो आणि म्हणतो की, मला अत्यंत भूक लागली आहे. मला काहीतरी अन्न खाण्यासाठी द्यावे. त्यावर इंद्र त्याला म्हणतो की, तू जसा दानधर्म केला आहेस तेच अन्न म्हणून तुझ्या ताटामध्ये वाढले आहे. कारण, तू हयात असताना तुझ्या पितरांचे श्राद्ध केलेले नाहीस. तुझे पितर उपाशीच आहेत. त्यावर कर्ण इंद्राला म्हणतो की, माझे पितर कोण आहेत हेच मला माहीत नाही. त्यावेळी इंद्र कर्णाला सोळा दिवसांसाठी परत पृथ्वीवर पाठवतो आणि त्याच्या पितरांचे श्राद्ध करण्यासाठी सांगतो. ते दिवस भाद्रपद कृष्ण पक्षाचे होते. कर्णाने पृथ्वीवर येऊन त्याच्या पितरांचे यथोचित श्राद्ध केले. यावरून श्राद्धविधीची परंपरा ही पुराणकालापासून अस्तित्वात आहे, हे लक्षात येते.

**मनीषा बोराटे**/९४०४९५६८२०

### प्रसादांत भेसळ



तिरुपती बालाजी मंदिरात प्रसादात प्राण्यांची चरबी व फिश ऑईल मिक्स असल्याचे प्रयोगशाळेच्या संशोधनात सिद्ध झाले. सध्या सर्वच गोष्टीत भेसळ असते. त्यामुळे मानवी शरीर रोगांचे माहेरघर झालेले आहे. परंतु पवित्र प्रसादापर्यंत मजल जाईल, असे वाटत नव्हते. तिरुपतीचा लाडू म्हणजे भाविकांसाठी पर्वणी आहे. आपण तिरुपतीला गेलो नाही आणि कोणी नुसता प्रसाद जरी दिला तरी धन्य वाटते. तिरुपतीचा लाडू एक महिना चांगला राहतो हेच त्याचे वैशिष्ट्य आहे. परंतु त्यात मांस मिसळून भक्तांच्या भावना दुखावल्या आहेत. त्यांच्या भावनेशी खेळले आहे. खूप लोक मांसाहारी नाहीत. त्यांना केवढा धक्का बसला असेल. त्यांचा विश्वासघात केला. भेसळ करण्यामागे लोकांच्या भावना दुखावणे, जास्त पैसा कमाविणे की, हिंदू धर्म, त्यांचे देव, देवालये भ्रष्ट करणे हा आहे. भ्रष्टाचारी लोकांची नावे जाहीर करा व त्यांना शिक्षा देण्याचा अधिकार भक्तांना द्या...

**निर्मला गांधी**/९११२२७५२८४

हे पत्र मुद्रक व प्रकाशक कुलभूषणराम रामकृष्ण तारे यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय प्लॉट नं ए -३२,छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रियल को ऑफ सोसायटी रेल्वे स्टेशन रोड छत्रपती संभाजी नगर ४३१००५ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक सोलापूर तरुण भारत कार्यालय,छत्रपती संभाजीनगर येथे प्रकाशित करून छत्रपती संभाजीनगर, जालना,परभणी,नांदेड, हिंगोली ,बीड येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून वितरीत केले.
प्रबंध संपादक :विवेक घळसासी. मुख्य समुह संपादक : दिलीप यशवंत पेठे. मुख्य संपादक: प्रशांत वसंतराव माने, दूरध्वनी -८८८८८४७२६८
RNI Reg.No 46878/87
stbaurangabad@gmail.com. www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

# केज मध्ये थरार, भरदिवसा विद्यार्थ्याच्या अपहरणाचा प्रयत्न!

## एकास पकडले दोघे फरार, लेकरांना पकडणारी टोळीची चर्चा





**तभा वृत्तसेवा**
**केज दि.२३ सप्टेंबर**

केज शहरातील मुख्य रस्त्यावर सोनार गल्लीत चार चाकी मधून आलेल्या तिघांनी शाळेत चाललेल्या विद्यार्थ्याचे अपहरण करण्याचा प्रयत्न केला. परंतु काही तरुणांनी हा प्रयत्न हाणून पाडला. अपहरण करणारा एक जण हाती लागला असून दोघे पळून जाण्यात यशस्वी झाले. या थरारक घटनेने शहरात खळबळ उडाली असून बालके चोरणारी टोळी पडल्याची शहरात चर्चा सुरू झाली आहे. पकडलेल्या त्या व्यक्तीला पोलिसांच्या ताब्यात दिले असून नेमका हा प्रकार काय? हे तपासातून समोर येईल. मेन रोडने सकाळी १० च्या सुमारास एक विद्यार्थी सोनार गल्लीतून शाळेला जात होता. त्यावेळी अचानक एक चारचाकी वाहन आले. ते वाहन मुलाजवळ येऊन थांबले काही समजण्याच्या आत त्या विद्यार्थ्याला उचलून वाहनात टाकण्याचा प्रयत्न केला असता घडलेल्या या अनुचित प्रकार विद्यार्थी घाबरुन ओरडू लागला तर हे पाहून बाजुला उभी असलेल्या महिलेनेही आरडाओरडा केली. हे ऐकून काही नागरिकांनी धाव घेतली तर दोघांनी दुचाकी चारचाकीच्या समोर लावली असता त्यांना पळता आले नाही. परंतु झटापटीत दोघे पळून जाण्यात यशस्वी झाले तर एकजण जमावाच्या हाती लागला. त्यास जमावाने चांगलाच चोप दिला. भरदिवसा रहदारीच्या ठिकाणी ही घटना घडल्याने केज शहरात खळबळ उडाली आहे. या पकडलेल्या एक अपहरणकर्त्याला पोलिसांच्या ताब्यात दिले आहे. हा प्रकार नेमका काय ? हे पोलीस तपासात निष्पन्न होईल. पण शहरात बालके चोरणारी टोळी पकडल्याची जोरदार चर्चा सुरू झाली आहे.

# बीड जि.प.च्या मुख्य कार्यकारी अधिकारीपदी आदित्य जीवने

बीड (प्रतिनिधी)- बीड जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारीपदी आदित्य जीवने यांची नियुक्तीचे आदेश मंत्रालय सामान्य प्रशासन व्ही.राधा यांनी नियुक्तीचे आदेश दिले आहेत.



आदित्य जीवने हे बीडला यापूर्वी प्रशिक्षणार्थी तहसीलदार, बीडीओ आदि पदावर त्यांनी काम केले आहे. त्यामुळे त्यांना बीडच्या प्रशासनाचा अनुभव आहे. आदित्य जीवने हे प्रकल्प अधिकारी आदिवासी विकास प्रकल्प आहेरी तथा सहाय्यक जिल्हाधिकारी आहेरी उपविभाग या ठिकाणी कार्यरत होते. तेथून त्यांची बीड जि.प.च्या मुख्य कार्यकारी अधिकारी म्हणून नियुक्ती झाली आहे.

# अंबाजोगाईकरांना दिलासा : मांजरा धरणात पाणी साठा ८७ टक्क्यांच्या घरात

**तभा वृत्तसेवा**
**अंबाजोगाई दि.२३ सप्टेंबर**

अंबाजोगाईकरांची जीवनवाहिनी असलेल्या मांजरा धरणात जलसंचय वाढत असल्याने धरणातील एकूण पाणीसाठा वाढत आहे. मांजरा धरणाचा जिवंत पाणी साठा ८७.३९ टक्क्यांच्या घरात पोहचला आहे. यामुळे वर्षभराचा पाण्याचा प्रश्न मार्गी लागणार असल्याने अंबाजोगाईकरांना चांगलाच दिलासा मिळाला आहे.

पावसाने पाठ फिरवल्याने गेल्या वर्षी मांजरा धरण भरले नाही. त्यामुळे यंदा पुरेसा पाऊस पडणार का ? मांजरा धरण भरणार का ? याकडे तमाम अंबाजोगाईकरांचे लक्ष लागले होते. धरण क्षेत्रात गेल्या काही दिवसांत झालेल्या दमदार पावसामुळे मांजरा धरणात पाण्याची आवक वाढली आहे. त्यातच धरण क्षेत्रात गेल्या काही दिवसात पाऊस हजेरी लावत आहे. त्यामुळे धरणात दररोज एक ते दोन टक्क्यांची वाढ होत आहे.

धरणातील एकूण पाणी पातळी वाढली आहे. पाऊस असाच राहिला तर मांजरा धरण लवकरच भरेल, अशी आशा व्यक्त केली जात आहे. यामुळे पिण्याच्या पाण्याबरोबरच सिंचनाचा प्रश्न मार्गी लागणार आहे. त्यामुळे शेतकऱ्यांमधून समाधान व्यक्त केले जात आहे.

# थेटेगव्हाण ग्रामपंचायतने संत गाडगे बाबा ग्रामस्वच्छता अभियानात जिल्ह्यात प्रथम क्रमांक पटकवला

### सरपंच भाऊसाहेब चव्हाण आणि गावकऱ्यांच्या एकजुटीने संघटित प्रयत्नांसह उत्कृष्ट कामगिरी; ग्रामीण आरोग्य सुधारण्यासाठी स्वच्छता महत्त्वाची

**तभा वृत्तसेवा**
**किल्लेधारूर दि.२३ सप्टेंबर**

संत गाडगे बाबा ग्रामस्वच्छता अभियान २०२३-२४ मध्ये जिल्हाभरातील शेकडो ग्रामपंचायतींनी सहभाग घेतला. धारूर तालुक्यातील थेटेगव्हाण ग्रामपंचायतीनेही या स्पर्धेत भाग घेतला. नुकत्याच झालेल्या जिल्हास्तरीय तपासणीत थेटेगव्हाण ग्रामपंचायतने उत्कृष्ट कामगिरी करत जिल्ह्यातील सर्व ग्रामपंचायतींमध्ये सर्वोच्च गुण मिळवले.



थेटेगव्हाणच्या सरपंच भाऊसाहेब चव्हाण, ग्रामसेवक प्रीती शिंदे, उपसरपंच, सर्व ग्रामपंचायत सदस्य आणि गावकऱ्यांना जिल्हास्तरीय प्रथम क्रमांक मिळवण्यासाठी सर्व स्तरातून शुभेच्छा दिल्या जात आहेत.

सध्या अनेक ठिकाणी साफसफाईच्या अभावामुळे रुग्णसंख्येत वाढ होत आहे. अनेक ग्रामपंचायती स्वच्छतेला विशेष महत्त्व देत नाहीत, ज्यामुळे त्यांच्या समुदायात गंभीर आरोग्य समस्या आणि दैनंदिन समस्या उद्भवतात. याला प्रत्युत्तर म्हणून, राज्य शासनाने ग्रामीण भाग स्वच्छ आणि समृद्ध करण्यासाठी संत गाडगे बाबा ग्रामस्वच्छता अभियानाची अंमलबजावणी केली आहे.

जिल्हाभरात अनेक ग्रामपंचायती या स्पर्धेत भाग घेतात, परंतु काहीच ग्रामपंचायती अंतिम टप्प्यात यशस्वीपणे प्रवेश करतात. धारूर तालुक्यातील थेटेगव्हाण ग्रामपंचायतीने या उपक्रमात भाग घेतला. सरपंच भाऊसाहेब चव्हाण यांनी सर्व ग्रामपंचायत सदस्यांना आणि गावकऱ्यांना सांगितले की, स्पर्धा जिंकणे महत्वाचे आहे, पण त्याहून महत्त्वाचे म्हणजे गावकऱ्यांचे आरोग्य आणि कल्याण सुनिश्चित करणे आवश्यक आहे. त्यांनी स्वच्छतेद्वारे प्रत्येक आरोग्याशी संबंधित समस्येवर मात करण्याची गरज स्पष्ट केली आणि यामुळे गावकऱ्यांना स्पर्धेच्या अंतिम टप्प्यात पोहचण्यास मदत झाली.

नुकत्याच जाहीर करण्यात आलेल्या जिल्हास्तरीय पुरस्कारांमध्ये उत्कृष्ट थेटेगव्हाण ग्रामपंचायतीने प्रथम क्रमांक मिळवला, आणि त्याच्या या यशाबद्दल सर्व स्तरातून प्रशंसा प्राप्त होत आहे. सरपंच भाऊसाहेब चव्हाण, ग्रामसेवक प्रीती शिंदे, उपसरपंच, आणि सर्व गावकऱ्यांच्या प्रयत्नांचा या उपक्रमाच्या यशामध्ये महत्त्वाचा वाटा आहे.गट विकास अधिकारी संतोष वंगवडे आणि जिल्हा परिषदेतील अधिकारी कर्मचारी यांचे मार्गदर्शन महत्त्वाचे ठरले.

# सात दिवसापासून मंजरथ रस्ता कामासाठी सुरू असलेले उपोषण घेतले मागे

## सभापती डक यांनी मध्यस्थी करत अधिकाऱ्यांकडून घेतले लेखी आश्वासन

**तभा वृत्तसेवा**
**माजलगाव दि.२३ सप्टेंबर**

माजलगाव ते मंजरथ रस्त्याचे काम अंदाज पत्रकानुसार करण्यात यावे या मागणीसाठी शिवसंग्रामचे तालुकाध्यक्ष उत्तम पवार यांनी मराठवाडा मुक्तीदिनी गावकऱ्यांसह उपोषणास सुरुवात केली होती. उपोषणाच्या सातव्या दिवसी



मुंबई कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती अशोक डक यांनी उपोषण स्थळी उपोषणकर्त्याची भेट घेऊन संबंधित अधिकाऱ्यांना यावेळी फैलावर घेतले.दरम्यान लेखी आश्वासनाने व अशोक डक यांच्या मध्यस्थीने उपोषणकर्त्याने उपोषण मागे घेतले आहे.

दक्षिण काशी म्हणून पंचक्रोशीत लौकिक असलेल्या मंजरथ या गावचा रस्ता पंतप्रधान ग्रामीण सडक योजनेतून सुरू करण्यात आला आहे.१० कोटी ७० लाख रुपये या कामावर खर्च करण्यात येत आहे.परंतु या रस्त्यावर अत्यंत थातूरमातूर पद्धतीने काम करण्यात येत आहे.कामावर कोणत्याही अधिकार्याचे लक्ष नाही.अंदाज पत्रकानुसार काम करण्यात येत नाही.गावाचे महत्त्व पाहता या गावात दशक्रियेसाठी दररोज या रस्त्यावरून शेकडो वाहनाची येजा होते.परंतु याचं कुठलंही गांभीर्य संबंधित गुत्तेदाराला नाही.ही बाब शासनाच्या निदर्शनास आणण्यासाठी शिवसंग्रामचे तालुका अध्यक्ष उत्तम पवार यांनी गावकऱ्यांना सोबत घेऊन १७ सप्टेंबर मराठवाडा मुक्तीदिनी आमरण उपोषणास सुरुवात केली आहे.आज उपोषणाचा सातवा दिवस आहे.परंतु अद्याप कोणीही अधिकाऱ्याने या उपोषणास भेट दिली नाही.सोमवारी दि.२३ रोजी मुंबई बाजार समितीचे सभापती अशोक डक यांनी उपोषण स्थळी भेट दिली.उपोषणकर्त्याची अस्तेवायीक चौकशी केली. तहसीलदार संबंधित अधिकाऱ्यांना उपोषणस्थळी बोलावून घेतले. संबंधित प्रश्नाविषयी त्यांना धारेवर धरत तात्काळ उपाययोजना करण्याचे लेखी आश्वासन घेतले.त्यामुळे डक यांच्या मध्यस्थीने उपोषण करते उत्तम पवार यांनी आपले ७ दिवसापासून सुरू असलेले उपोषण मागे घेतले. यावेळी माजी सभापती संभाजी शेजुळ यांची उपस्थिति होती.

**मतदार संघातील सर्वच रस्ता कामे बोगस-अशोक डक**

माजलगाव मतदार संघात रस्ता कामासाठी करोडो रुपयांचा विकास निधी आलेला आहे.ठीक ठिकाणी कामे सुरू आहेत.परंतु ही सर्वच कामे बोगस,दर्जाहीन करण्यात येत आहेत.अधिकाऱ्यांचे या कामावर लक्ष नाही.त्यामुळे गुत्तेदाराकडून मुजोरी करण्यात येते.दादागिरी सुरू आहे.अशा बोगस कामाविरोधात रस्त्यावर उतरणार असल्याचे मुंबई बाजार समितीचे सभापती अशोक डक यांनी सांगितले.

# माजलगावात धनगर समाजाचा एसटी आरक्षणासाठी दोन तास रस्ता रोको आंदोलन

## ट्राफिक सुरळीत करण्यासाठी पोलीस प्रशासनाला लागले दोन तास माजी आमदार होके आडसकर जगताप नाईकनवरे यादव यांनी दिला पाठिंबा

**तभा वृत्तसेवा**
**माजलगाव दि.२३ सप्टेंबर**

गेल्या अनेक वर्षापासून धनगर समाजाची एसटी आरक्षणाची मागणी राज्यकर्त्यांच्या उदासीन धोरणामुळे प्रलंबित आहे या जिव्हाळ्याच्या मागणीसाठी माजलगाव तालुक्यातील सकल धनगर समाजाच्या वतीने परभणी फाटा येथे दिनांक २३ सप्टेंबर रोजी तब्बल दोन तास रस्ता रोको आंदोलन करण्यात आले या रोडवरील वाहतूक सुरळीत करण्यासाठी पोलीस प्रशासनाला तब्बल दोन लागले .



धनगर जमातीस एसटी आरक्षणाची अंमलबजावणी करावी या जिव्हाळ्याच्या मागणीसाठी पंढरपुर ,लातुर,येथे दि.९ सप्टेंबर पासून राज्यव्यापी आमरण उपोषण सुरू आहेत या आंदोलनास पाठिंबा म्हणून दि. २३ सप्टेंबर रोजी सबंध महाराष्ट्रात रास्ता रोको आंदोलन करण्याचे हाक समाजाच्या वतीने देण्यात आली होती म्हणून त्या हाकेला ओ म्हणून माजलगाव तालुक्यातील सकल धनगर समाजाच्या वतीने परभणी फाटा चौकत दि. २३ सप्टेंबर रोजी सकाळी ११ ते दुपारी १वाजेपर्यंत तब्बल दोन तास रस्ता रोको आंदोलन करण्यात आले या आंदोलनात सहभागी होऊन माजीआ. राधाकृष्ण होके पाटील, रमेशराव आडसकर, नितीनराव नाईकनवरे, राहुल जगताप, शरद यादव, यांनी मनोगत व्यक्त करून जाहीर पाठिंबा दिला आहे.

तर समाजाच्या वतीने डॉ. भगवानराव सरवदे, तुकाराम येवले, विजय धायगुडे , प्रा. प्रकाश गवते, ज्ञानेश्वर सरवदे, अँड संतोष बाबरे,मुक्तीराम आबूज, राम अबुज ,राजा अर्जुन, यांनी मनोगत व्यक्त केली.तर सूत्रसंचालन विशाल देवकते यांनी केले.या रस्ता रोकोला बबनराव सरवदे अण्णासाहेब वगरे विलास नेमाने,अविनाशराव कांडुरे,सुभाषराव गडदे किसनराव हराळ कल्याणराव गवते प्रभाकर धरपडे ,नारायण सातपुते, डॉ अशोक तिडके, लक्ष्मणराव गायकवाड,कल्याण कसपटे, यांच्यासह हजारो तरुण वृद्ध याआंदोलनात सहभागी झाले होते.यावेळी महसूल च्या वतीने महामुनी आणि रूपचंद आभारे यांनी आंदोलनकर्त्यांचे निवेदन स्वीकारले यावेळी पोलीस निरीक्षक बालक कोळी यांनी चोक बंदोबस्त दिला होता

# शेती क्षेत्रातील सन्मान आणि वैद्यकीय सेवेत वचनबद्धता

## धर्मराज थोरात: 'शेतीमध्ये अनेक संधी आहेत'; डॉ. एकनाथ शेळके: 'रुग्णांची सेवा म्हणजे ईश्वराची सेवा'

**तभा वृत्तसेवा**
**किल्लेधारूर दि.२३ सप्टेंबर**

किल्ले धारूर २२ सप्टेंबर २०२४ रोजी वसंत शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी सहकारी पतसंस्था केज किल्ले धारूर येथे गरड मंगल कार्यालयामध्ये लोकनेते कैलास वासी बाबुराव आडसकर साहेब जीवनगौरव पुरस्कार वितरण समारंभ आणि २७व्या वार्षिक सर्वसाधारण सभेचे आयोजन केले.



या कार्यक्रमाचे अध्यक्षपद माजलगाव विधानसभा मतदारसंघाचे नेते रमेश रावजी आडसकर यांनी भूषवले. प्रमुख पाहुण्यांमध्ये डॉ. स्वरूपसिंह हजारी, शेषरावजी पावडे, अर्जुनरावजी गायकवाड, बाबुरावजी गुरुजी शिनगारे, महादेव गुरुजी शिनगारे, महादेवराव तोंडे, सुनील भाऊ शिनगारे, बालासाहेब चव्हाण, डॉ. मयूर सावंत, संतोष बप्पा सिरसट, सादेक भाई इनामदार, सार्षिदर मैंद, तुकाराम शिनगारे, महादेव शेळके, शिवाजीराव मायकर यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

कार्यक्रमाची सुरुवात छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेवर आणि कैलासवासी बाबुराव आडसकर यांच्या प्रतिमेवर पुष्पहार अर्पण करून आणि दीप प्रज्वलन करून करण्यात आली.

कार्यक्रमादरम्यान लोकनेते कैलास वासी बाबुराव आडसकर साहेब जीवनगौरव पुरस्कार वितरण डॉ. एकनाथ बिरोबा शेळके यांना वैद्यकीय क्षेत्रात उल्लेखनीय योगदानाबद्दल तसेच धर्मराज धोंडीराम थोरात यांना शेती क्षेत्रात महत्त्वाचे कार्याबद्दल वसंत शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी सहकारी पतसंस्था केज देण्यात आले.

माजी नगराध्यक्ष डॉ. स्वरूपसिंह हजारी, अर्जुनरावजी गायकवाड यांच्यासह शेषरावजी आण्णा फावडे यांनी लोकनेते बाबुरावजी आडसकर यांच्या कार्याच्या आठवणी सांभाळताना पुरस्कार सोहळ्याला शुभेच्छा दिल्या.कार्यक्रमाच्या अध्यक्षपदी असलेल्या माजलगाव विधानसभा मतदारसंघाचे नेते रमेश रावजी आडसकर यांनी आपल्या मनोगतातीत सांगितले की, कैलासवासी बाबुराव आडसकर यांनी जी विचारशक्ती उभा केली, त्या विचारधारेवर आम्ही आजही पाऊल ठेवीत आहोत. त्यांनी मराठी शिक्षण संस्था स्थापन करून रोजगार उपलब्ध करण्याचा महत्त्वपूर्ण प्रयत्न केला, ग्रामीण भागातील मुलांना शिक्षण उपलब्ध करून दिले.

सचिव पदाची जबाबदारी सांभाळण्यापासून आजपर्यंत शैक्षणिक क्षेत्रात मोठी प्रगती साधली आहे. मराठी शिक्षण संस्था बरोबरच इंग्लिश स्कूलसची आणि तसंच पॉलिटेक्निक कॉलेजची स्थापना करून येथील विद्यार्थ्यांना उत्तम शैक्षणिक सेवा उपलब्ध करून दिली आहे. आम्ही या कार्यात अशीच प्रभावीता ठेवण्याचा संकल्प करतो. परंतु, यशस्वी होण्यासाठी तुमच्या सहकार्याची आवश्यकता आहे.

पतसंस्थेची वाटचाल चांगल्या पद्धतीने होत असल्याने आम्हाला समाधान आहे. विविध उपक्रम घेतले जात आहेत, जसे की कर्मचार्यांचे मुलांचे सत्कार, रक्तदान शिबिर आणि इतर अनेक सामाजिक कार्यक्रम, ज्यामुळे आम्हाला एक आगळावेगळा अनुभव मिळत आहे.

आगामी काळात, मला हा विश्वास आहे की मान्यवरांच्या मार्गदर्शनानुसार, आम्ही सभासदांच्या मुलांना व्यवसाय क्षेत्रात मदत करू शकतो.

धारूर तालुक्यातील नागरिकांनी यापूर्वी आम्हाला मदत सहकार्य केले आहे आणि मला खात्री आहे की भविष्यामध्येही तुमचे सहकार्य असेल. सत्कारमूर्ती धर्मराज थोरात यांनी शेती क्षेत्रात मिळालेल्या सन्मानाबद्दल गर्व व्यक्त केला आणि सांगितले, शेतीमध्ये अनेक संधी आहेत, आणि शेतीच्या माध्यमातून कुटुंबाचा उदरनिर्वाह चांगल्या पद्धतीने करता येतो.डॉ. एकनाथ शेळके, अन्य पुरस्कार प्राप्त करणारे व्यक्ती, वैद्यकीय सेवेसाठी आपल्या वचनबद्धतेबद्दल बोलताना म्हणाले, रुग्णांची सेवा म्हणजे ईश्वराची सेवा आहे. मी भविष्यातही अनेक रुग्णांना दृष्टी देण्याचे कार्य करीन. त्यांनी बाबुरावजी आडसकर त्यांच्यावर उपचार करताना असलेल्या आठवणींचा उल्लेख केला आणि आपल्याला आपल्या जन्मभूमीत मिळालेल्या सन्मानाबद्दल संस्थेचे आभार मानले.

याकार्यक्रमचे श्री. सुरेश भैरुनाथ शिनगारे चेअरमन यांनी प्रास्ताविक केले, तर श्री. शाहुराव रामभाऊ साखरे यांनी सूत्रसंचालन केले. आभार प्रदर्शन श्री. बालासाहेब तुकाराम घुगे, सचिव यांनी केले. यावेळी पतसंस्थेचे सभासद व पत्रकार आणि धारूर तालुक्यातील विविध क्षेत्रातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते,

# सकारात्मक विचार शिक्षण क्षेत्र प्रवाही ठेवतात-डॉ. वासुदेव मुळाटे

### रोटरी क्लब ऑफ माजलगाव सिटीच्या वतीने रोटरी राष्ट्र शिल्पकार पुरस्कार सोहळा संपन्न

**तभा वृत्तसेवा**
**माजलगाव दि.२३ सप्टेंबर**

सकारात्मक विचार हेच शिक्षणाचे प्रवाही रूप टिकविणार , शिक्षकाची जागा कुणीच घेवु शकत नाही , अलिकडे सामाजिक चळवळी तुन सत्य बाजुला गेले आहे अशी खंत ही प्रसिद्ध साहित्यिक डॉ. वासुदेव मुळाटे यांनी व्यक्त केले.

दिनांक २२ सप्टेंबर २०२४ रोजी सर्वपल्ली राधाकृणांनं यांच्या जयंती निमित्त रोटरी क्लब ऑफ माजलगाव सिटी च्या वतीने रोटरी राष्ट्र शिल्पकार पुरस्कार सोहळा २०२४ वैष्णवी मंगल कार्यालय येथे मोठ्या उत्साहात संपन्न झाला कार्यक्रमाचे अध्यक्ष रोटरी क्लब चे विद्यमान अध्यक्ष तथा श्री मंगलनाथ मल्टीस्टेट चे व्यवस्थापकीय संचालक ड.रवींद्र कानडे व कार्यक्रमाच्या प्रमुख उपस्थिती मध्ये रोटरी क्लब डिस्ट्रिक्ट सहा.प्रांतपाल श्री विवेक गंगणे हे होते...

लता जोशी , स्मिता कानडे , सुरेखा गवळी , प्रभाकर साळेगावकर यांची प्रमुख उपस्थिती होती.अध्यक्षीय मनोगतात रविंद् कानडे म्हणाले शिक्षक वर्ग हा राष्ट्राचा कना असतो व समाजाला योग्य दिशा देण्याचे कार्य करतो व तो समाजातील महत्वपूर्ण घटक आहे त्यामुळे आदर्श शिक्षक यांचा यथोचित सन्मान होणे आवश्यक असून रोटरी क्लब माजलगावच्या वतीने दरवर्षी नियमित सदरील पुरस्कार सोहळ्याचे आयोजन केले जाते.



**या शिक्षकांचा झाला सन्मान**

पुरस्कृत शिक्षकांमध्ये श्री भारत राऊत (हरकी निमगाव ),श्री बालाप्रसाद चव्हाण (सुलतानपूर) श्री सोमेश्वर मोरे (रेणापूरी)श्री नंदकुमार शिंदे (माजलगाव )श्री नागनाथ पडलवार (माजलगाव)श्री राधाकिसन चव्हाण (मनुरवाडी)श्री गणेश राठोड (माजलगाव) श्री चंद्रमणी डोंगरे (माजलगाव)श्रीमती जयश्री देशमुख (माजलगाव) श्रीमती पंचशीला फुलोरे ( की. आडगाव ) श्रीमती भाग्यश्री पत्की (माजलगाव ) कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रभाकर साळेगावकर यांनी काम पाहिले तर सूत्र संचालन ड.दीपक देशमुख व डॉ.सुशीलभय्या लोढा यांनी केले तर कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन रोटरी क्लब च्या विद्यमान सचिव सौ. लता जोशी यांनी केले. तर कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी रोटरी क्लब च्या सर्व सदस्यांनी आपले महत्त्वपूर्ण योगदान दिले.सदरील कार्यक्रमाकरिता माजलगाव परिसरातील , सामाजिक,राजकीय,शिक्षक वर्ग,व्यापारी वर्ग, पत्रकार बांधव व परिसरातील शेकडोच्या संख्येने नागरिक उपस्थित होते.

बीड विभागीय कार्यालय : आदर्शनगर गणपती मंदिरासमोर पांगरी रोड, बीड मो.९४०३२६४९३०, E-Mail - jagannathdeshmukh2020@gmail.com

## संक्षिप्त वृत्त...

### परभणी महापालिकेकडून शहरात स्वच्छता मोहिम जोमात सुरु

**परभणी,/प्रतिनिधी:** स्वच्छ भारत अभियान २.० अंतर्गत स्वच्छता ही सेवा २०२४ निमित्त शनिवारी (दि.२१) महापालिका कर्मचाऱ्यांच्या वतीने शहरातील विविध प्रभागात स्वच्छता मोहिम राबविण्यात येत आहे. आयुक्त तथा प्रशासक धैर्यशील जाधव यांच्या संकल्पनेतून व अतिरीक्त आयुक्त मिनिनाथ दंडवते यांच्या मार्गदर्शनाखाली स्वच्छ भारत अभियान २.० अंतर्गत स्वच्छता ही सेवा २०२४ निमित्त ही मोहिम राबविण्यात आली. यावेळी शहरातील प्रभाग क्रमांक ९ मधील महात्मा फुले शाळा कॉर्नर जवळील कुंडी बंद करून सुशोभीकरण करण्यात आले. या ठिकाणी माजी नगरसेवक अखिल काझी यांच्या तर्फे २ बाकडे बसविण्यात आले. शहरातील एकूण २० ठिकाणी ही मोहीम राबविण्यात येत आहे. तसेच शहरातील शिक्षण विभागामार्फत स्वच्छतेविषयी संवाद साधून जनजागृती करण्यात येत आहे. यावेळी महानगरपालिकेचे स्वच्छता विभाग प्रमुख वकास रतपारखे, शहर सम न्वयक तूराब खान, मनपा शाळेचे मुख्याध्यापक, शिक्षक, स्वच्छता निरीक्षक, अब्दुल शादाब न्याय रत घुगे, कुणाल भारसाकडे, स्थानिक नागरीक आणि मुकादम व स्वच्छता कामगार उपस्थित होते.

### परभणी महापालिकेकडून शहरात स्वच्छता मोहिम जोमात सुरु

**परभणी,/प्रतिनिधी:** स्वच्छ भारत अभियान २.० अंतर्गत स्वच्छता ही सेवा २०२४ निमित्त शनिवारी (दि.२१) महापालिका कर्मचाऱ्यांच्या वतीने शहरातील विविध प्रभागात स्वच्छता मोहिम राबविण्यात येत आहे. आयुक्त तथा प्रशासक धैर्यशील जाधव यांच्या संकल्पनेतून व अतिरीक्त आयुक्त मिनिनाथ दंडवते यांच्या मार्गदर्शनाखाली स्वच्छ भारत अभियान २.० अंतर्गत स्वच्छता ही सेवा २०२४ निमित्त ही मोहिम राबविण्यात आली. यावेळी शहरातील प्रभाग क्रमांक ९ मधील महात्मा फुले शाळा कॉर्नर जवळील कुंडी बंद करून सुशोभीकरण करण्यात आले. या ठिकाणी माजी नगरसेवक अखिल काझी यांच्या तर्फे २ बाकडे बसविण्यात आले. शहरातील एकूण २० ठिकाणी ही मोहीम राबविण्यात येत आहे. तसेच शहरातील शिक्षण विभागामार्फत स्वच्छतेविषयी संवाद साधून जनजागृती करण्यात येत आहे.

### धर्मापुरीवासीयांचा प्लास्टिक द्रोण मुक्तीचा संकल्प दोन हजार स्टीलच्या प्लेट खरेदी करणार

**परभणी,/प्रतिनिधी :** कोणत्याही खाजगी किंवा सार्वजनिक कार्यक्रमामधून प्लास्टिक पत्रावळी, द्रोण वगैरे साहित्या न वापरण्याचा संकल्प धर्मापुरी (ता. परभणी) येथील ग्रामस्थांनी सोडला.

या गावात कोणताही खाजगी अगर सार्वजनिक कार्यक्रमामधून, हळदी कुंकू, वाढदिवस, मुंज, साखरपुडा, लग्न समारंभ वगैरे खा-जगी कार्यक्रमातून, सप्ताहानिमित्त भंडारा पंगतीच्या सार्वजनिक कार्यक्रमामधून मोठ्या प्रमाणावर प्लास्टिकच्या पत्रावळी व द्रोणचा वापर होत आला आहे. प्लास्टिकचे हे साहित्या पर्यावरणाच्या दृष्टीने अत्यांत घातक ठरले आहे. तज्ञांद्वारे वारंवार इशारे देवूनसुध्दा शहरी व ग्रामीण भागात प्लास्टिकचा वापर मुक्तपणे होत आला आहे. या पार्श्वभूमीवर धर्मापुरी येथील ग्रामस्थांनी एका बैठकीद्वारे पत्रावळ्या, द्रोण, ग्लास हे प्लास्टिकचे साहित्या विकत आणायचेच नाहीत, असा संकल्प सोडून जर भोजनाचा सामूहिक कार्यक्रम असेल तर प्रत्योकाने आपापल्या घरून ताट-तांब्या घेऊन यावयाचा निर्णय घेतला.

पंचायत समिती येथील ग्रामविकास अधिकारी भगवानराव जाधव यांनी या बैठकीत धर्मापुरी येथील ग्रामस्थांना मार्गदर्शन करतेवेळी यापूर्वी हा प्रयोग आंबेगाव या गावी ग्रामस्थांनी केला. त्याास सर्व गावकऱ्यांनी मोठा प्रतिसाद दिला, हे निदर्शनास आणून दिले. तर डॉ. नवीनचंद्र मोरे यांनी प्लास्टिक वस्तूंच्या वापरामुळे आरोग्याबाबतचे तोटे याची सविस्तर माहिती ग्रामस्थांना दिली. यावर ग्रामस्थांनी प्रभावित होऊन प्लास्टिक मुक्तीसाठी द्रोण, पत्रावाळ्या व ग्लास अशा प्लास्टिकचे वस्तू आरोग्यासाठी घातक आहेत. त्याा वस्तू कार्यक्रमांमध्ये वापरायच्याच नाहीत, असा ठोस निर्णय घेतला. यापुढे धर्मपुरी येथे प्लास्टिकचे वस्तू वापरणार नाही.तसेच लग्न, भागवत सप्ताह अशा कार्यक्रमसाठी बाहेर गावाहून आलेल्या पाहुण्यांसाठी २००० स्टील प्लेट लवकरच विकत घेऊ असा निर्णय गावाकऱ्यांनी घेतला.

### बोरी प्रशालेतील मुलीने दाखविली सतर्कता अपहरणाचा प्रयत्न फोल : बोरी पोलिसांकडून तपास सुरु

**परभणी,/प्रतिनिधी:** मोटारसायकलवरील दोघापैकी एकाने चॉकलेटचे आमिष दाखवून आपल्याकडे बोलावून घेण्याचा प्रयत सतर्क शाळकरी मुलीने शाळेकडे धूम ठोकून हाणून पाडला. ही घटना बोरीत (ता.जिंतूर) शुक्रवारी दुपारी दीड वाजेच्या सुमारास घडली.

बोरी येथील जिल्हा परिषद कन्या शाळेतील इयत्ता पाचवी वर्गातील काही मुली मध्यंतरानंतर पाणी आणण्याच्या निमित्ताने शाळेबाहेर पडल्या होत्याा. त्याावेळी शाळेच्य पाठीमागील बोळीत दोन व्यक्ती मोटारसायकलवर तोंडाला रुमाल बांधून उभे होते. त्यापैकी एकाने मोटासायकलच्या खाली उतरुन रस्त्याने जाणाऱ्या एका शाळकरी मुलीस चॉकलेट देण्याच्या बहाण्याचे आपल्याकडे बोलावून घेतले. परंतु, सतर्क असणाऱ्या त्याा मुलीने त्याा व्यक्तीकडे ढूंकुनही न पाहता शाळेकडे धूम ठोकली. घडलेला प्रकार शिक्षकांसह मुख्याध्यापकांना सांगितला. मुख्याध्यापकांनी तात्काळ बोरी पोलिसांना तो प्रकार निदर्शनास आणून तक्रारही दिली. या दरम्यान, मोटारसायकलवरील ते दोघे पसार झाले.

**जाहिर प्रगटन**

श्री.एन.पी.तळणीकर, दिवाणी न्यायाधीश, क.स्तर, जिंतूर जि. परभणी यांचे न्यायालय.
दिवाणी किरकोळ अर्ज क्रमांक : ७९/२०२४
अर्जदार:-१)मदन पि. दगडुरामजी कानडे,वय-५२ वर्षे, धंदा शेती
२) छाया भ्र. मदनराव कानडे ,वय ४५ वर्षे, धंदा घरकाम,
३) आरती पि. मदनराव कानडे,वय-२४ वर्षे धंदा शिक्षण
४) करुणा पि. मदनराव कानडे
वय-२१ वर्षे, धंदा:- शिक्षण
वरील सर्व रा. पिंपळगाव (गायके) ता. जिंतूर, जि. परभणी.
विरुध्द
गैरअर्जदार:-निरंक
वाद: वारसा प्रमाणपत्र मिळणे बाबत...
ज्याअर्थी, अर्जदार यांनी सदर कोर्टात ॲड. एल. एस. काळे या वकीला मार्फत अर्ज दाखल केला आहे की, मयत बाळकृष्ण पि. मदनराव कानडे रा. मौजे टाकळी कु. ता. जि. परभणी मृत्यू दिनांक १५/०८/२०२३ रोजी मौजे टाकळी कु. ता. जि. परभणी येथे मयत झाले असून, अर्जदार हे त्यांचे वारस आहेत. अर्जदारांच्या उपरोक्त अर्जास जर कोणाचा उजर अथवा आक्षेप असल्यास त्यांनी आपला
उजर सदरचे जाहीर प्रगटन प्रसिध्द आल्यापासून (३०) तीस दिवसाचे आत सर्व पुराव्यासह या न्यायालयात सादर करावा. उपरोक्त कालावधी नंतर आक्षेप नाही असे समजुन अर्जदारांचे हक्कात वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.
पुढील तारीख दिनांक २७/०९/२०२४
आज दिनांक- ०२/०७/२०२४ रोजी माझ्या सही व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.

स्वाक्षरीत/-
लिपीक

स्वाक्षरीत/-
सहाय्यक अधिक्षक
दिवाणी न्यायालय, क स्तर जिंतूर.

तरुण भारत
कार्यालयाचा पत्ता- डॉ.लोया नेत्र रुग्णालयासमोर ढवळे यांचे निवासस्थान शिवाजी नगर, परभणी
❑ दैनिक ❑ वेबसाईट ❑ सोशल मिडिया
छोट्या जाहीराती व प्रगटनासाठी
खरेदी-विक्री-प्रॉपर्टी व वाहन/भाडेपट्टी/नोकरी विषयक/ प्रवेश/ विवाह विषयक/ शैक्षणिक/ आरोग्य/ ड्रायव्हिंग स्कूल/ मोबाईल/ हॉटेल/ रेस्टॉरंट/ आईस्क्रिम पार्लर/ मसाज पार्लर/ ब्युटी पार्लर/ कागदपत्रे हरवले/ चेंज ऑफ नेम/ न्यायालयीन व धर्मादाय आयुक्त कार्यालय प्रगटने/
९४ २३३२४६६६५, ९२८४६६४४३०, ९२८४६९५५८३

# सकल मराठा समाज बांधवांचा परभणी,जिंतूर, सोनपेठ, मानवत बंदला उत्स्फुर्त प्रतिसाद





**परभणी, मानवत, जिंतूर, सोनपेठ / प्रतिनिधी:** मराठा संघर्ष योद्धा मनोज जरांगे यांच्या उपोषणाच्या समर्थनार्थ सोमवारी तालूक्यातील पिंपपळा , सावळी,येथील समस्त मराठा समाजाच्या वतीने अंतरावली सराटी येथे जाऊन आंदोलनात सहभागी झाले.

त्यामूळे आज सकाळी तालूक्यातील पिंपळा, सावळी येथील शेकडो सकल मराठा समाज बांधवांनी उपोषण स्थळी उपस्थित राहून सहभागी झाले. मराठा समाजाला ओबीसी संवर्गातून आरक्षण देण्यात यावे या मागणीसाठी मराठा संघर्ष योध्दा मनोज जरांगे यांनी आमरण उपोषण सुरू केले आहे. त्यांच्या उपोषणाच्या समर्थनार्थ मानवत तालुका समस्त मराठा समाजाच्या वतीने २३ सप्टेंबर रोजी अंतरावली सराटी येथे जाऊन सहभागी झाले.

**मनोजदादा जरांगे यांच्या समर्थनार्थ सोनपेठ कडकडीत बंद**

सोनपेठ- मराठा संघर्ष योद्धा मनोज जरांगे यांच्या उपोषणाच्या समर्थनार्थ रविवारी समस्त मराठा समाजाच्या वतीने सोनपेठ बंदचे आवाहन करण्यात आले होते या आवाहनाला शहरात मोठा प्रतिसाद मिळाला असून बंद कडकडीत पाळण्यात आला.

मराठा समाजाला ओबीसी संवर्गातून आरक्षण देण्यात यावे या मागणीसाठी मराठा संघर्ष योध्दा मनोज जरांगे यांनी आमरण उपोषण सुरू केले आहे. त्यांच्या उपोषणाच्या समर्थनार्थ सोनपेठ तालुका समस्त मराठा समाजाच्या वतीने रविवार २२ सप्टेंबर रोजी बंदची हाक देण्यात आली होती, व्यापाऱ्यांनी उस्फुर्त प्रतिसाद देत अत्यावश्यक सेवा वगळता शहर कडकडीत बंद ठेवले या बंदच्या निमित्ताने पो. नि.सुर्यमोहन बोलमवाड यांनी चोख बंदोबस्त ठेवला होता. सकल मराठा समाजाच्या वतीने पोलीस प्रशासनाला निवेदन देण्यात आले.

## ओबीसी आरक्षण मागणीसाठी जिंतूर बंदला प्रतिसाद

**जिंतूर,/प्रतिनिधी-** मराठा संघर्ष योद्धा मनोज जरांगे पाटील यांच्या उपोषणास पाठिंबा म्हणून सकल मराठा समाजाच्या वतीने दिनांक २३ सप्टेंबर रोजी जिंतूर बंदचे आयोजन करण्यात आले होते बंदला व्यापाऱ्यांनी मोठा प्रतिसाद दिल्यामुळे बंद उत्स्फुर्तपणे पाळण्यात आला यावेळी सकल मराठा समाजाच्या वतीने तहसीलदारांना मराठा आरक्षण मागणीचे निवेदन देण्यात आले.

मराठा समाजाला ओबीसी प्रवर्गातून आरक्षण देण्यात यावे सगेसोयरे अध्यादेश लागू करावा,हैदराबाद गॅजेटचा समावेश करावा आदी मागण्यासाठी जालना जिल्ह्यातील अंतरवाली सराटी येथे १७ सप्टेंबर पासून संघर्ष योद्धा मनोज जरांगे पाटील आमरण उपोषणास बसले आहेत उपोषणाच्या सहाव्या दिवसा पर्यंत राज्य सरकारे दखल घेतली नसल्यामुळे प्रकृती खालावत चाललेली आहे परिणामी मराठा



समाज आक्रमक झाला आहे म्हणून जिंतूर तालुक्यातील सकल मराठा समाजाच्या वतीने जिंतूर बंदचे आयोजन केले होते यावेळी सकल मराठा समाजाने छत्रपती शिवाजी महाराज चौकातून भव्य मोर्चा काढण्यात आला होता.

हा मोर्चा यलदरी रोड,मेन चौक,पोलीस ठाणे मार्गे तहसील कार्यालयापर्यंत मोर्चा काढण्यात आला यावेळी तहसीलदार राजेश सरोदे यांना मराठा आरक्षणाच्या मागणीचे निवेदन देण्यात आले मोर्च्या मध्ये गोंधळाची जागर करण्यात आला आजच्या बंदला व्यापाऱ्यांनी उत्स्फुर्त प्रतिसाद दिला बंद व मोर्चासाठी जिंतूर तालुक्यातील सकल मराठा समाज मोठ्या प्रमाणात सहभागी झाला होता.



### शहरातील घाण कचऱ्याची योग्य विल्हेवाट लावावी- मुसळे

**जिंतूर-** शहरातील जालना रोडवर शहरातील मासविक्रेत्याांकडून घाण कचरा जालना रोडवर मोठ्या प्रमाणात टाकण्यात येत आहे. यामुळे त्याा परिसरात मोकाट कुत्रे व डुकरे यांची संख्या वाढलेली आहे यामुळे मोठ्या प्रमाणात अपघात होत आहे वाहनधारकांना मोठी कसरत घ्यावी लागत आहे व तसेच परिसरात घाणीचे साम्राज्य वाढल्यामुळे रोगरायचे प्रमाण देखील वाढलेले आहे तरी नगरपरिषद जिंतूर यांनी दखल घेऊन या कचऱ्याची योग्य ठिकाणी उल्ले वाट लावावी असे निवेदन जिंतूर शिवसेना शहर प्रमुख गंगाधर मुसळे यांनी कार्यकारी अधिकारी नगर परिषद जिंतूर यांना दिले.



**मानवत- तालूक्यातील वझुर बु येथे जिजाऊ उद्यान विकास कामे शिवसेनेचे प्रदेशाध्यक्ष मा. सईद खान यांच्या विशेष निधीच्या सहकार्याने करण्यात येत असल्यामुळे नागरिकातून समाधान व्यक्त केल्या जात आहे.**



### यलो मोझँकमुळे सोयाबीन पडले पिवळे उता-यात घट होण्याची शक्यता

**सेलु,/प्रतिनिधी-** कमी जास्त पावसामुळे पेरणी केलेले सोयाबीन पिक पिवळे पडले असल्याने सोयाबीन उता-या घट होण्याची शक्यता असून लावलेला खर्च देखील निघणे मुश्कील झाले आहे.

ऑगस्ट महिन्यात काही प्रमाणात कमी प्रजन्यमान झाले तर सप्टेंबर महिन्यात तालुक्यातील काही मंडळात अतिवृष्टी झाली.या पावसामुळे काढणी अगोदरच सोयाबीन पिक पिवळे पडले.सोयाबीन पिवळे पडल्यामुळे सोयाबीन शेंगा भरल्या नाही.पाऊस उघडल्यानंतर सोयाबीन मोठ्या प्रमाणात पिवळे पडले तीन चार वेळा फवारणी करून सुद्धा काहीच उपयोग झाला नसल्याचे चित्र आहे.दरम्यान सोयाबीन पिकावर यलोमोझँक रोगाचा प्रादुर्भाव झाल्यामुळे सोयाबीन पिवळे पडले असल्याने शेतक-यांना अपेक्षीत उतारा मिळत नाही.प्रति वर्षी शेतक-यांच्या वाट्याला काहीना काही अडचणी येत असल्यामुळे शेतीला लावलेला खर्च निघणे मुश्कील झाले असुन शेतकरी आर्थीक संकटात सापडला आहे.

## राष्ट्रीय सेवा योजनामुळे श्रमप्रतिष्ठाला महत्व-पाटोळे

**मानवत/प्रतिनिधी-** दिनांक २० सप्टेबर रोजी राष्ट्रीय सेवा योजनाचे साप्ताहिक श्रमदान के.के . एम महाविद्यालयाच्या परिसरात घेण्यात आले. बौद्धीक सत्रात श्रमप्रतिष्ठेचे महत्त्व सांगतांना प्रा. डॉ कन्हैया पाटोळे यांनी रा.से.यो च्या माध्यमातून समाजात विद्यार्थ्यांचे वेगळ वेगळेपण दिसून येते.



श्रम प्रतिष्ठाच्या माध्यमातून विशेष शिबिरात सहभाग घेऊन विद्यार्थ्यांच्या सुप्त गुणांचा विकास होतो वेगवेगळ्या स्पर्धेच्या माध्यमातून विद्यार्थी घडत असतात सांस्कृतीक कार्यक्रमातून व्यक्तिमत्त्व विकास घडतो . कथाकथन , वक्तृत्व, पथनाटय, वादविवाद, भाषणे , रॅली ,वृक्षारोपण , पाण्याचे प्रश्न, व्यसनाचे प्रश्न, शेतकऱ्यांचे प्रश्न , वृद्धांचे प्रश्न, बालविवाहाच्या समस्या समजून घेतल्या पाहिजेत गावाचा विकास देशाचा विकास घडविण्यात राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वयंसेवकाचे निस्वार्थी योगदान असले पाहिजेत. अष्टपैलू व्यक्तिमत्त्व, सकारात्मक विचारांची शिदोरी घेऊन समाजाच्या गरजा पूर्ण केल्या पाहिजेत माझ्या साठी नव्हे तुमच्यासाठी सेवा देण्यास तत्पर असावे असे मत व्यक्त केले विद्यार्थ्यांनी मनातील भीती कमी करून ''बोलके व्हा किंवा अभिव्यक्त '' हा असा संदेश दिला. यावेळी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ . सत्यानारायण राठी यांनी केले. रासेयो कार्यक्रमाधिकारी डॉ . सुभाष शिंदे , डॉ. सुनिता कुकडे , डॉ. योगेश बागुल , डॉ . विनायक जाधव , डॉ. पंडित लांडगे , श्री भागवत मोरे ,श्री विनायक चोपडे यांच्या सहकार्यामुळे कार्यक्रम यशस्वी झाला तर सर्व मान्यवरांचे आभार कु .चंचल राऊत यांनी केले.

### हिस्सी येथे ३५ वर्षीय तरुणाने गळफास घेऊन केली आत्महत्या



**सेलू,/प्रतिनिधी-** तालुक्यातील हिस्सी येथे एका ३५ वर्षीय तरुणाने गळफास घेऊन आत्महत्याा केल्याची घटना रविवार २२ सप्टेंबर रोजी सकाळी दहाच्या नंतर उघडकीस आली.

याबाबत पोलीसांनी दिलेली माहिती याप्रमाणे तालुक्यातील हिस्सी येथील अशोक बालासाहेब गात वय ३५ वर्ष याने राहच्या घरी नायलॉनच्या दोरीने पत्र्याला लावलेल्या अँगलला गळफास घेऊन आत्महत्याा केली आहे.मयत अशोक गात याच्याकडे लोकांची असलेली उधारी आणि दारूचे व्यसन यामुळे निर्माण झालेल्या आर्थिक विवंचनेतून आत्महत्याा सारखे टोकाचे पाऊल उचलून स्वतःचे जीवन संपवले आहे. अशोक गात याच्या पश्चात आई,वडील, भाऊ, भावजय, पती आणि एक मुलगा एक मुलगी असा परिवार आहे.

मयताचा भाऊ गजानन बालासाहेब गात याने दिलेल्या माहितीवरून आकस्मिक मृत्यूचे नोंद घेण्यात आली आहे. पोलीस निरीक्षक दिपक बोरसे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस हवालदार शिवदास सूर्यवंशी पुढील तपास करत आहेत.

# हिंगोली, औंढा, कुरूंद्यात धनगर समाजाचा रास्ता रोको

## धनगर समाजाला अनुसूचीत जमातीमध्ये समाविष्ट करा, ठिकठिकाणी चोख पोलिस बंदोबस्त

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २३ सप्टेंबर**







धनगर समाजाला अनुसूचीत जमाती प्रवर्गात समाविष्ट करण्याच्या मागणीसाठी जिल्ह्यातील हिंगोली, औंढा नागनाथ, कुरूंदा येथे धनगर समाजाच्यावतीने रास्तारोको आंदोलन करण्यात आले. यावेळी सरकारविरोधात जोरदार घोषणाबाजी करीत आंदोलकांनी रस्ते अडविल्यामुळे वाहतुकीची कोंडी झाली होती. ठिकठिकाणी चोख पोलिस बंदोबस्त लावण्यात आला होता.

हिंगोली शहरातील नांदेड नाका अग्रसेन चौकात धनगर समाजाच्यावतीने रास्ता रोको आंदोलन करण्यात आले. धनगर समाजाला अनुसूचीत जमातीमध्ये समाविष्ट करा या मागणीसाठी रास्ता रोको आंदोलन करण्यात आले. यावेळी आंदोलकांनी जोरदार घोषणाबाजी करीत रस्ता अडविल्यामुळे नांदेड, परभणी, अकोला कडे जाणारी वाहने ठप्प पडली. अखेर पोलिसांनी मध्यस्थी करीत आंदोलकांना ताब्यात घेत नंतर सोडून दिले. या आंदोलनात विष्णु कुऱ्हाडे, शशीकांत वडकुते, रेखा देवकते, प्रकाश दिंडे, शिवाजीराव ढाले, भास्करराव पोले, गजानन हाके, नितीन गडदे, विशाल नाईक, शिवाजी पातळे, डॉ पावडे, मस्के, कुरवाडे, यश कोकरे, मारोती नाईक, हनुमान सिरामे, सुशीला आठवले, बालाजी पोले, मारोती गीते, पांडुरंग पोले, शिवाजी खरात, नामदेव खरात, अमृता पोले, गोपाल बिरगड, लक्ष्मण कुंदर्गे आदीसह धनगर समाजबांधव उपस्थित होते.

वसमत तालुक्यांतील कुरुंदा येथील टी पॉईंट फाटा येथे धनगर समाजाच्यावतीने दोन तास रास्ता रोको आंदोलन करण्यात आले. आरक्षण आमच्या हक्काचे नाही कुणाच्या बापाचे. कोण म्हणत देत नाही घेतल्याशिवाय राहत नाही अशा घोषणा येळकोट येळकोट जय मल्हार गर्जनेने परिसर दणाणून गेले दोन तास वाहनाच्या रांगा लागल्या होत्या.धनगर समाजाच्या अनुसूचित जाती जमातीच्या आरक्षणाची अंमलबजावणी करण्यात यावी म्हणून कुरुंदा शिवलिंग शिवाचार्य महाराज चौक येथे रास्ता रोको आंदोलन करण्यात आल. धनगर समाजाच्या एसटी आरक्षणाची अंमलबजावणी करण्यात यावी म्हणून गेल्या १४ दिवसांपासून पंढरपूर, नेवासा, लातूर विविध ठिकाणी धनगर बांधव आमरण उपोषणाला बसले आहेत. कुरुंदा टि पॉइंट फाटा येथे सकाळी ९ ते ११ वाजेपर्यंत हा रास्ता रोको आंदोलन करण्यात आले. यावेळी कुरुंदा नेहरूनगर, कानोसा, पाडी, सुकळी, पिंपराळा या गावातील मोठ्या संख्येने तरुण रास्ता रोको आंदोलनात सहभागी होते. कुरुंदा पोलीस स्टेशनचे सहाय्यक पोलीस निरीक्षक रामदास निरदोडे यांच्या मार्गदर्शनाखाली मोठा बंदोबस्त करण्यात आला होता. धनगर समाजाला एसटी प्रवर्गातून आरक्षण देण्यासाठी तात्काळ अध्यादेश काढा अशी मागणी करीत सकल धनगर समाजाच्यावतीने औंढा-हिंगोली रोडवर अर्धातास रास्तारोको करण्यात आला. रास्तारोकोमुळे औंढा-परभणी व औंढा- हिंगोली, औंढा-पिंपळदरी रोडवरील वाहतूक अर्धातास बंद होती. राज्यात धनगड जमात अस्तित्वात नसून धनगर आहेत असे शपथपत्र राज्य सरकारने मुंबई उच्च न्यायालयात दिले आहे. त्या अनुषंगाने शासनाने धनगड ऐवजी धनगर असे गृहीत धरून समाजासाठी एसटी मधून आरक्षणाचा जीआर काढून तत्काळ अंमलबजावणी करण्यात यावी तसेच धनगर जमातीला जिल्हाधिकारी कार्यालयातून अनुसूचित जमातीचे दाखले वितरित करण्यात यावे, अशी मागणी करीत सकल धनगर समाजातर्फे औंढा नागनाथ येथील पिंपळदरी फाट्यावर सकाळी १०:३० च्या सुमारास रास्ता रोको आंदोलन करण्यात आले. जवळपास अर्धातास रास्तारोको केल्या नंतर करण्यात प्रभारी तहसीलदार अनिता कोलगणे व पोलिस निरीक्षक गणपत राहिरे यांना निवेदन देऊन आंदोलन मागे घेण्यात आले. आंदोलन स्थळी पोलिस निरीक्षक जि एस राहीरे, सपोनि अरुण दराडे, सहाय्याक पोलीस उपनिरीक्षक प्रकाश थिट्टे, सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक शेख खुद्दुस, संदीप टाक, राजकुमार कुटे, यशवंतराव गुरुपवार, सुभाष जयताडे, अमोल चव्हाण, किशोर पारिसकर, गजानन गिरी, ज्ञानेश्वर गोरे, विश्वनाथ ढोणे यांनी कडक बंदोबस्त ठेवला होता.

## पिंपराळा येथे अज्ञातानी महामंडळाची बस पेटवली

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २३ सप्टेंबर**



वसमत तालुक्यातील पिंपराळा येथे वसमत आगाराची बस अज्ञात व्यक्तींनी पेटवून दिल्याची घटना दि २२ रोजी रविवारी मध्यरात्री साडेबाराच्या सुमारास घडली आहे. यामध्ये बसचे ९० टक्के नुकसान झाले आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहीतीनुसार वसमत आगाराची बस विद्यार्थ्यांच्या वाहतुकीसाठी पिंपराळा येथे मागील ३२ वर्षापासून मुक्कामी थांबते. पिंपराळा, कुरूंदा येथील विद्यार्थी घेवून बस सकाळी वसमत येथे पोहचते. या बसमुळे विद्यार्थ्यांची सोय होते. दरम्यान, नेहमीप्रमाणे रविवारी दि २२ सप्टेंबरला रात्री बस क्र एमएच २००८६३ पिंपराळा येथे मुक्कामी आली होती. बस तेथे असलेल्या मंदिरासमोर उभी करून चालक व वाहक मंदिराच्या परिसरात झोपले होते. मध्यरात्री साडेबाराच्या सुमारास अज्ञात व्यक्तीने बस पेटवून दिली. रात्रीच्या वेळी एक व्यक्ती लघुशंकेसाठी उठला असतांना त्याला बस जळत असल्याचे दिसून आले. त्यांनी आरडाओरड करून गावकऱ्यांना जागे केले. गावकऱ्यांनी बाजुलाच असलेल्या विहीरीवरून पाणी आणून आगीवर पाणी ओतण्यास सुरूवात केली. त्यानंतर विद्युतपंप सुरू करून पाणी टाकल्यानंतर आग नियंत्रणात आली. या आगीमध्ये बस ९० टक्के जळाल्याने मोठे नुकसान झाले आहे. बसच्या संपूर्ण सीट जळून खाक झाल्या.

दरम्यान, या घटनेची माहीती मिळताच कुरूंदा पोलिस ठाण्याचे सपोनि रामदास निरदोडे, जमादार भगीरथ सवंडकर यांनी घटनास्थळी भेट देऊन पाहणी केली आहे. पोलिसांनी घेतलेल्या प्राथमिक माहीतीनुसार दोन दुचाकीवर आलेल्या व्यक्तींनी बस पेटवून दिल्याची शक्यता असून पोलिसांनी त्यांचा शोध सुरू केला आहे. त्यासाठी सीसीटीव्ही फुटेजची पाहणी केली जात असल्याचे पोलिसांनी सांगितले. एसटी महामंडळाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनीही घटनास्थळी धाव घेतली.



**हिंगोली- पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या वाढदिवसानिमित्त युवा मोर्चाच्यावतीने भाजप जिल्हा कार्यालयात रक्तदान शिबीराचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी आ.तान्हाजीराव मुटकुळे, विधानसभा प्रभारी जयपाल चावडा, जिल्हाध्यक्ष फुलाजी शिंदे, लोकसभा प्रमुख रामदास पाटील सुमठाणकर, युवा जिल्हाध्यक्ष पप्पू चव्हाण, शहराध्यक्ष कैलाश काबरा, शिवाजी मुटकुळे, प्रशांत सोनी, माणिक लोडे आदी. छाया- विजय गुंडेकर**

## स्वच्छता ही सेवा अंतर्गत तलाव परिसरात पालिकेकडून स्वच्छता मोहीम

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली २३ सप्टेंबर**



स्वच्छ भारत अभियान २.० अंतर्गत केंद्रीय गृहनिर्माण तथा शहरी कार्य मंत्रालय, भारत सरकार अंतर्गत स्वछता ही सेवा पंधरवड्याचे आयोजन करून स्वभाव स्वच्छता-संस्कार स्वच्छता ही संकल्पना राबविण्याचे निर्देश दिले आहेत. याअनुषंगाने नगर परिषदेचे प्रशासक तथा मुख्याधिकारी अरविंद मुंढे यांच्या मार्गदर्शनाखाली नगरपालिके मार्फत स्वच्छता ही सेवा अंतर्गत विविध उपक्रम राबविण्यात येत आहेत. हिंगोली नगर परिषद हद्दीत येणाऱ्या सिरेहक शाह बाबा दर्गा तलावात गणपती विसर्जना निम्मित नागरिकांनी मोठ्या प्रमाणात श्रीमूर्तीचे विसर्जन केले. यामुळे सदर परिसरात मोठ्या प्रमाणात कचरा निर्माण झाला त्यानुसार आज हिंगोली नगर परिषदेच्या वतीने दिनांक २३ सप्टेम्बर २०२४ रोजी सकाळी १० वाजता स्वछता ही सेवा अभियाना अंतर्गत तलाव परिसरात श्रमदान मोहीम राबविण्यात आली. सदर श्रमदानामध्ये नागरिकांनी आणि नगर परिषद अधिकारी व कर्मचारी यांनी मोठ्या प्रमाणात उत्स्फूर्तपणे सहभाग घेऊन ही मोहीम यशस्वी करणे करिता मोलाचा सहभाग दिला. या उपक्रमात स्वच्छता निरीक्षक बाळू बांगर, किशोर काकडे, संदीप घुगे, अशोक गवळी, बाबुराव काळे, विनय साहू, कैलाश थिटे, प्रविण चवान, आशिष रणसिंगे, कमलेश इंगळे, वर्धमान सोनटक्के, अथर्व वर्मा,आकाश गायकवाड, रवी जोंधळे, रवी गायकवाद, चेतन भूजवाने, दिनकर शिंदे, प्रताप भूजवने आदीसह अधिकारी कर्मचारी उपस्थित होते.

## संक्षिप्त वृत्त

### स्वच्छता ही सेवा अंतर्गत रांगोळी स्पर्धा

हिंगोली- नगर परिषदेचे कर्तव्यदक्ष प्रशासक तथा मुख्याधिकारी अरविंद मुंढे यांच्या मार्गदर्शनाखाली स्वच्छता ही सेवा अंतर्गत महिलांकरिता दि. २५ सप्टेंबर रोजी दु.३.०० वाजता न.प. कार्यालय येथे आयोजित करण्यात येणार आहे. रांगोळी स्पर्धेचे विषय पुढीलप्रमाणे आहेत. स्वच्छता ही सेवा, माझी वसुंधरा माझी जबाबदारी, स्वच्छ भारत अभियान, प्लास्टीक मुक्त हिंगोली शहर,स्वच्छ सुंदर आणि हरित हिंगोली, स्वच्छता चॅम्पियन याममध्ये प्रथम पारितोषिक रु. ४००० व प्रमाणपत्र, द्वितीय पारितोषिक रु.३००० व प्रमाणपत्र आणि तृतीय पारितोषिक रु.२००० व प्रमाणपत्र तसेच प्रत्येक सहभागीस प्रमाणपत्र देण्यात येणार आहे. नाव नोंदणी करिता ८१४९५०१०१४,८०८७७१८०१४ वर संपर्क करण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

### मोहम्मद शेख यांची जमादारपदी पदोन्नती



औंढा नागनाथ- येथील पोलिस ठाण्यात कार्यरत असलेले पोलिस नायक मोहम्मद अहमद शेख यांची जमादारपदी पदोन्नती झाली असून यानिमित्त पोलिस निरीक्षक जी एस राहिरे व उप निरीक्षक किशोर पोटे यांनी फित बांधून सन्मानित केले. यावेळी नंदकुमार पाटील, सुमेध मुळे आदींची उपस्थिती होती.

### समुदाय आरोग्य अधिकाऱ्यांवर कार्यवाही करा



हिंगोली- जिल्ह्यातील १२१ आरोग्य उपकेंद्रावर समुदाय आरोग्य अधिकारी यांची नियुक्ती करण्यात आली आहे परंतु सदरील अधिकारी पंधरा-पंधरा दिवस गैरहजर राहत असल्यामुळे रूग्णांची हेळसांड होत आहे. या अधिकाऱ्यांना पाठीशी घालण्यात येत असून त्यांची चौकशी करून कार्यवाही करा अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते मुनीर खान पठाण यांनी जिल्हाधिकारी यांचेकडे निवेदनाद्वारे केली आहे.

## ओबीसीतून आरक्षणासाठी मुडी येथील मराठा तरूणाची आत्महत्या

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २३ सप्टेंबर**

तालुक्यातील मुडी येथील एका तरूणाने मराठा समाजाला ओबीसीतून आरक्षण मिळावे तसेच मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील यांची उपोषणा दरम्यान प्रकृती ढासळत असल्यामुळे गळफास घेवून आत्महत्या केल्याची घटना घडली असून त्यांच्या खिशाल चिठ्ठी आढळली असून आत्महत्येसाठी सरकार जबाबदार असल्याचेही चिठ्ठीत नमुद केले आहे.

वसमत तालुक्यातील मुडी येथील तरूण साईराम सखाराम पडोळेवय २६ असे या तरूणाचे नाव असून तो पुणे येथे एका खाजगी कंपनीमध्ये कार्यरत होता.त्या ठिकाणी मराठा आरक्षणासाठी झालेल्या आंदोलनात त्याने सहभाग घेतला होता.मागील आठ ते दहा दिवसांपासून तो गावी मुडी येथे आला होता. दरम्यान, मुडी येथे घरी आई, वडील, भाऊ असे कुटूंब आहे. रविवारी दि २२ सप्टेंबर रोजी रात्री सर्वजण झोपले होते. साईनाथ हा एका खोलीत झोपला होता. सकाळी पाच वाजता त्याचे आईवडील झोपेतून उठल्यानंतर त्याला उठविण्यासाठी गेले असता त्याचा मृतदेह गळफास घेतलेल्या स्थितीत आढळून आला. या प्रकाराची माहीती मिळाल्यानंतर गावकरी घटनास्थळी एकत्र आले. वसमत ग्रामीण पोलिस ठाण्याचे सहायक पोलिस निरीक्षक अनिल काचमांडे, उपनिरीक्षक संतोष मुपडे, जमादार मधुकर आडे यांनी तातडीने घटनास्थळी भेट देऊन पाहणी केली.

मयत साईनाथ याच्या खिशात चिठ्ठी आढळून आली. त्यात मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी फाशी घेत आहे. एक मराठा लाख मराठा. मराठा योध्दा मनोज जरांगे पाटील सहा दिवसांपासून आमरण उपोषण करीत आहेत. त्यांची तब्येत खूप चिंताजनक बनली आहे. मला त्यामुळे प्रचंड वेदना होत आहेत. सरकार जाणूनबुजून मराठा आरक्षणाकडे दुर्लक्ष करीत आहे. माझया मृत्यूस सरकार जबाबदार आहे. याप्रकरणी वसमत ग्रामीण पोलिसांत नोंद घेण्यात आली आहे.

## हिंगोलीत पावसाच्या सरी राज्यस्तरीय कवी संमेलनाला प्रतिसाद

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २३ सप्टेंबर**



येथील जिल्हा परिषद बहुविध प्रशालेत अखिल महाराष्ट्र प्राथमिक शिक्षक संघटना आणि अक्षरोदय साहित्य मंडळ शाखा हिंगोली यांच्या संयुक्त विद्यमाने सौ.सिंधूताई दहिफळे यांनी आयोजित केलेल्या कविसंमेलनाला प्रतिसाद मिळाला.

या कवी संमेलनाच्या अध्यक्षस्थानी व्ही.एस.सुर्यवंशी तर उद्घाटक म्हणून सदानंद सपकाळे यांची उपस्थिती होती. प्रमुख अतिथी म्हणून शिक्षक संघटनेचे जिल्हाध्यक्ष व्ही. डी. देशमुख, सचिव हरीभाऊ मुटकुळे, शिक्षक व कर्मचारी पतसंस्थेचे अध्यक्ष गजानन बोरकर प्रसिद्ध कवी राजकुमार नायक उपस्थित होते .या कार्यक्रमाचे संचलन सौ सिंधूताई दहिफळे यांनी केले. प्रास्ताविक हरीभाऊ मुटकुळे यांनी केले. तर आभार गजानन खिल्लारी यांनी मानले. या कविसंमेलनात हिंगोली, नांदेड, परभणी येथील पन्नास ते पंचावन्न कवी कवयित्री उपस्थी झाले होते. कविसंमेलनात राजकुमार नाय यांनी बाप जगाचा पोशिंदा फास घेवून मेला हो ही कविता सादर केली तर विजय गुंडेकर यांनी त्यांच्या फवारणी कवितेतून बळीराजाची व्यथा मांडली. सदानंद सपकाळे यांनी कवितेतून स्त्रियांची व्यथा मांडली.कवी कैलास कावरखे यांनी माय नारळाचं पाणी कविता गावून मन जिंकली. गंगाधर हरणे यांनी आई माझी मायेचा सागर ही कविता म्हणून अनेकांच्या डोळ्यात पाणी भरले,तर सौ.सिंधूताई दहिफळे यांनी बळी झाला जगाचा आधार, दिली त्याने खायला भाकर बळीराजाचा सन्मान करणारी कविता गायली या कविसंमेलनात पावसाच्या, शेती मातीच्या, स्त्रीवादी, काही प्रेमाच्या एका पेक्षा एक बहारदार कविता कवींनी सादर केल्या तर कविसंमेलनाचे सूत्रसंचलन करतांना सौ.सिंधूताई दहिफळे यांनी त्यांच्या गजलेचे शेर ऐकवून कविसंमेलनात रंगत आणली. अनेक कवी सोबत कवितेची अन् गजलेची जुगलबंदी रंगली. या कविसंमेलनात बंडू पुरी, सौ. उषाताई ठाकूर, चंद्रकांत चव्हाण, सौ.रुपाली वागरे, निरंजन पोटे, संदीप पाटील, पांडुरंग गिरी, अशोक गुठ्ठे, सौ. पतंगे अहिल्या, सौ.मेटे अर्चना, आबा पांचाळ, कवी अंभोरे, कवी द.आ.गुडूप, सौ.वर्षा जाधव, सौ.दुर्गा मस्के, जगदीश ढोरे, स्वप्नील मुळे, राजकुमार मोरगे, सौ. पतंगराव, सौ. खिल्लारे नम्रता, विलास जल्लारे, उध्दव हराळ, मायादेवी सरवदे आणि प्रिया धुमाळ यांनी बहारदार कविता सादर करून उपस्थितांची मने जिंकली.

## काँग्रेस अध्यक्षांनी घेतली भेट

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २३ सप्टेंबर**

काँग्रेसचे शहराध्यक्ष पवन उपाध्याय यांना मारहाण झाल्यामुळे त्यांना येथील एका खाजगी रूग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले आहे. सोमवारी काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष दिलीप देसाई यांनी पवन उपाध्याय यांची भेट घेत त्यांची विचारपूस केली. यावेळी पवन उपाध्याय यांनी घडलेला सर्वप्रकार जिल्हाध्यक्ष देसाई यांचेसमोर मांडला. यावेळी देसाई यांनी लवकरच या संदर्भात पक्षश्रेष्ठींकडे अहवाल पाठवणार असून या प्रकरणात दोषींवर पक्ष कार्यवाही करेल असे आश्वासनही दिले.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com

# मराठा समाजाच्या बंदला जिल्ह्यात संमिश्र प्रतिसाद

**तभा वृत्तसेवा**
**नांदेड, दि. २३ सप्टेंबर -**






मराठा समाजाला आरक्षण मिळावे यासाठी मनोज जरांगे पाटील यांनी १७ सप्टेंबरपासून आमरण उपोषण सुरू केले आहे. उपोषणाला पाठिंबा देत सकल मराठा समाजाच्या वतीने २३ सप्टेंबर रोजी जिल्ह्यात बंदची हाक दिली होती. त्या अनुषंगाने काही किरकोळ प्रकार वगळता जिल्ह्यात बंद पाळण्यात आला. या बंदला संमिश्र प्रतिसाद मिळाला.

सगेसोयरे कायद्या करावा, हैदरावादसह सातारा वॉम्वे गव्हर्नमेंट गॅजेट लागू करावा, अंतरवाली सराटीसह संपूर्ण राज्यातील आंदोलना दरम्यान झालेल्या घटनेतील गुन्हे सरसकट मागे घेण्यात यावे या व इतर मागण्यांसाठी सकल मराठा समाजाच्या वतीने २३ सप्टेंबर रोजी जिल्हा बंदची हाक देण्यात आली होती. या दरम्यान नांदेड शहरामध्ये अनेक भागांमध्ये कडकडीत बंद पाळण्यात आला तर काही भागांमध्ये संमिश्र प्रतिसाद मिळाला. दरम्यान दुपारी १.३०च्या दरम्यान मोर चौक व छत्रपती चौक परिसरामध्ये दुकाने बंद करण्याच्या कारणावरून काही युवक जमले होते. या दरम्यान भाग्यनगर पोलिसांनी ५ ते ६ युवकांना लाठीने मारहाण केल्याची घटना घडली. यादरम्यान काही वेळ या परिसरामध्ये तणावपूर्ण वातावरण निर्माण झाले होते. पोलिसांनी तात्काळ घटनास्थळी धाव घेऊन सदर प्रकरण मिटविण्याचा प्रयत्न केला. दरम्यान कार्यकर्त्यांनी मध्यस्थी करून वाद मिटविण्याचा प्रयत्न केला काही वेळानंतर वाद मिटला. त्यानंतर बंद शांततेत पाळण्याचे आवाहन सकल मराठा समाजाच्या वतीने व्यापाऱ्यांना करण्यात आले. जिल्ह्यात काही ठिकाणी कडकडीत बंद पाळण्यात आला तर काही तालुक्यात संमिश्र प्रतिसाद मिळाल्याचे वृत्त आहे.

सकल मराठा समाजाच्या कार्यकर्त्यांनी छत्रपती शिवाजी महाराज पुतळा येथून जिल्हाधिकारी कार्यालयापर्यंत जाऊन मागण्यांचे निवेदन जिल्हाधिकाऱ्यांमार्फत मुख्यमंत्र्यांना निवेदन पाठविण्यात आले आहे. यात सगेसोयरे कायद्याची अंमलबजावणी करावी, हैद्रावादसह सातारा, वॉम्बे गव्हर्नमेंटचे गॅझेट लागू करावा, अंतरवाली सराटीसह संपूर्ण महाराष्ट्रातील गुन्हे सरसकट मागे घेण्यात यावेत, राज्यभरात कुणबी नोंदणी तपासून, कुणवी जात प्रमाणपत्र देण्याचे काम हे अतिशय मंदगतीने चालु आहे त्याला गती देण्याचं काम शासकीय यंत्रणामार्फत करण्यात यावे, ई.डब्लु.एस.सह एस. ई.वी.सी. आणि कुणवी हे तीनही पर्याय विद्यार्थ्यांसाठी उपलब्ध करून द्यावेत, १ जुन २००४ च्या कायद्यात सुधारणा करुन मराठा व कुणबी एकच असल्याचा शासन निर्णय जारी करावा, असे निवेदनात नमूद केले आहे.

# सिडकोत कडकडीत बंदला संमिश्र प्रतिसाद



**तभा वृत्तसेवा**
**नवीन नांदेड, दि. २३ सप्टेंबर -**

मनोज जरांगे पाटील यांच्या मागण्या मान्य करून उपोषण सोडवावे अन्यथा दिनांक २३ सप्टेंबर रोजी नांदेड बंदची हाक मराठा समाजानी दिली होती. त्यानुसार सिडकोतील बंदला व्यापाऱ्यांनी समिश्र प्रतिसाद देऊन कडकडीत बंद पाळण्यात आला.पण वर्दळ व दळणवळण चालू होती.

मराठा समाजाला ओबिसीतुन आरक्षण मिळावे या मागणीसाठी १७ सप्टेंबर रोजी पासुन मनोज जरांगे पाटील हे सहाव्यांदा उपोषणाला बसले आहेत परंतु शासन त्यांच्या मागण्यांकडे दुर्लक्ष करत असल्याने अखंड मराठा समाज बांधवांच्या वतीने जिल्हाधिकारी यांना निवेदन देऊन येत्या दोन दिवसांत मागण्या मान्य करून मनोज जरांगे पाटील यांचे उपोषण मागे घेण्यास परावृत्त न केल्यास सोमवार दि.२३ सप्टेंबर रोजी नांदेड बंद ची हाक देण्यात आली होती.त्यानुसार

सोमवारी सिडको हाडको परिसरातील व्यापाऱ्याची प्रतिष्ठाणे बंद ठेवून मराठा समाज बांधवांनी व तरुणांनी एका निवेदनाद्वारे जिल्हाधिकारी कार्यालय नांदेड येथील जिल्हाधिकारी यांना एका निवेदनाद्वारे मनोज जरांगे पाटील यांच्या मागण्या मान्य करून त्यांचे उपोषण सोडण्यास प्रवर्त करण्यासाठी निवेदन देण्यात आले. यावेळी बंद पुकारून नांदेड शहराच्या सिडको हडको परिसरातही व्यापाऱ्यांनी आपली प्रतिष्ठाणे बंद ठेवून कडकडीत बंद पाळून बंदला संमिश्र प्रतिसाद देण्यात आला. असे चित्र दिसून आले. यावेळी मराठा समाज बांधवांनी व तरुणांनी मुख्य रस्त्याने दुचाकी वरून रॅली काढून बंद करण्याचे आव्हान केले होते. मनोज जरांगे पाटील हे सहाव्यांदा उपोषणाला बसले आहेत. सरकारने येत्या दोन दिवसांत मागण्या मान्य करून जरांगे पाटील यांचे उपोषण मागे घेण्यास परावृत्त करण्यासाठी नांदेड जिल्हा कडकडीत बंद ठेऊन जिल्हाधिकारी अभिजीत राऊत यांना अखंड मराठा समाज बांधवांच्या वतीने निवेदन देण्यात आले यावेळी शेकडो समाज बांधवांची उपस्थित होते.

## संक्षिप्त वृत्त

### कु.किंजल गव्हाणे बी.ए.एम.एस. वैद्यकीय प्रवेशास पात्र



**उमरी-** शहरातील साईकृपा दुध डेअरीचे संचालक नंदकिशोर गव्हाणे यांची मुलगी कु.किंजल गव्हाणे हिने जिद्द व मेहणतीच्या बळावर अत्यंत हलाखीच्या परिस्थितीत निट परीक्षेत ७२० पैकी ४९० गुन घेवुन घवघवीत यश संपादन करुन आई वडीलांसह शहराचे नाव लैकीक केल्याने सर्व स्तरातून तिचे कौतुक होत आहे. २०२४ ला झालेल्या वैधकीय प्रवेश परीक्षेत घवघवीत यश संपादन करुन बी.ए.एम.एस.या वैधकीय प्रवेश अंजनाई आर्युवेदीक मेडिकल कॉलेज नाशिक या शासकीय कॉलेज प्रवेशासाठी पात्र ठरल्याने नायगाव विधानसभा मतदार संघाचे शेतकरी नेते मारोतराव कवळे गुरुजी यांनी किंजल गव्हाणे हिचा सत्कार करुन पुढील कार्यास शुभेच्छा दिल्या.यावेळी मार्केट कमिटीचे संचालक बापूराव पा.करकाळेकर,पंडीत बेंबरे,आनंदराव पा.भायेगावकर नंदकिशोर गव्हाणे अदि उपस्थित होते.

### भोकर शहरात ईद ए मिलादून नबी उत्साहात

**भोकर -** शहरात ईद ए मिलादून नबी निमित्त भव्य जुलूस(शोभायात्रा)काढून ईद उत्साहात साजरी करण्यात आली. सईद नगर भागातील मस्जिदे आयेशा पासून भव्य शोभा यात्रा काढण्यात आली यावेळी ईद्रीस सेठ उपनगरअध्यक्ष शेख यूसूफ बाबाखान पठान,ईमरान सेठ,मिर्झा ताहेर बेग,जुनेद पटेल ताजोद्दीन भाई,हमीदखॉन पठान,ईमरान सेठ ,जवाजोद्दीन बरबडेकर, करीम करखेलीकर,शेख साबेर अफरोज पठान,आशुभाई, ईम्तियाज ईनामदार,एजाज कुरेशी,मो अतिख सय्यद जब्बार भाई ,आशु भाई,रफिक भाई एकबाल मेकानिकसह लहान मुले युवक नागरिक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते भोकर तालुका कॉंग्रेस कमिटीचे अध्यक्ष गोविंद बाबागौड पाटील यांच्या वतीने फराळ व पाणी वाटप करून ईद-ए-मिलाद कमिटीच्या सर्व पदाधिकाऱ्यांचे शाल आणि पुष्पहार देऊन सत्कार करण्यात आला यावेळी युवा नेते संदीप पाटील गौड निळकंठ वर्षेवार कॉंग्रेस कमिटीचे शहराध्यक्ष तौसीफ इनामदार ,अप्पाराव राठोड,बबलु देशमूख गोविंद देशमुख आदिनाथ चिंताकुटे, सम्राट हिरे,आदी उपस्थित होते जुलूस यशस्वी करण्यासाठी अध्यक्ष आतीफ उर्फ अत्तूभाई उपाध्यक्ष मन्सूर पठन,सचिव नाजीम भाई,शमीमोद्दीन ईनामदार बाबुभाई तामसेकर,मजर लाला,रिजवान चाऊस,शेख अलफान,शेख फैसल,मो अजहर,शेख सलमान,अमान कुरेशी,आरेफ पठान एक्बाल भाई मेकानिक आदिनी परिश्रम घेतले.जुलूस दरम्यान कोणताही अनुचित प्रकार घडू नये यासाठी पोलीस निरीक्षक सुभाषचंद्र मारकड यांच्या मार्गदर्शनाखाली एपीआय औटे, राठोड मॅडम, पीएसआय सुरेश जाधव, राम कराड ,केशव राठोड, पोलीस जमादार कानगुले, जाधव, कंधारे ,गोपनीय शाखेचे गाडेकर यांनी चोख पोलिस बंदोबस्त ठेवला होता.

# खा. अशोक चव्हाणांच्या विकासकामांच्या बॅनरबाजीत ज्येष्ठ नेत्यांचा अवमान!

## भाजपा तालुका प्रभारी बाहेरचा : कार्यकर्त्यात प्रचंड नाराजी

**तभा वृत्तसेवा**
**अर्धापूर, दि. २३ सप्टेंबर -**

विधानसभा निवडणुकीची आचारसंहिता लागण्यापूर्वी भोकर मतदारसंघातील अर्धापूर तालुक्यात माजी मुख्यमंत्री तथा राज्यसभा खासदार अशोकराव चव्हाण यांच्या निधीतून विकासकामे धूम धडाक्यात सुरू आहेत. विकासकामांचे तालुक्यात बॅनरबाजी,वृत पत्रातून जाहिराती प्रसिद्ध होत आहेत. परंतु या बॅनरबाजीत आणि जाहिरातीत तालुक्यातील ज्येष्ठ नेते ,पदाधिकारी यांचा अवमान झाल्याचे दिसून येत आहे.तर माजी मुख्यमंत्री अशोकराव चव्हाण आणि त्यांचे कुटुंबीय मात्र ठळकपणे बॅनर आणि जाहिरातीत आल्याचे निदर्शनास येत आहे.

यामुळे तालुक्यातील ज्येष्ठ नेते आणि कार्यकर्ते यांना हा अवमान जिव्हारी लागत असून ही खदखद सोशल मीडियातून स्पष्टपणे पुढे येत आहे.नाराज कार्यकर्ते माजी मुख्यमंत्री अशोकराव चव्हाण यांच्या विकास कामांच्या कार्यक्रमावर पाठ फिरवीत असल्याचे चित्र अर्धापूर तालुक्यात आहे. माजी मुख्यमंत्री अशोकराव चव्हाण भोकर विधानसभेसाठी त्यांची ज्येष्ठ कन्या श्रीजया चव्हाण यांना निवडणूक रिंगणात उभे करणार आहेत. भोकर मतदार संघात निवडणूक डोळ्या समोर ठेवत गावागावात कोटचवधी रुपयांच्या निधी दिल्या जात आहे. विकासकामांचे नारळ फोडणे सुरू आहेत.

निधीची माहिती मतदार संघातील मतदारांना माहिती व्हावी म्हणून ठिकठिकाणी बॅनर, वृत्त पत्रात जाहिराती प्रसिद्ध केल्या जात आहेत. परंतु यात आपले कुटुंब ठळकपणे वरच्या ठिकाणी तर अर्धापूर तालुक्यातील ज्येष्ठ नेते,स्थानिक पदाधिकारी मात्र ठळकपणे दिसत नाहीत. या बाबतची खंत आणि खदखद सध्या सोशल मीडियातून समोर येत आहे. अर्धापूर तालुक्यासाठी भाजपचा प्रभारी हा नांदेड शहरात राजकारण केलेला व्यक्ती नेमण्यात आला आहे. तालुक्यात ज्येष्ठ कार्यकर्ते असताना सर्व रिमोट कंट्रोल त्यांच्या हाती आहे. प्रभारीच्या मनमानी मुळे स्थानिक कार्यकर्ते प्रचंड नाराज आहेत.या सर्व बाबींचा आगामी विधानसभा निवडणुकीत यांचा फटका नक्कीच बसणार असल्याचे तालुक्यातील जाणकार व्यक्तीकडून बोलले जात आहे .

# सकल मराठा समाजाच्या वतीने लोहा कडकडीत बंद

**तभा वृत्तसेवा**
**लोहा, दि. २३ सप्टेंबर -**

मराठा समाजाला ओ.बी. सी जात प्रवर्गातुन आरक्षण मिळावे यासाठी अनेक महिन्यापासून मराठा योद्धा मनोज पाटील जरांगे मराठा समाजाला ओबीसी प्रवर्गातून आरक्षण मिळावे यासाठी दिनांक १७ सप्टेंबर २०२४ पासून आमरण उपोषणाला बसले आहेत आणी अन्नपाणी वर्ज केले आहे.

शासन स्तरावर त्यांच्या मागणीकडे शासन जाणून बुजून दुर्लक्ष करत आहे.त्यामुळे. त्यांची तब्येत वरचेवर खालावत असल्यामुळे त्यांच्या जीवाला धोका होऊ शकतो त्यांनी गंभीर स्वरूपाचं उपोषण करत आसल्याने त्यांच्या उपोषणाला पाठींबा व शासनाला वेठीस धरण्यासाठी नांदेड जिल्ह्यासह १६ तालुक्यात कडकडीत बंद पुकारला आहे. शासन गंभीर दखल घेत नसल्याने सकल मराठी समाजाने बंदचे हात्यार उपसले आहे.बंदच्या संदर्भात शासनाला निवेदन देण्यात आले आहे.यावेळी संग्राम पाटील डीकळे, अँड विठ्ठल पाटील कदम, विजय पाटील चव्हाण, सतीश पाटील मुकदम, गजानन पाटील चव्हाण पवन पाटील लोंढे, व इतर मराठा समाजातील कार्यकर्ते उपस्थित होते सकल मराठा समाजाच्या वतीने शासनाकडे मागणीचे निवेदन दिले.त्या मागण्याचे निवेदन दिले त्यामध्ये सगेसोयरे या कायद्याची तात्काळ अंमलबजावणी करण्यात यावी, हैदराबाद सह सातारा बॉम्बे गव्हर्नमेंट गॅझेट लागू करण्यात यावी ,अंतर वाली सराटीसह महाराष्ट्रातील मराठा बांधवावर झालेली गुन्हे सरसकट मागे घेण्यात यावी. राज्यभर कुणबी नोंदी तपासणी अतिशय मंद गतीने चालू असणारे काम त्वरित शिंदे समितीमार्फत नोंद शोधून प्रमाणपत्र वितरित करण्यात यावे.ई एस डब्ल्यूसह एस.इ.बी.सी आणि कुणबी हे तीनही पर्याय विद्यार्थ्यांसाठी उपलब्ध करून देण्यात यावे ,१ जून २००४ च्या कायद्यात सुधारणा करून मराठा आणि कुणबी एकच असल्याचा शासन निर्णय जारी करण्यात यावा.अशा मागण्या नमुद केल्याचे सांगितले.

# हिमायतनगर तालुका व शहर कडकडीत बंद



**तभा वृत्तसेवा**
**हिमायतनगर, दि. २३ सप्टेंबर -**

मराठा आरक्षणाच्या विविध मागण्यासाठी अंतरवाली सराठी येथे मनोज जरांगे पाटील यांच्या उपोषणाचा सातवा दिवस आहे. या उपोषणाची प्रशासनाने आध्याप दखल घेतली नाही मनोज जरांगे यांच्या उपोषणास समर्थन देण्यासाठी सकल मराठा समाजाच्या वतीने सोमवारी दिनांक २३ रोजी नांदेड जिल्हा बंदला प्रतिसाद देत हिमायतनगर शहरातील सर्व व्यापारीबांधव बंद मध्ये सहभागी होऊन पाठिंबा दिला आहे .

मराठा युद्ध मनोज जरांगे पाटील हे अंतरवाली सराटी येथे मराठा समाजाच्या न्यायिक मागण्यासाठी आमरण उपोषण करीत आहे. परंतु अद्याप शासनाने त्यांच्या मागण्याची दखल घेतली नाही. त्यामुळे त्यांची प्रकृती अधिक अधिक बिघडत चाललेली आहे. म्हणून शासनाच्या या आडमुठी धोरणाच्या विरोधात दिनांक २३ सप्टेंबर २४ रोजी सकल मराठा समाजाच्या वतीने हिमायतनगर शहर व तालुका कडकडीत बंद ठेवण्यात आला. व शासनाच्या जाहीर निषेध व्यक्त करण्यात आला.

शासनाने मराठा समाजाला वेठीस धरू नये समाजाच्या पुढील मागण्याचा विचार करून तात्काळ मनोज जरांगे पाटील यांच्या उपोषणाची दखल घेत मागण्या मान्य करावे व त्यांचे उपोषण सोडवावे. मराठा समाजाला न्याय द्यावा. असे निवेदन नायब तहसीलदार यांच्या हस्ते महाराष्ट्राचे मुख्यमंत्री एकनाथ भाई शिंदे यांना पाठविण्यात आले. यावेळी मराठा समाज बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.व पोलीस प्रशासनाच्या वतीने कडोकोट बंदोबस्त ठेवण्यात आला होता.

# नरसीत धनगर समाज बांधवांचा रस्तारोको आंदोलन

**तभा वृत्तसेवा**
**नायगाव, दि. २३ सप्टेंबर -**

धनगर समाजास एसटी प्रवर्गातून आरक्षण मिळावे या मागणीसाठी पंढरपूर येथे सुरु असलेल्या राज्यव्यापी आमरण उपोषणाला पाठिंबा देण्यासाठी सकल धनगर समाज बांधवांच्या वतीने आज नरसी येथे रास्तारोको आंदोलन केले.या आंदोलनामुळे राज्य महामार्गावरील वाहतूक ठप्प झाली होती

गेली अनेक वर्षांपासून महाराष्ट्रात धनगर समाज आपल्या विविध मागण्यांसाठी संघर्ष करीत आहे .धनगर जमातीस एसटी आरक्षणाची अंमलबजावणी करण्यात यावी यासाठी अनेक समाज बांधवांनी वेळोवेळी आंदोलन केली आहेत.पण राज्य सरकारने आजपर्यंत या मागणीकडे दुर्लक्ष केले आहे.

शासनाचे लक्ष वेधण्यासाठी गेल्या दहा दिवसांपासून पंढरपूर येथे माऊली हळणवर,दिपक बोऱ्हाडे ,यशवंत गायके ,विजय तमनर, गणेश केसकर,योगेश धरम आदींनी राज्यव्यापी आमरण उपोषणाला बसले आहेत.त्यामधील अनेक उपोषणकर्त्यांची तब्येत खालावली आहे. हि सर्व मंडळी धनगर समाजाला आरक्षण मिळावे म्हणून जीवाची बाजी लावून लढत आहेत.या उपोषणाला आता विविध भागातून मोठा पाठिंबा मिळत आहे. पंढरपूर येथे बसलेल्या उपोषणकर्त्यांना पाठबळ देण्यासाठीच सोमवारी रास्ता रोको आंदोलन करण्याचा इशारा दिला होता. त्यामुळे नरसी चौकात सकल धनगर समाजाच्या वतीने आज रास्तारोको आंदोलन करण्यात आले.

सकल धनगर समाजाच्या आंदोलनात समाजाचे नेते माणिकराव लोहगावे, सुर्याजी चाडकर, बालाजी नारे, संजय चोंडे, माधव चिंतले,माधव डोनगावे, बालाजी लव्हाळे,माधवराव मेकाले, पांडुरंग बागडे, भास्कर कोकणे,गोविंद तुपेकर, भास्कर कोकणे, माधवराव वडजे, दत्ता भरपूरे, मारुती दरेगावे, किसन खनपटे, राम खनपटे, पांडुरंग खनपटे, राजू वडगावे, संभाजी भिसे, श्यामसुंदर कोकणे, हनुमान मिसे, बालाजी दरेगावे, मारुती मांजरमे, परमेश्वर लोहगावे, दत्ता गागलेगावे ,विठ्ठल मांजरमे, श्याम जानोरे, श्री वडजे, पप्पू वडजे, संग्राम मुगावे, संतोष मांजरमे आदींसह असंख्य धनगर समाज बांधव या आंदोलनात सहभागी झाले होते. या रास्तारोको आंदोलनामुळे राज्य महामार्गावरील वाहतूक काही काळ ठप्प झाली होती. यावेळी नायगाव तहसील चे नायब तहसीलदार देवराये यांना निवेदन देण्यात आले. यावेळी रामतीर्थ पोलिस ठाण्याचे सहायक पोलिस निरीक्षक श्रीधर जगताप यांनी चोख पोलिस बंदोबस्त ठेवला होता.

## कार्यालय नगरपरिषद कंधार जि, नांदेड

शाखा : मालमत्ता कर
जा.क्र. १७७६/२०२४
दिनांक २३/०९/२०२४

### ई-निविदा सूचना (तिसरी वेळ)

मा. मुख्याधिकारी कंधार नगरपरिषद ह्यांच्या वतीने नोंदणीकृत व अनुभवी कंत्राटदारांकडून खालील कामाकरिता ई-निविदा प्रणाली द्वारे ऑनलाईन निविदा मागविण्यात येत आहेत.

कामाचे नावः कंधार नगरपरिषद करीता निविदा प्रमाणे नगरपरिषद हद्दीतील मालमत्तांचे (जमिनी व इमारती) सर्वेक्षण करून आवश्यक माहिती संकलित करणे, कार्मुल्यांकन व संगणक आज्ञावली व आवश्यक तांत्रिक सेवा, तांत्रिक पुरवठा व इतर अनुषांगिक कामे करणे.

नियम व अटी

इच्छुक निविदा धारकांनी आपली ई-निविदा https://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर ऑनलाईन निविदा फी व अनामत रक्कम भरून संपूर्ण पात्रता दस्ताऐवजांसह विहित मुदतीत सादर करावी. निविदेसंदर्भात संपूर्ण कामाचे सविस्तर विवरण, जपश्रळपश निविदा सादर करण्याचा व समाप्तीचा दिनांक, निविदा शुल्क अटी व शर्ती तसेच नोंदणी व पात्रता निकष ऑनलाईन निविदा संचिकेत उपलब्ध करण्यात आले आहेत.

टिपः कोणतेही कारण न देता एक अथवा सर्व निविदा स्वीकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार मा. मुख्याधिकारी कंधार नगरपरिषद ह्यांनी राखून ठेवलेला आहे.

मुख्याधिकारी
नगरपरिषद कंधार

## कार्यालय हिंगोली नगर परिषद हिंगोली, जि.हिंगोली

फोन नं. (०२४५६) २२१७२७, फैक्स नं. (०२४५६) २२१७२७,
E-Mail-coud.hingoli@maharashtra.gov.in

### निविदा सूचना सन २०२३-२४

मुख्यधिकारी नगर परिषद हिंगोली हे लोकशहीर अण्णभाऊ साठे नागरी वस्ती सुधार योजने अंतर्गत सन २०२४-२५ मध्ये हिंगोली नगर परिषद अंतर्गत हिंगोली शहरातील सिमेंट रोड बांधकाम करणे या कामा करीता नोंदणीकृत अनूभवी कंत्राटदार यांच्याकडून ई. निविदा कार्यप्रणाली ई- टेंडरीग पध्दतीने दिनांक ०१/१०/२०२४ वेळ सायंकाळी ० वाजेपर्यंत एकूण एक ( ०१ ) कामाच्या एकत्रित पणे निविदा मागवित आहेत निविदा विषयी तपशिल महाराष्ट्र शासनाच्या ई- टेंडरींग पोर्टल http://mahatenders.gov.in वर दि. २४/०९/२०२४ रोजी संपुर्ण माहिती व अटी व शर्तीसह सकाळी / दुपारी ४.०० वाजता पासून पहावयास मिळेल.

(स्वाक्षरीत)
मुख्याधिकारी
नगरपरिषद हिंगोली

# देगलूर येथे गोर बंजारा तिज महोत्सव उत्साहात

**तभा वृत्तसेवा**
**देगलूर, दि. २३ सप्टेंबर -**



गोर बंजारा समाजातील महिलाचा सर्वात मोठा सण/उत्सव म्हणजे तीज मानला जातो. या उत्सवामध्ये एका छोट्या टोपली मध्ये धान उगवले जाते आणि त्या धान चे सलग आठ दिवस पुजा केली जाते व नवव्या दिवशी त्याचे पाण्यात विसर्जन केले जाते. धान म्हणजे बंजारा समाजाची देवी अशी धारणा समाजाची आसते.

देगलूर येथील सद्गुरु सेवालाल महाराज चौक पासून ते विसर्जन घाट पर्यंत ही शोभा यात्रा म्हणजेच महोत्सव साजरा करण्यात आला असून या महोत्सवामध्ये बंजारा पारंपारिक लोकनृत्य ,बंजारा पारंपारिक लेंगी , बंजारा हलगी (डपडा), बंजारा पारंपारिक संगीत यांच्यासह इत्यादी पारंपारिक लोक कले सह कुमरिकेच्या डोक्यावर तिज ची टोपली घेऊन वाजत ,गाजत,नाचत ही शोभायात्रा हजारो समाज बांधवांच्या उपस्थीत पार पडली.

यावेळी माजी समाज कल्याण सभापती रामराव नाईक, बंजारा क्रांती दलाचे अध्यक्ष देविदास राठोड, माजी नगराध्यक्ष मोगलाजी शिरशेटवार , माजी सनदी अधिकारी शिवाजी पवार, माजी सनदी अधिकारी वरवंटकर, माजी अप्पर बी एम कांबळे, पांडुरंग पवार अँड मोहाने मॅडम , भावना दाशेटवार,आजी माजी नगसेवक , विविध संघटनेचे पदाधिकारी विशेष म्हणजे जिजाऊ ब्रिगेड तसेच वेगवेगळ्या तांड्यातील नायक-कारभारी आदी अनेक मान्यवरांच्या उस्थितीत हा कार्यक्रम पडला. देगलूर शहरातील जे बंजारा समाजाचं वैभव (चौक)उभ आहे त्यामधे माजी नगराध्यक्ष मोगलाजी शिरशेटवार यांचे खुप मोठे योगदान आहे असे संयोजक विशाल पवार पत्रकारांशी बोलताना म्हणाले.

### आरक्षणासाठी धनगर समाज सरसावला
### एस. टी. प्रवर्गात समाविष्ठ करण्याची मागणी

**मुदखेड** -मुदखेड तालुक्यातील धनगर समाज बांधवांच्या वतीने एसटी प्रवर्गात समाविष्ट समाविष्ट करून तातडीने अंमलबजावणी मागणीसाठी तहसीलदार यांना निवेदन देण्यात येऊन राज्यात सुरू असलेल्या आमरण उपोषणास पाठिंबा देण्यात आला आहे. राज्यातील धनगर जमात पिढ्यान पिढ्या मेंढ्या फारसा व्यवसाय करीत असून सन १९५६ च्या यादीत एससी एसटी अनुक्रमांक ३६ वर धनगड असा उल्लेख करण्यात आला असल्याने धनगर जमात संविधानिक आरक्षण हक्कापासून वंचित राहिले आहे वास्तविक धनगड नावाची जमातच अस्तित्वात नसून अर्थ वेगळा लावून धनगर समाजाला धनगर समाजाला आरक्षण हक्कापासून बाजूला ठेवण्यात आला असल्याचा घनाघात धनगर समाजाचे तालुका नेते माजी उपनगराध्यक्ष लक्ष्मण देवदे यांनी केला आहे. यापूर्वी शासनाने मुंबई उच्च न्यायालयात धनगड जमात अस्तित्वात नसल्याचे प्रतिज्ञापत्र सादर केले असले तरी आजपर्यंत अनुसूचित जमातीचे प्रमाणपत्र धनगर समाजाला देण्यात आले नाही. मुदखेड तालुका सकलधनगर समाज बांधवांच्या वतीने रस्ता रोको आंदोलनाचा इशारा देण्यात आला होता परंतु पोलीस प्रशासनाने परवानगी नाकारल्याने आरक्षण हक्काच्या मागणीसाठी दि.२३ सप्टेंबर सोमवार रोजी तहसीलदार आनंद देऊळगावकर यांना भेटून मागणीचे लेखी निवेदन धनगर समाजाचे प्रमुख लक्ष्मण देवदे, गजाजन कमळे, गुलाब सुर्यवंशी,कानोबा बिस्मीले, नितीन माने, गोविंद बने, अविनाश धारके, भगवान पानेवार, वामन गुंठे, यांच्यासह असंख्य समाज बांधव उपस्थित होते.